● पुणे, बुधवार, २२ जानेवारी २०२५ ● RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 57 ● वर्ष ४ थे, अंक ५७ ● किंमत ₹ ६ ● पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



राष्ट्रवादीची 'दादागिरी' भाजपाला पडणार 'भारी'

P३



प्रियंका इंगळेच्या नेतृत्वात भारताने जिंकला खो खो विश्वचषक

P३

## At a Glance

### इलेक्ट्रिक बसने ५०० किलोमीटर्सचा प्रवास

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत सुरू असलेल्या भारत मोबिलिटी ग्लोबल ऑटो एक्स्पोमध्ये नव्या मोटारी आणि व्यवसायिक वाहनांचे नवे मॉर्डल पहायला मिळत आहेत. ऑलेक्ट्रा ग्रिनटेक लिमीटेडनं आपली नव्या पिढीच्या इलेक्ट्रिक बस या मेळ्यात लॉंच केल्या आहेत. एकदा चार्ज केल्यावर ही बस थोडेथोडके नव्हे चक्क ५०० किलोमीटर्स धावणार आहे. म्हणजेच मुंबईतून

» पान ७ वर

### नक्षलवाद्यांचा खात्मा!

**नवी दिल्ली:** केंद्र सरकारने सुरू केलेला नक्षलवादाच्या विरोधातील लढ्याला आता यश मिळत असल्याचे बघायला मिळते आहे. २१ जानेवारी रोजी सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांच्यामध्ये झालेल्या चकमकीच एकूण १४ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात सुरक्षा दलाला यश आल्याची माहिती माध्यमांना मिळाली आहे. नक्षलवादी गटाचा म्होरक्या चलापथी याला कंठस्नान घालण्यात

» पान ७ वर

# कराडचे पाय खोलात..!

## खंडणी प्रकरण : गँगविरोधात सर्वांत मोठा पुरावा आला समोर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बीड :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचा पाय आणखी खोलात गेला आहे. वाल्मिक कराड, सुदर्शन घुले व अन्य गुन्हेगाराचे एकत्रित २९ नोव्हेंबरचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. आवादा कंपनीकडे खंडणी मागितल्याच्या दिवशीचा सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातीलया आरोपींचे एक महत्त्वाचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले आहे. अवादा पवनचक्की कंपनीला ज्या दिवशी खंडणी मागण्यात आली त्याच दिवशी वाल्मीक कराड आणि सुदर्शन घुले हे केजमधील विष्णू चाटे याच्या कार्यालयात एकत्र प्रवेश करत असल्याचं सीसीटीव्ही फुटेजमधून स्पष्ट झाले आहे.



> मी जे आरोप केले होते, त्याचे पुरावे एसआयटीने समोर आणले आहेत. माझे आरोप हवेतील नव्हते. या लोकांचा खंडणी, हत्येशी अकाचा संबंध आहे, यातून हे सिद्ध होतंय. अवादा कंपनींच्या शिंदेंना २९ नोव्हेंबरला गाडीत घालून पाथर्डीपर्यंत नेले होते. तिथून मारत मारत येथे आणले, त्यानंतर त्याला सोडून दिले. त्याचे हे सीसीटीव्ही फुटेज आहे. त्यामुळे १०१ टक्के आका, विष्णू चाटे, सुरेश आंधळे हे आरोपी आहेत.
>
> — **सुरेश धस,** आमदार

### जामीनावर गुरुवारी सुनावणी



● मस्साजोगगावाच्या परिसरात पवनचक्की उभारण्यात आल्या आहेत. त्यातील अवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना दोन कोटींची खंडणीसाठी जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी केज न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावलेल्या व मकोकातील आरोपी वाल्मीक कराड याच्या जामीन अर्जावरील सुनावणी पुन्हा पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही सुनावणी गुरुवारी केज न्यायालयात होणार आहे.

२९ नोव्हेंबर २०२४ रोजी वाल्मीक कराड याने विष्णू चाटेच्या मोबाईलवरून अवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना धमकी देऊन खंडणी मागितल्याची तक्रार आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने सबळ पुरावा आता पोलिसांच्या हाती लागला आहे. वाल्मीक कराड, सुदर्शन घुले,विष्णू चाटे आणि इतर काहीजण २९ नोव्हेंबर रोजीच एकत्रितपणे केज येथील विष्णू चाटेच्या कार्यालयात गेले होते, ही बाब सीसीटीव्ही फुटेजमधून उघड झाली आहे.

**» खंडणी प्रकरण**

खंडणीच्या प्रकरणातपोलीस कोठडीत असणाऱ्या वाल्मिक कराड याच्या जामीनावर लवकरच सुनावणी होणार आहे. पण त्याआधीच खंडणीच्या दिवशीचा व्हिडिओ समोर आला आहे. त्यामध्ये वाल्मीक कराड त्याच्या गँगसोबत दिसत आहे. या व्हिडिओमुळे वाल्मीक कराडच्या अडचणी चांगल्याच वाढल्या आहेत. कराड यानेविष्णू चाटेच्या मोबाईलवरूनअवादा पवनचक्की कंपनीच्या मॅनेजरला कॉल करून २ कोटी रूपयांची खंडणी मागितली होती.त्याबाबत दावे-प्रतिदावेकेले जात होते.आवाजाचे नमुने घेतले जात होते. त्यातच आता हा व्हिडिओसमोर आल्याने पोलिसांच्या हाती

» पान ७ वर

# पालिका निवडणूक पुन्हा पुढे जाण्याची शक्यता

## निवडणूक याचिकेवर सुनावणी २८ जानेवारीला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राज्यातील महापालिकांच्या रखडलेल्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. महापालिकांच्या निवडणुकांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकांवर येत्या बुधवारी सुनावणी होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

निवडणुका रखडल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवडसह तब्बल २३ महापालिकांवर प्रशासकीय राजवट आहे. प्रभाग रचना, लोकसंख्येत १० टक्के वाढ धरून निश्चित केलेली सदस्यसंख्या आणि ओबीसी आरक्षण - यावरून तब्बल ५७ वेगवेगळ्या याचिका - सर्वोच्च न्यायालयात दाखल आहेत. त्यांवर एकत्रित सुनावणी बुधवारी २२ जानेवारीला होणार होती. मात्र, बुधवारच्या सुनावण्यांच्या यादीत या याचिकांचा समावेश नाही. आता २८ जानेवारीला या सुनावणीची शक्यता आहे.

**राजकीय**

महाविकास आघाडीच्या राजवटीत मुंबई वगळता अन्य महापालिकांसाठी तीनसदस्यीय प्रभाग रचना करण्यात आली व त्यानुसार प्रभाग रचना करून आरक्षण सोडत काढण्यात आली होती. मात्र महायुतीचे सरकार आल्यानंतर पुन्हा चारसदस्यीय प्रभाग रचना करण्यात आली. ही प्रभाग रचना आता नव्याने करावी लागेल. २०१७ च्या रचनेनुसार प्रभाग रचना कायम राहिली तरी पुणे महापालिकेत २०१७ नंतर उरुळी देवाची व फुरसुंगी वगळून ३२ गावांचा समावेश झाला आहे. त्यामुळे किमान पुणे महापालिकेत तरी नव्याने प्रभाग रचना करावी लागेल. प्रभाग रचना करणे, त्यावर हरकती- सूचनांची प्रक्रिया आणि अंतिम

» पान ७ वर

# गुंतवणूकदारांना ३५ कोटींचा गंडा

## आठशे गुंतवणूकदारांना फटका : टोरेस कंपनी सारखा मोठा घोटाळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**संभाजीनगर :** महाराष्ट्रात पुन्हा सारखा मोठा घोटाळा झाला आहे. मुंबईमध्ये टोरेस नावाच्या ज्वेलर्स कंपनीनं कमी कालावधीत दुप्पट पैसे करून देण्याचे अमिश दाखवत गुंतवणूकदारांची मोठी फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला यामुळे एकच खळबळ उडाली. या प्रकराणाचा तपास पूर्ण होण्याआधीच महाराष्ट्रात असाच नवा घोटाळा उघडकीस आला आहे. 35 कोटींचा हा घोटाळा आहे. गुजरातच्या कंपनीने महाराष्ट्रात तब्बल 800 लोकांना गंडा घातला आहे.

मुंबईत टोरेस कंपनीने गुंतवणूकदारांना घातलेल्या गंडाचं प्रकरण अद्यापही ताजं आहे. त्यातच संभाजीनगरमध्येही असाच एका कंपनीची भामटेगिरी समोर आलीय. संभाजीनगरमध्ये क्विक स्टार्ट या कंपनीने जिल्ह्यातील तब्बल 800 च्या वर नागरिकांची आर्थिक फसवणूक केली आहे. 2023 पासुन हा सगळा प्रकार सुरू होता. गुंतवणुकीवर मोठ्या परताव्याचं आमिष दाखवत कंपनीने हा गंडा घातलाय. धक्कादायक म्हणजे एकट्या संभाजीनगरात 3 कार्यालयांमधून या कंपनीचा गोरखधंदा सुरू होता.

छत्रपती संभाजीनगरमध्ये गुंतवणुकीवर 3 टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून गुजरातच्या क्विक स्टार्ट 24 ग्रुप कंपनीने 800 वर गुंतवणूकदारांकडून 35 कोटी रुपये उकळून कार्यालयाला कुलूप लावून फसवणूक केली असल्याचं समोर आले आहे.

या कंपनीने एका वर्षासाठी एक लाख रुपये 10 महिन्यांसाठी गुंतवणूक केल्यास दरमहा तीन टक्के परतावा मिळेल. त्याचबरोबर परदेशात मोफत सहलीसाठी जाता येईल असे आमिष दाखवून गुंतवणूकदाराना 35 कोटी रुपयांचा गंडा घातला. धक्कादायक म्हणजे ज्यांनी यात गुंतवणुक केली त्यांचे डॉक्युमेंट्स थेट गुजरातमधून नोटरी करून घेतले जात होते... या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर कंपनी संचालक हर्षल गांधी आणि प्रतीक शाह फरार आहेत.

# आता करभरणा अधिक सुलभ होणार!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** करदात्यांकडून होणारा करभरणा अर्थात टॅक्स हा देशाचा सर्वात महत्त्वाचा महसूल स्त्रोत आहे. त्यामुळे करभरणा चुकवणाऱ्यांना दंडाच्या माध्यमातून शिस्त लावण्याचा प्रयत्न सरकार करत असते. शिवाय, नियमित करभरणा करणाऱ्यांना प्रसंगी सूट देण्याचे प्रस्तावही सरकार दरबारी विचाराधीन असतात. मात्र, सध्या अस्तित्वात असणारी करप्रणाली क्लिष्ट असल्यामुळे सामान्य नोकरदार वर्गाला करभरणा करणं म्हणजे मोठं काम असल्याचे अनुभव अनेकदा व्यक्त होत असतात. त्यावरच उपाय म्हणून आता केंद्राकडून थेट नवीन कर विधेयक मांडलं जाणार आहे. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान हे विधेयक मांडले जाणार असल्याचे सांगितले जात आहे. ३१ जानेवारी ते ४ एप्रिल या काळात यंदाचं केंद्रीय अर्थसंकल्पीय अधिवेशन पार पडणार आहे. यादरम्यान

» पान ७ वर

# भारताने चॅम्पियन ट्रॉफी जिंकली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



## इंग्लंडला झुकवले

**नवी दिल्ली :** सध्या सर्वत्र पाकिस्तान आणि दुबईत १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीची चर्चा सुरू आहे. पण त्याआधीच भारताच्या दिव्यांग संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद जिंकले आहे. मंगळवारी दिव्यांग चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना पार पडला. भारत आणि इंग्लंड संघात हा सामना झाला.

दोन्ही संघ तुल्यबळ संघ असल्याने हा सामना कोण जिंकणार याची उत्सुकता होती. पण भारतीय संघाने अंतिम सामन्यात इंग्लंडविरुद्ध ७९ धावांनी विजय मिळवला आणि साखळी फेरीतील पराभवाचा वचपा काढला. यासह भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद जिंकले.

या सामन्यात भारतीय संघाने इंग्लंडसमोर विजयासाठी २० षटकात १९८ धावांचे लक्ष्य ठेवले होते, पण या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडचा डाव १९.२ षटकात ११८ धावांवरच संपुष्टात आला. इंग्लंडला पूर्ण २० षटकेही फलंदाजी करता आली नाही.

इंग्लंडकडून ऍलेक्स हेमंडने सर्वाधिक ३५ धावा केल्या. त्याने या ३५ धावा ३५ चेंडूत केल्या. त्याच्या व्यतिरिक्त इंग्लंड कोणालाही फार खास काही करता आले नाही. भारताकडून राधिक प्रसादने शानदार गोलंदाजी करताना १९ धावा खर्च करत ४ विकेट्स घेतल्या.

तत्पुर्वी भारतीय संघाने फलंदाजी केली होती. भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ४ बाद १९७ धावा केल्या. भारताकडून योगेंद्र भदोरियाने सर्वाधिक ७३ धावा केल्या. त्याने ४० चेंडूत ही वादळी खेळी केली. याशिवाय माजिद मरग्रेने १९ चेंडूत ३३ धावांची नाबाद खेळी केली. इंग्लंडकडून गोलंदाजीतही ऍलेक्स हेमंड चमकला. त्याने ३० धावात २ विकेट्स घेतल्या.

भारताने या स्पर्धेत ७ पैकी ६ सामने जिंकले आहेत. भारताने

» पान ७ वर

# राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तपदी दिनेश वाघमारे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** ज्येष्ठ आयएएस अधिकारी दिनेश वाघमारे यांची राज्याचे नवे निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दिनेश वाघमारे हे सचिव दर्जाचे अधिकारी आहेत. त्यांच्या नावावर राज्यपालांकडून शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. राज्यातील महापालिकांसह आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी नवीन निवडणूक आयुक्तांवर असणार आहे. मंत्रिमंडळाने राज्य निवडणूक आयोगाच्या नव्या निवडणूक आयुक्तांची निवड करण्याचे सर्वाधिकार मुख्यमंत्र्यांना दिले होते. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी दिनेश वाघमारे यांच्या

» पान ७ वर

# पहिला करार :

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**दावोस :** दावोसमध्ये गडचिरोलीसाठी पहिला सामंजस्य करार करण्यात आला आहे. कल्याणी समुहाकडून पोलाद उद्योगासाठी ५ हजार २५० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. याद्वारे गडचिरोली येथे ४,००० रोजगार निर्माण होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

# राज्यात थंडी, ऊन, पावसाचा खेळ!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात थंडीच्या महिन्यात थंडी, ऊन व पावसाचा खेळ सुरू आहे. बहुतांश भागात थंडीचा प्रकोप कमी झाला आहे. तर तापमान वाढले आहे. मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात तापमानात वाढ झाली आहे. असे असले तरी सकाळी आणि रात्री मोठ्या प्रमाणात थंडी पडत आहे. पुढील काही दिवसांत राज्याचे हवामान कोरडे राहणार असून तापमानात वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

चार सायक्लोनिक सर्क्युलेशन तयार झाल्याने याच परिणाम हवामानावर झाला आहे. थोड्या थोड्या वेळाने हवामानात मोठा बदल होत आहे. सकाळी थंडी तर दिवसभर उकाड्याने नागरिक हैराण झाले आहे. तर काही वेळा ढगाळ हवामान देखील पडत आहे.

# नवीन विषाणूचा शिरकाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात एका नवीन विषाणूचा शिरकाव झाला आहे. पुणेकरांची धाकधुक वाढणारी एक बातमी समोर आली आहे. गुईलेन बॅरे सिंड्रोम असे या विषाणूचे नाव आहे. या विषाणूच्या साधारण 22 संशयित रुग्णांची नोद झाल्याची माहिती पुणे महापालिकेने दिली आहे.या घटनेनंतर संशयित रूग्णांचे नमुने आयसीएमआर एनआयव्हीकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे.या तपासणीअंती या आजाराचा निष्कर्श निघणार आहे.

गुइलेन बॅरे सिंड्रोम हा एक दुर्मिळ न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर आहे ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मज्जातंतूवर हल्ला करते. या स्थितीचा परिणाम स्नायुंमधील कमकुवतपणा, पक्षाघात आणि गंभीर प्रकरणांमध्ये जीवघेणी गुंतागुंत होऊ शकते. दुर्मिळ असा गुइलेन बॅरे सिंड्रोम हा कोणत्याही

» पान ७ वर

**आजाराची लक्षणे**

- अंग दुखणे
- चालताना तोल जाणे
- चेहरा सूजणे
- चालताना व गिळताना त्रास होणे
- हात-पाय लूळ पडणे




# महाराष्ट्राला साखर निर्यातीचा सर्वाधिक कोटा... !

**निर्यात**

केंद्राने साखर निर्यातीचा १० लाख टनांचा कोट दिला आहे. त्यापैकी सर्वाधिक साखर निर्यात महाराष्ट्रातून होणार आहे. महाराष्ट्राला ३ लाख ७५ हजार टन निर्यातीचा कोटा देण्यात आला. तर उत्तर प्रदेशला २ लाख ७४ हजार टनांचा कोटा मिळाला. कर्नाटकला १ लाख ७५ हजार टन कोटा देण्यात आला. तर उर्वरित कोटा इतर राज्यांना देण्यात आला. पण जास्तीत जास्त कोटा या तीन राज्यांच्याच वाट्याला आला.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्र सरकारने अखेर एक वर्षानंतर साखर निर्यातीला आंशिक परवानगी दिली आहे. ऊस उत्पादक आणि साखर कारखान्यांना दिलासा देण्यासाठी केंद्राने १० लाख टन साखर निर्यातीला परावनगी दिली आहे, असे केंद्रीय अन्नमंत्री प्रल्हाद जोशी यांनी एक्सवरून सांगितले. तर महाराष्ट्राच्या वाट्याला सर्वाधिक कोटा आला आहे.

भारताने देशातील घटलेले उत्पादन आणि वाढते भाव लक्षात घेऊन मागील हंगामात साखर निर्यातीला परवानगी दिली नव्हती. तर २०२२-२३ च्या हंगामात ६० लाख टन निर्यात झाली होती. २०२१-२२ मधील निर्यात ११० लाख टन झाली होती. २०२३२४ हंगामात देशातील उत्पादन घटून भाव वाढले होते. त्यामुळे भारत सरकारने निर्यातीला परवानगी दिली नव्हती. पण यंदा देशातील उत्पादन आणि देशातील दराची स्थिती पाहता सरकारने मर्यादीत परवानगी देण्याचा निर्णय घेतल्याचे मंत्री जोशी यांनी म्हटले आहे.



मंत्री जोशी यांनी एक्सवरील संदेशात म्हटले आहे की, सरकारने १० लाख टन साखर निर्यातीला परवानगी देताना देशातील साखर कारखाने आणि ऊस उत्पादकांना केंद्रस्थानी ठेवले आहे. ५ कोटी ऊस उत्पादकांच्या कुटुंबांना सरकारच्या या निर्णयाचा फायदा होणार आहे. तर देशातील ५ लाख साखर कामगारांनाही फायदा होईल. सरकारने साखर कारखान्यांची आर्थिक उलाढाल वाढावी, ऊस उत्पादकांना वेळेत एफआरपी देता यावी आणि ग्राहकांना सारखेचा नियमित पुरवठा आणि संतुलित किंमतीचा लाभ मिळावा, यासाठी निर्यातीला परवानगी दिल्याचे त्यांनी म्हटले आहे.

निर्यात करतानाही कारखाना स्तरावर कोटा देण्यात आला आहे. कारख्यांना गेल्या हंगामातील सरासरीच्या ३.१७ टक्के निर्यात करता येईल. तसेच कारखाने आपल्या निर्यात कोट्याची आदला बदली करू शकतात. तसेच ज्या कारखान्यांना साखर निर्यातच करायची नाही ते आपला कोटा इतर कारखान्यांना देऊ शकतात. कोट्यांटी आदलाबदल कारखान्यांनी ३१ मार्चपर्यंत पूर्ण करायची आहे. तर ३० नोव्हेंबरच्या आधी निर्यातीचा कोटा पूर्ण करायचा आहे. कारखान्यांनी निर्यातीच्या प्रक्रियेबाबत काय काम केले याची माहिती सरकारला देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

#रा

# धक्कादायक...! सायबर चोरट्यांचा 'गफला'

## गुन्हे ' फास्ट ट्रॅक'वर, मनुष्यबळ ' तोकडे'च, : उपलब्धा तपास यंत्रणाही ठरतेय कुचकामी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्येचे आणि सांस्कृतिक शहर म्हणून ओळख असलेल्या पुण्याला आता सायबर गुन्ह्याने एक वेगळी ओळख निर्माण करुन दिली आहे; गेल्या काही वर्षांच्या कालावधीत सायबर भामट्यांनी गरजू नागरिक आणि तरुणांना आमिष दाखवून तब्बल १ हजार १६१ कोटींना गंडा घातल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे दिवसेंदिवस सायबर गुन्ह्यांचा ' ट्रॅक' वाढत असतानाच त्यासाठीची तपासण यंत्रणा अक्षरश: कुचकामी ठरली असून मनुष्यबळही तोकडेच आहे.

पुण्याची ७३ लाख इतकी लोकसंख्या पाहता सायबरच्या वाढत्या गुन्ह्यांच्या तुलनेत पोलिसांचे मनुष्यबळ अत्यंत अपुरे आहे. त्यामुळे सायबर गुन्हेगारी कमी करण्यासाठी कठोर दंडात्मक तरतुदी आणि जलद न्यायालयीन प्रक्रियेची आवश्यकता निर्माण झाली असून, 'फास्ट ट्रॅक कोर्ट'प्रमाणेच सायबर गुन्हेगारीशी संबंधित प्रकरणे जलदगतीने सोडवण्यासाठी विशेष न्यायालयांची गरज आहे, अशी अपेक्षा विधी क्षेत्रासह पोलिस दलातून व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यात झपाट्याने वाढ झाली आहे. पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात वर्षभरात ११६१ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची आकडेवारी समोर आली असून, भविष्यात ही संख्या वाढतच जाणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गतवर्षीच्या तुलनेत यंदा सायबर फसवणुकीच्या रकमेच्या आकड्याने जवळपास शंभर कोटींचा आकडा पार केला आहे. मागील काही महिन्यांमध्ये सायबर गुन्हेगारीचे स्वरूप बदलले असून, 'डिजिटल अरेस्ट'च्या कारवाईची भीती दाखवून लोकांना मोठ्या रकमेचा गंडा घालण्यात येत आहे. या सायबरच्या वाढत्या घटना बघता सायबर पोलिसांच्या अपुऱ्या मनुष्यबळामुळे गुन्ह्याची उकल होण्यास काहीसा विलंब लागत असल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे तपासच पूर्ण झाला नाही, तर कुठले दोषारोपपत्र आणि कुठली शिक्षा? न्यायालयात प्रकरणे दाखल होण्याचे प्रमाण कमी असल्याचे वकिलांचे म्हणणे आहे.

### पुणे सायबर सेलकडचे मनुष्यबळ

- पोलिस निरीक्षक -२
- पोलिस उपनिरीक्षक - ५
- पोलिस कर्मचारी - ३० ते ४०

जागतिक स्तरावर सायबरच्या आर्थिक फसवणुकीचे प्रमाण हे वार्षिक १३ ट्रिलियन डॉलर इतके आहे. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता सायबर गुन्ह्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टासारखे विशेष न्यायालय असणे आवश्यक आहे. ज्या योगे फसवणुकीचे प्रमाण कमी होऊ शकेल. सायबर गुन्ह्याच्या केस सोडविण्यासाठी सायबर न्यायालयासह न्यायाधीशांची संख्या वाढविण्याची गरज आहे. माहिती तंत्रज्ञान कायदा आणि भारतीय न्याय संहिता कायदा आरोपींना शिक्षेसाठी पुरेसा आहे. मात्र, सध्या ७३ लाखांच्या शहरासाठी केवळ १ टीम कार्यरत आहे. जिल्हा व सत्र पातळीवर सायबर न्यायालये नाहीत. आंतराष्ट्रीय स्तरावर पाहिले, तर क्रॉस बॉर्डर तपासाची कोणतीही यंत्रणा नाही.

**— ॲड. चिन्मय भोसले,** ज्येष्ठ विधिज्ञ

सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी सायबर सेलचे मनुष्यबळ अपुरे पडत आहे. सायबर गुन्ह्याचा तपास खूप क्लिष्ट असतो. सायबर सेलकडे दिवसाला २५ ते ३० तक्रारी येतात. अशा गुन्ह्यात फसवणूक झालेली रक्कम, वापरण्यात आलेली बँक खाती याचे विश्लेषण केले जाते. त्यामुळे गुन्ह्याचा उलगडा होण्यासाठी वेळेची निश्चित मर्यादा नसते. त्याला दोन वर्षे देखील लागू शकतात. गुन्ह्याच्या तपासासाठी सायबरची एक टीम बाहेर गेली, तर ती तपास करून येण्यास दहा दिवस लागतात. यात इतर पोलिसांवर कामाचा ताण येतो. आम्ही आरोपीवर सात दिवसांत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करतो, पण आमचा समांतर तपास चालू असतो.

**— स्वप्नाली शिंदे,** वरिष्ठ पोलिस निरीक्षक सायबर सेल.

## ? पुण्यात काय घडतंय...

### ग्रंथ प्रदर्शन आणि ग्रंथोत्सव



- **आयोजक :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग ग्रंथालय संचालनालय, मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, पुणे
- **उदघाटन हस्ते :** चंद्रकांतदादा पाटील ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री)
- **कार्यक्रमाच्या अध्यक्षा :** ज्येष्ठ लेखिका मंगला गोडबोले
- **डॉ. कुमार सप्तर्षी यांचे व्याखान** ( अध्यक्ष महाराष्ट्र गांधी स्मारक निधी) वेळ: दुपारी ३ वाजता
- **प्रसिध्द एकपात्री अभिनेते** मकरंद टिल्लू यांचा एकपात्री प्रयोग: दुपारी ४ वाजता

- **कुठे :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, कोथरुड
- **कधी :** बुधवार दि. २२ जानेवारी, सकाळी १० ते सायंकाळी ५
- **शुल्क :** कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला

## Selected

### सरहद शाळेत ' मिष्टी गोष्टी' कार्यक्रम संपन्न



**पुणे :** ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे औचित्य साधून सरहद ग्लोबल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज गुजर- निंबाळकरवाडी शाखेमध्ये "मिष्टी गोष्टी" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी कलाकार, दिग्दर्शक, रंगभाषा कला अकादमीचे संस्थापक अमृत श्रीधर सामक हे लाभले.आपल्या मधुर वाणीने त्यांनी मुलांना मंत्रमुग्ध केले. तसेच प्रेरणादायी गोष्टींचा खजिना मुलांपुढे उघडला. व. पु. काळे त्याचबरोबर मराठी लेखकांचा मुलांना गोष्टीरूपाने नव्याने परिचय करून दिला.मुलांनी या खजिण्याचा मनमुराद आनंद लुटला. मुलांमध्ये गोष्टींच्या माध्यमातून समाज जागृती व्हावी, तात्पर्य समजून घेऊन मुलांच्या वागण्यामध्ये दैनंदिन जीवनामध्ये बदल व्हावा हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

### वृक्षारोपण ही काळाची गरज : प्रदीप कंद



**पुणे :** माहिती सेवा समितीचे महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष आणि बकोरी येथील ओसाड डोंगरावर वनराईची निर्मिती करून त्यामध्ये ५० हजार पेक्षा जास्त झाडे लावून समाजामध्ये पर्यावरण विषयी जनजागृती करून निसर्गाचा समतोल राखल्याबद्दल वृक्षप्रेमी चंद्रकांत गोविंद वारघडे यांचा वाघोली क्रिकेट असोसिएशन आणि युवराज कटके सोशल फाउंडेशन कडून नुकताच समाज भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.वाघोली क्रीकेट असोसिएशन व युवराज कटके फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने समाजामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात अतुलनीय काम करणाऱ्या व्यक्तींना विविध पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये बकोरी देवराई वनराई प्रकल्पाचे संस्थापक चंद्रकांत वारघडे तसेच वाघोली येथील केसनंद फाटा आणि परिसरामध्ये नेहमीच वाहतूक व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी अनेक वर्षांपासून अहोरात्र कष्ट घेणारे संपत गाडे, केसनंद गावामध्ये बाबामहाराज वृक्ष संवर्धन समिती आणि झाड फाउंडेशनच्या माध्यमातून तलाव निर्मिती आणि ५० हजार पेक्षा जास्त झाडे लावून वृक्षारोपणामध्ये आपला वेगळा ठसा उमटविणारे केसनंद गावचे माजी सरपंच दत्तात्रय हरगुडे आणि चंद्रकांत नाकतोडे या मान्यवरांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

### नद्यांना प्रदूषण मुक्त ठेवा : कॅप्टन आनंद दीक्षित



**पुणे :** पर्यावरण संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, आज ओशन सेव्हर्स ऑफ इंडिया(,इंडियन मॅरीटाईमची शाखा) इंडिया सी स्काऊट्स व गाईड्स आणि रोटरी क्लब ओफ पुणे सेन्ट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने बंड गार्डन मेट्रो स्टेशन जवळील मुळा- मुठा संगम नदी किनारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.
स्वच्छता मोहिमेचे उद्घाटन इंडियन मॅरीटाईम फाऊंडेशनचे आय एम फ चे अध्यक्ष कॅप्टन आनंद दीक्षित यांच्या हस्ते करण्यात आले.या वेळी ओशन सेव्हर्स ऑफ इंडिया तर्फे कमोडोर पी.के.मल्होत्रा, श्री.येझदी बाटलीवाला, मैथिली मनकवाड, सी स्काऊट्स ऍन्ड गाईड्स चे कैप्टन सुपरिटेडन्ट, डॉ गोपी शेट्टी , शगुफ्ता अन्वर ,अंजुमन आय इस्लामचे पोलीटेकनिक फॉर गर्ल्स च्या विद्यार्थिनी व प्राध्यापक ,कर्नल जुलिअस रॉक, विविध संस्थाचे सदस्य, पालक व नागरिक उपस्थित होते.

## 'मी गीता बोलतीय' पुस्तक प्रकाशन सोहळा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भौतिक जीवन जगत असताना अनेकदा आपल्यावर अनेक संकट येतात. त्यावेळी नेमके काय करावे, कसे वागावे हे कळत नाही. अशा परिस्थितीतच भगवान कृष्णाने अर्जुनाला दिलेली शिकवण ही आजही २१व्या शतकात उपयोगी पडते. भौतिक जीवनामध्ये आदर्श जीवनपद्धती कशी जगावी याचा मार्ग भगवद्गीतेमध्ये सांगितला आहे. भगवद्गीता ही भारतीय तत्वज्ञानाचा गाभा आहे, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

अमिताभ होनप लिखित 'मी गीता बोलतीय' या भगवदगीतेचे उत्कंठावर्धक वर्णन करणाऱ्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी भारतीय पुस्तक न्यासाचे विश्वस्त राजेश पांडे, गीता धर्म मंडळाच्या कार्यवाह विनया मेहेंदळे, लेखक धनंजय गोखले, जनसेवा फौंडेशन चे अध्यक्ष डॉ. विनोद शहा, लेखक अमिताभ होनप उपस्थित होते. यावेळी धनंजय गोखले, डॉ. शहा आणि विनया मेहेंदळे, यांनी पुस्तकामागील भूमिका मांडली.

**प्रकाशन**

व्यवहारी जीवनात अनेकदा भगवंत आपल्याला आठवतो, ते शब्दबद्ध करणे प्रत्येकाला जमतेच असे नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे हा ग्रंथ. माणसाने फळाची अपेक्षा न करता नेहमी चांगले काम केले पाहिजे. ते काम करत असताना भगवंताची आठवण ठेवली पाहिजे हाच उपदेश भगवदगीतेत केला आहे. प्रत्येकाचे समाजाला काहीतरी देणे असते आणि आपल्या प्रत्येकाने आपल्या भूमिकेतून ते दिले पाहिजे.

**— राजेश पांडे,**
विश्वस्त, भारतीय पुस्तक न्यास

अमिताभ होनप म्हणाले, भगवदगीतेत भगवान कृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश हा अत्यंत भावनिक आहे. ही भावनिकता स्त्रीच्या भूमिकेतून मांडण्याचा विचार आला तेव्हा स्वतः गीतेच्या मनातून गीतेचे कथन व्हावे, हा विचार मनात आला. भगवद्गीता हे तत्वज्ञान आहे आणि त्याचे सार सोप्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकाच्या माध्यमातून केला आहे. तत्वज्ञानाचा हा मार्ग दाखविण्याचे कार्य मी या पुस्तकाच्या माध्यमातून एका निराळ्या पद्धतीने केले आहे,

## फुकट्या प्रवाशांचे 'रिटर्न गिफ्ट'

### पीएमपीचे अठरा हजार फुकटे प्रवासी तिकिट तपासणीसाच्या ' जाळयात'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कारवाईचा बडगा उगारुनही ' पीएमपीएमएल'च्या फुकट्या प्रवाशांची संख्या अद्यापही रोडावलेली नाही; विशेष म्हणजे सरत्या वर्षात तब्बल १८ हजाराहूनही अधिक फुकट्या प्रवाशांनी या बसमधून प्रवास केला असून त्यापोटी त्यांनी प्रशासनाला चक्क सव्वाकोटी रुपयांचा ' आहेर' केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. त्यामुळे फुकट्या प्रवाशांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे, त्यातूनच प्रशासनाची डोकेदुखी पुन्हा एकदा वाढली आहे.

पीएमपी सर्वसामान्यांची जीवनवाहिनी असूनही काही प्रवासी नियमांचे पालन करत नाहीत. महामंडळाकडून किफायतशीर दरात सेवा दिली जाते, तरीही नियमभंगाचे प्रकार थांबत नाहीत. अधिकाऱ्यांनी सातत्याने कारवाई करून दंड वसूल केला तरी हा प्रश्न कायम आहे. महामंडळाने दिलेल्या आकडेवारीनुसार दररोज सरासरी ४५ ते ५० जण विनातिकीट प्रवास करतात, तर दिवसाला सरासरी २५ हजार ३५५ रुपयांची दंडवसुली केली जाते. प्रवाशांनी नियमांचे पालन करणे आवश्यक असून, दंड टाळण्यासाठी प्रवाशांनी नेहमी वैध तिकीट बाळगावे.

कोणत्याही थांब्यावर बस थांबल्यानंतर प्रवासी मागच्या दाराने बसमध्ये शिरतो, त्यानंतर तो थेट पुढच्या दारापर्यंत निघून जातो. आम्हाला त्याची माहिती असल्याने गर्दीतही अशा फुकट्या प्रवाशांवर नजर ठेवली जाते, तरीही अनावधानाने आमच्या नजरेतून सुटत असतो. विशेष म्हणजे पास सुरु झाल्यानंतर या फुकट्या प्रवाशांची संख्या वाढली असून पास नसला तरी ते पास असल्याचे खोटे सांगत आहेत, त्याचा नाहक त्रास आम्हालाही सहन करावा लागत आहे.

**— राजेंद्र पवार,** वाहक, पीएमपीएमएल

महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) बसमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढतच चालली आहे. मागील वर्षभरात तब्बल १८ हजार प्रवाशांनी विनातिकीट प्रवास केल्याचे उघड झाले असून, त्यांच्याकडून १ कोटीहून अधिक दंड वसूल करण्यात आला आहे.

महामंडळाने १ जानेवारी ते २३ डिसेंबर २०२४ या कालावधीत १८ हजार १०४ विनातिकीट प्रवाशांना पकडले. या कारवाईतून एकूण १ कोटी ३३ लाख २८ हजार ६०० रुपयांची दंडवसुली झाली आहे. पीएमपीच्या वारंवारच्या प्रयत्नांनंतरही विनातिकीट प्रवासाचे प्रमाण घटण्याऐवजी वाढत आहे.

## बोपदेव घाटात दहशत; सातजणांना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बोपदेव घाट परिसरात तरुणावर कोयत्याने वार करून दहशत माजविणाऱ्या सात आरोपींना कोंढवा पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून चार धारदार शस्त्रे आणि वाहने असा सुमारे तीन लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,बोपदेव घाट परिसरातील ट्रिनिटी महाविद्यालयासमोर रस्त्यावर १६ जानेवारी रोजी दुपारी काही तरुणांमध्ये भांडण झाले होते. त्यात आरोपींनी विश्वजित बाबाजी हुलवळे (वय १९, रा. येवलेवाडी) याच्यावर कोयत्याने वार करून गंभीर जखमी केले होते.

## पुण्यात ४९ रुपयांत १० चित्रपट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** पुण्यात २२ आणि २३ जानेवारी रोजी ४९ रुपयांमध्ये मराठी चित्रपट पाहता येणार आहेत ते मराठी फिल्म असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या चित्रपट महोत्सवामध्ये. २२ आणि २३ जानेवारी रोजी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. नुकतेच रिलीज झालेले काही दर्जेदार मराठी चित्रपट या महोत्सवात प्रेक्षकांना पाहण्यासाठी संधी मिळणार आहे.

चित्रपट महोत्सवाचं आयोजक कौस्तुभ कुलकर्णी यांनी सांगितले की, महोत्सवात एकूण १०चित्रपट दाखवले जाणार आहेत. यामध्ये अलीकडेच प्रदर्शित झालेल्या पाणी पुरी, मुक्काम पोस्ट बोंबीलवाडी, हॅशटॅग तदेव लग्नम, धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज, अल्याड पल्याड, आणि श्रीगणेश या चित्रपटांचा समावेश आहे. विशेष म्हणजे हे चित्रपट केवळ ४९ रुपयांत पाहता येणार आहेत.

गेल्या काही वर्षांत मराठी चित्रपटांना प्राइम टाइम मिळत नाही, तसेच त्यांना चित्रपटगृहांमध्ये पुरेसा वेळ व स्क्रीनिंगची संधी मिळत नसल्याची खंत सिनेउद्योगातून व्यक्त होत आहे. त्यामुळेच नाट्यगृहांमध्ये या चित्रपटांचं स्क्रीनिंग करून अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याचा हा प्रयत्न असल्याचं आयोजकांनी सांगितलं.

या महोत्सवाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तिकीट विक्री सुरू झाल्यानंतर काही तासांतच १२०० पेक्षा जास्त तिकीटांची विक्री झाली आहे, असेही आयोजकांनी नमूद केले.

## श्री मंडई म्हसोबा दिनदर्शिकेचे प्रकाशन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्ट, पुणेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या श्री मंडई म्हसोबा दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाला. हा विशेष सोहळा धर्मवीर आनंद दिघे यांच्या कार्यप्रेरित आनंद आश्रम येथे पार पडला.

यावेळी खासदार नरेश म्हस्के देखील उपस्थित होते. ट्रस्टचे अध्यक्ष राहुल सूर्यवंशी, उपाध्यक्ष निवृत्ती जाधव यांनी एकनाथ शिंदे यांचा सन्मान करून त्यांचे आभार मानले. ट्रस्टचे सदस्य सुधीर साकोरे, राज वांजळे, वेदांत सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

**प्रकाशन**

एकनाथ शिंदे त्यांनी ट्रस्टच्या कार्याची माहिती घेतली आणि कार्य अहवालाचे कौतुक केले. यावेळी त्यांनी ट्रस्टच्या सदस्यांना एकत्र राहून धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात योगदान देण्याचे आवाहन केले. श्री मंडई म्हसोबा दिनदर्शिका हा धार्मिक कार्याचा एक उत्तम मार्गदर्शक असून त्याला महाराष्ट्रभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल अशी आशा व्यक्त करण्यात आली.

## मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी संवाद स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी बोलण्याविषयीचा न्यूनगंड कमी व्हावा, यासाठी नातूबाग परिसरातील आदर्श शिक्षण मंडळी, माजी विद्यार्थी संघटनेतर्फे दरवर्षी श्रीकांत भावे स्मृती करंडक 'इंग्रजी संवाद स्पर्धेचे' आयोजन केले जाते. स्पर्धेचे यंदा १३ वे वर्ष असून २२ जानेवारी रोजी सदाशिव पेठेतील उद्यान प्रसाद कार्यालय येथे स्पर्धा होणार आहे, अशी माहिती स्पर्धा प्रमुख प्रशांत मते व डी.पी.जोशी यांनी दिली.

स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ९.३० वाजता होणार आहे आणि बक्षीस समारंभ त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे.

प्रशांत मते म्हणाले, भविष्यातील इंग्रजीचे महत्त्व ओळखून कै. श्रीकांत भावे यांनी इंग्रजी भाषेविषयी असलेला विद्यार्थ्यांमधील न्यूनगंड घालविण्यासाठी अपार कष्ट घेतले होते. ही स्पर्धा श्रीकांत भावे यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित केली जाते. यास्पर्धेमुळे मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची भिती नाहीशी होत असून आज ते विद्यार्थी सफाईदारपणे इंग्रजी बोलत आहेत, हे या स्पर्धेचे यश आहे.

छोट्या गटासाठी स्पर्धेचे विषय युवर हॅप्पी ईस्ट मेमोरीज, हार्डवर्क और स्मार्टवर्क, इफ आय बिकम अ प्राईम मिनिस्टर ऑफ इंडिया, इफ एलियन ऍक्च्युली लँड ऑन अर्थ, इफ युवर फेवरेट कार्टून कॅरेक्टर मीट यू इन रियल लाईफ असे असणार आहेत. तर मोठ्या गटासाठी एक्सप्लोर लाईफ विथ ट्रॅव्हलिंग टू डिफरंट प्लेस, टेक्नॉलॉजी - द डेथ ऑफ लायब्ररीज, कॅशलेस सोसायटी - युवर थॉट ओन बीइंग कॅशलेस, हाऊ कॅन इंडिया बिकम सुपरपॉवर, अ डे विथ डिजिटल डिटॉक्स असे असणार आहेत.

## ग्राहक पेठ आणि पारले तर्फे आंतरशालेय चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण

# लहानांच्या कलागुणांना वाव देण्याची गरज : शिल्पी सिन्हा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्याच्या काळामध्ये तंत्रज्ञानामुळे लहान मुलांना मोबाईल आणि टीव्हीची सवय लवकर लागते. त्यामुळे त्यांच्यातील कला गुणांकडे मात्र दुर्लक्ष होते .बालपण निघून गेल्यावर पुन्हा कलागुण आत्मसात करणे अवघड जाते, त्यामुळे चित्रकलेसारख्या माध्यमातून लहान मुलांच्या कलागुणांना शालेय जीवनातच प्रोत्साहन देण्याची गरज आहे, असे मत पारले कंपनीच्या नॅशनल सेल्स मॅनेजर शिल्पी सिन्हा यांनी व्यक्त केले.



ग्राहक पेठ आणि पारले तर्फे आंतरशालेय चित्रकला स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

ग्राहक पेठ आणि पारले तर्फे आंतरशालेय चित्रकला स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन सदाशिव पेठेतील भावे प्राथमिक शाळेच्या सभागृहात करण्यात आले होते. यावेळी ग्राहक पेठेचे कार्यकारी संचालक सूर्यकांत पाठक, पारले कंपनीचे रिजनल सेल्स मॅनेजर उमेश कामथ, कार्तिक शहा, ग्राहक पेठेच्या उपाध्यक्ष संध्या भिडे, शिवराम हाके आदी यावेळी उपस्थित होते.

पुणे शहर आणि परिसर ४२ शाळांमधील सहा हजारांकडून अधिक विद्यार्थी या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. त्यापैकी १८विद्यार्थ्यांना या प्रसंगी विविध विभागांमध्ये पारितोषिके प्रदान करण्यात आले. प्रथम क्रमांकाची ट्रॉफी डीईएस न्यू इंग्लिश स्कूल शनिवार पेठ यांना तर दुसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या भावे स्कूलला प्रदान करण्यात आली.

**केवळ विविध उत्पादने विकून नफा कमावणे हे ग्राहक पेठेचे उद्दिष्ट नाही, तर ग्राहकांचे प्रबोधन आणि ग्राहकांचे संरक्षण करणे हे ग्राहक पेठेचे मुख्य काम आहे. ग्राहक पेठेचा बिस्किटाचा गणपती संपूर्ण देशामध्ये प्रसिद्ध आहे. यामध्ये पारले कंपनीचे मोठे योगदान असून हा उपक्रम गेल्या २५ वर्षांपासून सुरू आहे."**

**— सूर्यकांत पाठक,**
कार्यकारी संचालक, ग्राहक पेठ

शिल्पी सिन्हा म्हणाल्या, पारले बिस्किटापासून ते चॉकलेट पर्यंत सर्व उत्पादनांच्या माध्यमातून पारले कंपनी लहान मुलांपर्यंत आणि देशातील प्रत्येक घरामध्ये पोहोचली आहे. देशामध्ये असे कोणतेही घर नसेल त्या ठिकाणी पारले उत्पादन नाही. त्यामुळे या माध्यमातून एक प्रकारे पारले कंपनीने चित्रकला आणि त्यातून संस्कार मुलांच्या घराघरापर्यंत पोहोचवण्याचे काम केले आहे. अशा प्रकारच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांना पारले कंपनीचा निश्चितच पाठिंबा राहिला आहे.

#रा

## At a Glance

### मोटारीची काच फोडून साडेदहा लाखांची रोकड लांबविली

**पुणे :** व्यावसायिकाने रस्त्याच्या कडेला लावलेल्या मोटारीची काच फोडून चोरट्यांनी दहा लाख ५१ हजार रुपयांची रोकड चोरुन नेल्याची घटना विमाननगर भागात घडली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला.नितेशकुमार राजकुमार शहा (वय ३४, रा. चारकोप, कांदिवली, मुंबई) यांनी याबाबत विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### कारवाईची भीती दाखवून महिलेची १३ लाखांची फसवणूक

**पुणे :** काळ्या पैसे व्यवहारात कारवाईची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी पाषाण भागातील एका महिलेची १३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध बाणेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत एका महिलेने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### रोखपालाने केला दोन कोटींचा अपहार

**पुणे :** कोरेगाव पार्क भागातील एका खासगी कंपनीतील रोखपालाने दोन कोटी रुपयांचा अपहार केल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी रोखपालाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत खासगी कंपनीचे मालक जिनेंद्र दिलीप दोशी (वय ३८, रा. कोरेगाव पार्क) यांनी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, रोखपालाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# नाशिक रेल्वेचे नाराजीनाट्य

## सत्ताधारी विरोधकांचे जुन्या मार्गासाठी : 'झुकझुक', नमनालाच ' घडाभर तेल'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** पुणे- नाशिक रेल्वेच्या संदर्भात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुणे भेटीत मोठे काहूर उठवून दिले आहे, त्यामुळे ही रेल्वे आणि प्रकल्प अद्याप 'यार्डात' असतानाच महायुती आणि विरोधकांमध्येही नाराजीनाट्य सुरु झाले असून हा प्रकल्प जुन्या मार्गावरच साकारावा असा ठेका धरला आहे. नेत्यांच्या या ' झुकझुक' भूमिकेमुळे या प्रकल्पाच्या नमनालाच घडाभर तेल ओतले गेले आहे.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव नुकतेच पुणे दौऱ्यावर आले असताना, त्यांनी पुणे-नाशिक नवा रेल्वेमार्ग प्रस्तावित केल्याची माहिती दिली होती. सध्याच्या पुणे-नाशिक द्रुतगती रेल्वेमार्गामध्ये जुन्नर तालुक्यातील खोडद गावातील जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (जीएमआरटी) हा सर्वांत मोठा दुर्बीण संशोधन प्रकल्प येतो. या मार्गासाठी तो हलविणे उचित ठरणार नाही, अशी भूमिका घेऊन वैष्णव यांनी, 'जीएमआरटी' प्रकल्पाला धक्का न लावता पुणे-अहिल्यानगर-शिर्डी-नाशिक या नवीन रेल्वे मार्गाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचा आदेश दिला असल्याचे सांगितले. मात्र, या नव्या मार्गाला स्थानिकांचा आणि लोकप्रतिनिधींचा विरोध होताना दिसतो आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे खासदार अमोल कोल्हे, अपक्ष आमदार सत्यजित तांबे, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी नवीन मार्गाला विरोध दर्शविला आहे, तर सत्ताधारी महायुतीतील माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार दिलीप मोहिते-पाटील यांनीदेखील जुन्या मार्गावरूनच रेल्वे जावी, अशी भूमिका घेतली आहे. यासाठी प्रसंगी जनआंदोलन उभारण्याचीही तयारी असल्याचे लोकप्रतिनिधींनी सांगितले.

### जुन्या मार्गाची वैशिष्ट्ये

- जुना मार्ग : पुणे-अहिल्यानगर-नाशिक
- रेल्वेचा वेग : प्रतितास २०० कि.मी.
- १८ बोगदे, ४१ उड्डाणपूल, १२८ भुयारी मार्ग
- विद्युतीकरणासह एकाच वेळी दुहेरी रेल्वे मार्गाचे काम
- खर्चाचा वाटा : ६० टक्के वित्तीय संस्थांकडून आणि राज्य सरकार व रेल्वे प्रत्येकी २० टक्के
- भूसंपादनासाठी १२०० ते १५०० कोटी रुपयांची गरज

राष्ट्रसंचार EXCLUSIVE



नाशिक रेल्वे प्रकल्पाबाबत महारेल आणि रेल्वे विभागात समन्वय नाही. पुण्यावरचा ताण कमी करण्यासाठी पुणे ते कोल्हापूर, पुणे ते नाशिक, पुणे ते अहिल्यानगर अशी शहरे जोडणे महत्त्वाचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार या प्रकल्पाबाबत सकारात्मक आहेत. नवीन मार्ग रद्द करून जुना मार्गच निश्चित करावा, यासाठी त्यांची पुन्हा भेट घेऊ.

**— सत्यजित तांबे,** अपक्ष आमदार



मार्गाचे प्रथम सर्वेक्षण करताना 'जीएमआरटी' प्रकल्प नव्हता का? त्या वेळी सर्वेक्षण बरोबर असल्याचे सांगून खेड, हवेली तालुक्यात ३०० हेक्टरहून अधिक भूसंपादन करण्यात आले आहे. शेतमालाच्या बाजारपेठांसाठी हा मार्ग फायदेशीर आहे. हा मार्ग बदलू नये, यासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहे.

**— दिलीप मोहिते पाटील,** माजी आमदार, रा. काँ. अजित पवार



या प्रकल्पामुळे खेड, आंबेगाव, जुन्नर तालुक्यातील शेती, औद्योगिक, व्यावसायिक धोरणांना मोठी चालना मिळणार आहे. जीएमआरटी प्रकल्पाबाबत तांत्रिक अडचणी असल्या, तरी त्यावर पर्यायी मार्ग असून, थेट मार्ग वळवणे धोक्याचे आहे. कारण, अनेक ठिकाणी भूसंपादन करण्यात आले आहे. 'जीएमआरटी'च्या प्रशासनासोबत लवकरच संयुक्त बैठक घेऊन मार्ग काढू. **— डॉ. अमोल कोल्हे,** खासदार, राष्ट्र. काँग्रेस (शरद पवार)



जुन्या मार्गासाठी सिन्नर, संगमनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणात भूसंपादन करण्यात आले आहे. हा प्रकल्प उद्योग, तसेच शेतकरी, नोकरदारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. याबाबत येत्या संसदीय अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्यात येईल.

**— राजाभाऊ वाजे,** खासदार, शिवसेना (उद्धव ठाकरे)

आमच्या भागातून रेल्वे प्रकल्प गेल्याने शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. पुणे-नाशिक या दोन्ही शहरांच्या मध्यवर्ती भागांना बाजारपेठांत मालाची ने-आण करण्यासाठी याचा फायदा होईल. शेतमाल वाहतूक आणि औद्योगिकदृष्ट्याही याचा फायदा होईल. आम्ही स्वखुशीने जमीन देण्यास तयार आहोत.

**— किसन सहाने,** प्रकल्पबाधित शेतकरी

# राष्ट्रवादीची ' दादागिरी' भाजपाला पडणार 'भारी'

## राष्ट्रवादी काँग्रेसला पुणे जिल्ह्यासह शहरात ताकद वाढण्यास पोषक वातावरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** जिल्ह्यात पालकमंत्री पदाचा एडव्हांटेज राष्ट्रवादीला मिळण्याची शक्यता असून भाजप बॅक फुटवर जाईल अशा चर्चा सुरू झाल्या आहेत. तर असे भाजप नेते खाजगीत बोलून दाखवत आहेत. महायुतीमधील पालकमंत्री पदाच्या वाटाघाटींमध्ये पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद राखण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना यश आले आहे. त्यामुळे आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेसची पुणे जिल्ह्यासह शहर व पिंपरी-चिंचवडमध्ये ताकद वाढण्यास पोषक वातावरण निर्माण होणार आहे.त्याचा परिणाम पुणे जिल्हा परिषद, पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकांच्या निवडणुकीवर पडू शकतो.

राजकीय

आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. या निवडणुका महायुती म्हणून भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी एकत्रित लढणार आहे. मात्र पुणे जिल्हा परिषद आणि दोन्ही महापालिकांमध्ये भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढविण्याची जास्त शक्यता आहे.

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेवर मागील निवडणुकीत भाजपने स्वबळावर सत्ता स्थापन केली होती. अजित पवार पालकमंत्री असताना भाजपच्या स्थानिक नेत्यांना या दोन्ही महापालिकेवर पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी कसरत करावी लागणार आहे. तर गेल्या काही वर्षांपासून पुणे जिल्हा परिषदेवरती राष्ट्रवादीचे निर्विवाद वर्चस्व होतं. भाजपची ताकद कमी आहे पुणे ग्रामीणमध्ये दौंड मतदारसंघाच्या रूपाने केवळ एकमेव भाजपचा आमदार आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये देखील धबधबा ग्रामीण भागात पाहायला मिळण्याची दाट शक्यता आहे.

- आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहे. अशा वेळी जिल्हा नियोजन समितीतील विकासकामे, तसेच शहरातील विकास प्रकल्पांसाठी पालकमंत्र्यांची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. निधीवाटप करताना महायुतीमध्ये पालकमंत्री म्हणून अजित पवार हे राष्ट्रवादी पक्षाला अधिक निधी पदरात पाडून घेतात.
- निधी वाटपावरून महायुतीमधील कार्यकर्त्यांमध्ये त्यामुळे गेल्या अडीच वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी नाट्य पाहिला मिळाले. त्यामुळे येत्या पाच वर्षांमध्ये जिल्हा नियोजन समितीच्या निधीवाटपाचे धोरण महायुतीमध्ये कसे आखणार, याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले असून भाजपचे स्थानिक पदाधिकारी मात्र धास्तावाले आहेत.

# सिंहगडरोडला धरण उशाला; आजार घशाला...!

## खडकवासला परिसरातील नागरिक अशुद्ध पाण्यामुळे त्रस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संपूर्ण शहराला पाणीपुरवठा करत असलेल्या खडकवासला धरण साखळीतील हजारो नागरिकांना चक्क दूषित पाण्याचा पाणीपुरवठा होत असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे, त्यामुळे त्यांची अवस्था ' धरण उशाला आणि आजार घशाला' अशी झाली आहे.

महापालिकेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या धायरी, किरकटवाडी, नांदोशी, खडकवासला परिसरात काही ठिकाणी गाळमिश्रित दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे. यामुळे लहान मुलांसह नागरिकांना उलट्या, अतिसार, गॅस्ट्रो आदी साथीच्या आजारांना तोंड द्यावे लागत आहे. यामुळे परिसरातील दवाखान्यांमध्ये नागरिकांची उपचारासाठी गर्दी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

महापालिका प्रशासन पाण्याचे शुद्धीकरण करून पाणीपुरवठा करीत असल्याचा दावा करीत आहे. मात्र, या गावांमध्ये जलशुद्धीकरण प्रकल्प नसल्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. या गावांमध्ये ग्रामपंचायत काळातील जलवाहिन्यांतून पाणीपुरवठा होत आहे.

या जलवाहिन्या जीर्ण झाल्याने त्यांच्यात दूषित पाणी मिसळत असून तेच परिसरातील नागरिकांना प्यावे लागत आहे. खडकवासला धरणाखालील परिसरामधील रहिवाशांना अपुरा आणि दूषित पाणीपुरवठा होत आहे. धायरी येथील डीएसके गृहप्रकल्प, रायकर मळा, गावठाण, महादेवनगर, पोकळेनगर तसेच नांदोशी, किरकटवाडी आदी ठिकाणी महिनाभरापासून गढूळ पाणी येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. याकडे धायरीचे माजी उपसरपंच संदीप चव्हाण, किरकटवाडीचे सुभाष हगवणे यांनी लक्ष वेधले आहे.

सुभाष हगवणे म्हणाले, महापालिका केवळ नागरिकांकडून कराची वसुली करीत असून, मूलभूत सुविधा पुरविण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी; अन्यथा नागरिकांच्या वतीने निषेध मोर्चा काढण्यात येणार आहे.

सिंहगड रोड पाणीपुरवठा विभागाच्या कनिष्ठ अभियंता अक्षय गावित, पर्यवेक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांना पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी दिवस-रात्र धावपळ करावी लागत आहे. लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने नव्हे, धायरी आदी ठिकाणची पाणीपुरवठा यंत्रणा कोलमडली आहे.

धायरीपरिसरातील दूषित पाण्यामुळे उलट्या, अतिसार, गॅस्ट्रो आदी आजारांनी नागरिक आजारी पडत आहेत. या गावांचा महापालिकेत समावेश होऊन ७ वर्षे झाली तरीही अद्याप एकाही गावात प्रशासनाने जलशुद्धीकरण प्रकल्पाची सुविधा उपलब्ध केली नाही. ग्रामपंचायत काळातील जीर्ण झालेल्या जलवाहिन्यांतून सध्या पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने नागरिकांना दूषित पाणी मिळत आहे.

**- जांबुवंत कांबळे,** पर्यवेक्षक, सिंहगड रस्ता पाणीपुरवठा विभाग

पाणी शुद्धीकरण यंत्रणा नसल्याने टाकीतील पाण्यात टिसेल पावडर टाकून निर्जंतुकीकरण केले जात आहे. त्यानंतरच पाणीपुरवठा केला जात आहे. पाणी गढूळ असले तरी ते पिण्यासाठी योग्य आहे.

**- संदीप चव्हाण,** माजी उपसरपंच

# 'एमबीए' अभ्यासक्रम दूरस्थ आणि ऑनलाइन पद्धतीने राबवणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुक्त आणि दूरस्थ अध्ययन प्रशाळेतर्फे व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी (एमबीए) अभ्यासक्रम दूरस्थ आणि ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या ऑनलाइन प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी सुरू करण्यात आली असून, २४ जानेवारी ही अंतिम मुदत आहे. प्रवेश परीक्षेची तारीख स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या मुक्त आणि दूरस्थ अध्ययन प्रशाळेचे संचालक डॉ. वैभव जाधव यांनी ही माहिती दिली.

या विभागातर्फे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम राबवण्यात येतात. आता त्यात एमबीए अभ्यासक्रमाची भर पडणार आहे. त्यानुसार या अभ्यासक्रमासाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रवेश परीक्षा संगणकाद्वारे घेतली जाणार आहे. दोन्ही अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना स्वतंत्र अर्ज भरावे लागतील. परीक्षेत वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची प्रश्नपत्रिका असणार आहे. परीक्षेसाठी एक तासाचा वेळ दिला जाणार आहे. ऑनलाइन आणि दूरस्थ अशा स्वतंत्र अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना ऑनलाइन किंवा दूरस्थ यातून एका प्रकारच्या अभ्यासक्रमाची निवड करावी लागणार आहे. प्रवेशानंतर अभ्यासक्रम बदलता येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्यापीठातर्फे पहिल्यांदाच एमबीए अभ्यासक्रम ऑनलाइन आणि दूरस्थ पद्धतीने राबवला जाणार आहे. या अभ्यासक्रमाला देशभरातून कोणालाही प्रवेश घेता येईल. मात्र, अभ्यास केंद्र विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, अहिल्यानगर, नाशिक या तीन जिल्ह्यांमध्येच असतील. प्रवेश परीक्षा ऑनलाइन आणि प्रॉक्टर्ड पद्धतीने घेतली जाणार आहे.

# खूनाचा प्रयत्न; सराईत अटकेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** सराइताने तरुणावर कोयत्याने वार केल्याची घटना वारजे भागात घडली. याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली. नागेश आनंदा वांजळे (वय ३४, रा. देवगिरी कॉलनी, गणपती माथा, एनडीए रस्ता, वारजे माळवाडी) असे जखमी झालेल्याचे नाव आहे.

वांजळे याच्या खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी चांगदेव उर्फ पप्पू अशोक वांजळे (वय ३७, रा. देवगिरी कॉलनी, गणपती माथा, एनडीए रस्ता, वारजे माळवाडी) याला अटक करण्यात आली. याबाबत नागेश वांजळे यांची आई कमल (वय ५८) यांनी वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नागेश आणि आरोपी चांगदेव यांच्यात वाद झाला होता. चांगदेव याची पार्श्वभूमी गुन्हेगारी असून, त्याच्याविरुद्ध यापूर्वी विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. रविवारी रात्री साडेअकराच्या सुमारास नागेश ते राहत असलेल्या इमारती जवळ थांबले होते. त्या वेळी चांगदेव तेथे आला. त्याने नागेश यांच्याशी वाद घालून शिवीगाळ केली. आरोपीने त्यांना माराहण करुन कोयत्याने वार केले. पोलीस उपनिरीक्षक सुनील जगदाळे तपास करत आहेत.

# एकजुट कामासाठी...!

पुणे

आपण म्हणतो सोशल मीडियाच्या जमान्यात मुलं मोबाईलच्या विश्वात रमली आहेत. पण आज देखील आपण कुटुंबाचे एक घटक असून आपण देखील कामाच्या भार थोडा सांभाळावा असा संदेश या भाऊ आणि बहिणीने दिला आहे. दैनिक राष्ट्र संचार चे कर्वेनगर भागातले वाचक शशांक मून यांनी छायाचित्रातून टिपलेले भावा बहिणीचे एकजुटीचे नाते.



# नियमाच्या चौकटीत राहून कार्याला गती देऊ : योगिता भोसले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** कुठल्याही दबावाला बळी न पडता कायद्याच्या चौकटीमध्ये राहून योग्य तो समन्वय साधून कामाला गती देऊ असे प्रतिपादन नूतन नगरसचिव योगिता भोसले यांनी केले. पुणे महानगरपालिकेच्या पहिल्या महिला नगरसचिव होण्याचा मान राज शिष्टाचार अधिकारी योगिता भोसले - कदम यांना मिळाला आहे.

शुक्रवारी पुणे महापालिकेच्या मुख्य सभेत ठरावाद्वारे त्यांची नियुक्ती झाली.

एक जून २०२३ पासून त्यांच्याकडे प्रभारी नगरसचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार होता परंतु आता ते पूर्णवेळ नगरसचिव आहेत.२०२० मध्ये नगरसचिव असलेले सुनील पारखे हे सेवानिवृत्त झाल्यानंतर २०२३ मध्ये दौंडकर यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला. आता दौंडकर हे सेवानिवृत्त झाल्यानंतर हा पदभार राजशिष्टाचार अधिकारी योगिता भोसले यांच्याकडे सोपविण्याचा निर्णय तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक विक्रमकुमार यांनी घेतला होता. तेव्हापासून त्या प्रभारी पदावर ती कार्यरत होत्या. आता नव्या ठरावा द्वारे त्या नगरसेवक म्हणून काम करतील. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये समन्वय राखून काम करण्याची मुख्य जबाबदारी त्यांच्यावर आहे.

# बांगलादेशी घुसखोरांची माहिती संकलित करा

## -पोलीस आयुक्त अमितेश कुमार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहर परिसरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले. शहरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांविरुद्ध पोलिसांनी शोधमोहीम हाती घेतली आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत वास्तव्य करणारे परप्रांतीय मजुरांची माहिती संकलित करण्यात यावी, तसेच बांगलादेशी घुसखोर आढळून आल्यास त्वरित कारवाई करावी, असे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना दिले आहेत.

क्राईम

पुणे स्टेशन परिसरात एका बांगलादेशी घुसखोर महिलेला बंडगार्डन पोलिसांनी नुकतेच पकडले. त्यानंतर शहरात गेल्या दहा वर्षांपासून बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकाला स्वारगेट पोलिसांनी महर्षीनगर परिसरातून ताब्यात घेतले. त्याच्याकडे बनावट आधार कार्ड, मतदार ओळखपत्र सापडले. महर्षीनगर भागात वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकाकडून परदेशी चलनही जप्त करण्यात आले होते.

# दिलासादायक.! दिव्यांगांना मिळणार तालुकास्तरावर प्रमाणपत्र



दिव्यागांची फरफट थांबविण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वीच हा निर्णय घेण्याची आवश्यकता होती, तरीही उशीरा का होइना पण शासनाने हा निर्णय घेऊन हजारो दिव्यागांना दिलासा दिला आहे. मात्र; आता यापुढील कालावधीत या निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे.

**-धर्मेंद्र सातव पाटील,** प्रदेशाध्यक्ष, दिव्यांग प्रहार क्रांती आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य शासनाने दिव्यागांसाठी मोठ्या प्रमाणावर सोयी सुविधा निर्माण केल्या आहेत; हे वास्तव असले तरीही त्यांना या सुविधा मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर काथ्याकुट करावा लागत आहे. या सुविधा मिळविण्यासाठी शासन दरबारी हेलपाटे मारताना हे दिव्यांग अक्षरश: हतबल झाले आहेत, त्यातूनच त्यांची फरफट होत आहे. त्यासाठी आंदोलने उभारुनही शासनाला जाग येत नव्हती. आता मात्र दिव्यागांच्या भावनांचा कडेलोट झाल्यानंतर शासनाला अखेर जाग आली असून दिव्यागांना तालुका पातळीवरच प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हा निर्णय दिव्यागांसाठी निश्चितच दिलासादायक ठरणार आहे.

पुणे : दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग प्रमाणपत्र देण्याची सुविधा आता तालुकास्तरावर उपलब्ध होणार आहे. तालुका स्तरावर १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपल्या स्तरावरून जिल्ह्यातील विशेषज्ञांची समिती स्थापन करावी आणि या समितीद्वारे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरे आयोजित करून प्रलंबित दिव्यांग प्रमाणपत्राचा निपटारा करावा, असे निर्देश सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालयांना आरोग्य विभागाने दिले आहेत.

सर्व २१ प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन दिव्यांगत्व प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात २१ प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत दिव्यांगत्व तपासणी, निदान करून व्यक्तींना संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र (यूडीआयडी कार्ड) देण्यासाठी तालुका स्तरावर सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने आरोग्य विभागाने हे आदेश दिले आहेत.

सरकारद्वारे विविध मंत्रालये आणि त्यांच्या विभागांद्वारे प्रदान केलेल्या योजनांचा लाभ अपंगांना या प्रमाणपत्रामुळे घेता येईल. हे प्रमाणपत्र संपूर्ण भारतात वैध असेल. अपंग व्यक्तींना कागदपत्रांच्या एकापेक्षा जास्त प्रती बनवण्याची, देखरेख करण्याची आणि अनेक कागदपत्रे बाळगण्याची गरज नाही कारण प्रमाणपत्रात सर्व आवश्यक तपशील आधीच नोंदवून ठेवलेले असतील जे वाचनयंत्राद्वारे उलगडले जाऊ शकतात. अपंग प्रमाणपत्र हे भविष्यात विविध फायद्यांचा लाभ घेण्यासाठी अपंग व्यक्तींची ओळख, पडताळणीचा एकमेव दस्तऐवज असेल. अपंग प्रमाणपत्र हे अंमलबजावणीच्या सर्व स्तरांवर जसे की गाव, गट, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तर, लाभार्थ्यांच्या भौतिक आणि आर्थिक प्रगतीचा मागोवा घेण्यास मदत करेल.

# पाणी उचलण्यास खुद्द 'जलसंपदाला' च अपयश

## शेतीसाठीच्या पुनर्वापराचे पाणी अवघे चाळीस टक्केच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महापालिकेने सांडपाण्यावर प्रक्रीया करून शेतीसाठी पुनर्वापराकरीता दिलेल्या पाण्यातून केवळ ४० टक्केच पाणी जलसंपदा विभाग घेत असल्याची माहीती पुढे आली आहे. नुकतेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुणे महापालिकेकडून प्रक्रीया केलेल्या पाण्याविषयी माहीती मागविण्याचे आदेश दिले आहेत, पण प्रत्यक्षात जलसंपदा विभागच पाणी उचलण्यास सक्षम नसल्याचे माहीती अधिकारातील माहीतीतून स्पष्ट होत आहे. सजग नागरीक मंचचे विवेक वेलणकर यांनी यासंदर्भात माहीती अधिकारात माहीती मिळविली आहे. त्याआधारे त्यांनी विखे पाटील यांना निवदेन दिले आहे.

पुणे शहराला केला जाणारा पाणी पुरवठा हा जलसंपदा विभाग आणी महापालिका यांच्यातील वादाचा मुद्दा नेहमीच ठरला आहे. पुण्याची वाढती लोकसंख्या, हद्दीत समाविष्ट होत असलेली गावे लक्षात घेऊन पुण्याचा पाण्याचा कोटा वाढला पाहिजे ही अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. तसेच महापालिका मंजुर कोट्या पेक्षा अधिक पाणी उचलत आहे. नुकतेच जलसंपदा विभागाची बैठक पुण्यात पार पडली. या बैठकीत पुणे महापालिकेकडून केली जाणारी वाढीव मागणीवर विखे पाटील यांनी प्रक्रीया केलेल्या पाण्याचा तपशील महापालिकेकडे मागितला होता. तसेच किती सांडपाणी प्रक्रिया करुन पुढे सोडते यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले होते.

पुण्याला ४ धरणांचं वरदान लाभलं आहे ज्यामध्ये २९ टिएमसी पाण्याचा साठा होतो. हे पाणी पुण्याच्या पाण्याची तसेच दौंड, इंदापूर पर्यंतच्या शेतीची तहान भागवते, पुण्याने जास्त पाण्याची मागणी केली की शेतीला पाणी कमी पडू शकते. यामुळे गेल्या काही वर्षांत विनाकारण शहरी विरुद्ध ग्रामीण असा पाण्याचा संघर्ष उभा राहीला आहे. यावर तोडगा म्हणून महापालिकेने वापरलेले पाणी प्रक्रिया करून शेतीला पुनर्वापरासाठी मिळावे याकरिता २०१५ मध्ये १०० कोटी रुपये वापरून मुंढवा जॅकवेल येथे पुण्याचे सांडपाणी प्रक्रिया करून शेतीसाठी पुनर्वापर करण्यासाठी प्रकल्प उभारला. यात रोज साडेपाचशे एमएलडी अर्थात वर्षाला ६.५ टिएमसी सांडपाणी प्रक्रिया करून शेतीसाठी पुनर्वापर करण्यासाठी उपलब्ध करण्याची क्षमता निर्माण केली गेली.

महापालिकेकडून सोडले जाणारे प्रक्रीया केलेले पाणी जलसंपदा विभाग वापरण्यास कमी पडला असा दावा वेलणकर यांनी माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीच्या आधारे केला.

२०१६ पासून २०२४ डिसेंबर अखेरपर्यंत *९ वर्षांत क्षमतेच्या जेमतेम ३५ टक्के ( २२.५ टिएमसी)* प्रक्रिया केलेले सांडपाणी जलसंपदा विभाग शेतीसाठी पुनर्वापर करु शकला. १ जानेवारी२०२५ पासून आजपर्यंत तर १०टक्के क्षमतेने पण शेतीसाठी पाणी उचलले गेले नाहीये. हे जलसंपदा खात्याचे अपयश आहे आणि त्यासाठी पुण्याच्या पाणीकोट्यातील वाढ रोखून धरणे निश्चितच अन्यायकारक आहे, असे वेलणकर यांनी नमूद केले.

### जलसंपदा विभागाच्या मागणीनुसार महापालिकेने प्रक्रीया केलेला पाणी पुरवठा

**वर्ष - टिएमसीनिहाय पुढील प्रमाणे :**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **२०१६ :** | २.५८ | **२०१९ :** | २.७७ | **२०२२ :** | १. ६६ |
| **२०१७ :** | १.९१ | **२०२० :** | २.२१ | **२०२३ :** | ३.७७ |
| **२०१८ :** | ३.५३ | **२०२१ :** | १.६८ | **२०२४ :** | २.४४ |



"मुंढवा जॅकवेल प्रकल्पातून शेतीसाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा १०० टक्के वापर करण्यास आपल्या खात्यास भाग पाडावे जेणेकरुन शेतीची गरज भागेल आणि पुण्याचा पाण्याचा कोटा २२ टिएमसी करुन द्यावा."

**— विवेक वेलणकर, अध्यक्ष, सजग नागरिक मंच, पुणे**

# कला शुद्धरुपात सादर होण्यासाठी नियमित रियाज करा : प्रमोद कांबळे

## भारतीय कला प्रसारिणी सभेतर्फे प्रमोद कांबळे यांचा अभिनव जीवन गौरव पुरस्काराने सन्मान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काम करताना लाभाचा अथवा सन्मानाचा विचार करू नका, हातात आलेले काम उत्कृष्ट कसे करता येईल, त्यात आपले वेगळेपण कसे दाखविता येईल, याचा विचार करा. यातून आपली कला शुद्ध होईल आणि सर्वांना भावेल. सतत कलेचा विचार करा, रोज रियाज करा असा सल्लाही प्रसिद्ध चित्रकार-शिल्पकार प्रमोद कांबळे यांनी विद्यार्थ्यांना दिला. भारतीय कला प्रसारिणी सभेतर्फे प्रमोद कांबळे यांचा अभिनव जीवन गौरव पुरस्कार देऊन आज सन्मान करण्यात आला. त्या वेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. पुरस्काराचे वितरण भारतीय कला प्रसारिणी सभेचे सचिव, कार्यक्रमाचे अध्यक्ष पुष्कराज भालचंद्र पाठक यांच्या हस्ते झाले.

समाजात अभावानेच आढळणाऱ्या चित्रकलेची साक्षरता वाढविली पाहिजे. सरकारी खुर्चीवर बसलेले अधिकारी कलाविषयात विशेषत: चित्र-शिल्पकलेत साक्षर नसल्यामुळे त्यांच्या सल्ल्याने तयार होणारी कलाकृती अपूर्ण अथवा अयोग्य होते आणि त्याचे समाजात हसे होते, अशी टिप्पणीही कांबळे यांनी या प्रसंगी केली.

प्रास्ताविकात पुष्कराज पाठक म्हणाले, चांगल्या व्यक्ती संस्थेची जोडल्या जाणे हे संस्थेचे भाग्य असते. उत्तम आणि गुणी माणसांमुळेच संस्थेच्या कार्याचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. विनम्रता ठेवल्यास सर्व गोष्टी मिळत जातात. विद्यार्थ्यांनी वाढत्या वयानुसार प्रगल्भ होत जाणे आवश्यक आहे. प्रमोद कांबळे नम्रपणे करत असलेल्या कलासाधनेचा विद्यार्थ्यांनी आदर्श ठेवावा असे सांगून समाजातील चांगल्या व्यक्तींचा आदर्श ठेवा, त्यांचे नुसते अनुकरण करू नका असे आग्रहपूर्वक सांगितले. बी. एम. पाठक यांच्या नावे विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पुरस्काराविषयी त्यांनी अवगत केले. प्राचार्य प्रा. राहुल बळवंत (अभिनव कला महविद्यालय, टिळकरोड), प्राचार्य डॉ. संजय भारती (अभिनव कला महविद्यालय, पाषाण), प्राचार्य अभिजित नातू (वास्तु विद्या महाविद्यालय, टिळकरोड), सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. तानाजी भंडारे आदी मान्यवर मंचावार होते. शाल, श्रीफळ, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. बिबेवाडीतील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात पुरस्कार वितरण सोहळा झाला. पुरस्काराचे यंदाचे तिसरे वर्ष आहे. सुरुवातीस कांबळे यांच्या कार्याची माहिती चित्रफितीद्वारे दाखविण्यात आली.

या निमित्ताने भारतीय कला प्रसारिणी सभेच्या अभिनव कला महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृतींचे अभिनव रंगभाषा या 85व्या कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन कांबळे यांच्या हस्ते झाले. प्रदर्शन बिबेवाडीतील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात भरविण्यात आले असून प्रदर्शन 23 जानेवारीपर्यंत सकाळी 10 ते सायंकाळी 6 या वेळात सर्वांसाठी खुले आहे. चित्रप्रदर्शनात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अभिनव कला महाविद्यालयातील 17 विद्यार्थ्यांना बी. एम. पाठक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. महाविद्यालयात 36 वर्षे अविरत सेवा देणारे ग्रंथपाल कांतिलाल ठाणगे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# संविधान सन्मान दौड २०२५ च्या जर्सीचे अनावरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




भारतीय संविधान दिन अमृत महोत्सवी वर्षा निमित्त 'संविधान सन्मान दौड २०२५ ' चे आयोजन येत्या २५ जानेवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था ( BARTI), संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा हौशी ॲथलेटीक्स असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आले आहे. या मिनी मॅरेथॉन मध्ये पुणेकरांसह देश , विदेशातील सुमारे दहा हजारांहून अधिक स्पर्धक सहभागी होणार आहेत. संविधान सन्मान दौड २०२५ च्या जर्सीचे अनावरण आज मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणेचे अध्यक्ष व 'संविधान सन्मान दौड' चे मुख्य आयोजक परशुराम वाडेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर, डॉ. विजय खरे ( विभाग प्रमुख संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), महोत्सव समितीचे सचिव दीपक म्हस्के, विजय सोनिगरा आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना बोलताना परशुराम वाडेकर म्हणाले, संविधान सन्मान दौड चे यंदा तिसरे वर्ष आहे, मागील वर्षी प्रमाणे यंदाही स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे नांव नोंदणी मधुन दिसते. येत्या 25 जानेवारी रोजी संविधान सन्मान दौड ची सुरुवात सकाळी ५.३० वा. सावित्रीाई फुले पुणे विद्यापीठच्या खाशाबा जाधव क्रीडा संकुलातून होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार असून याप्रसंगी Preamble to the Constitution of India (भारतीय संविधानाची उद्देशिका) वाचन होणार आहे, स्पर्धेचे पारितोषिक वितरण सकाळी ८ वाजता केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी सामजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, बार्टी चे महासंचालक डॉ. सुनिल वारे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी, पोलिस आयुक्त अमितेश कुमार, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, सह पोलिस आयुक्त रंजन कुमार शर्मा, प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर, रजिस्टार ज्योती भाकरे, डॉ. विजय खरे ( विभाग प्रमुख संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित असणार आहेत.

डॉ. विजय खरे म्हणाले, इतर मॅरेथॉन पेक्षा ही स्पर्धा वेगळी आहे. यासाठी कोणतेही नोंदणी शुल्क नाही. मागील वर्षी प्रमाणे यंदाही ४० देशांमधील स्पर्धक यामध्ये सहभागी होतील, अशी आशा आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने ही अमृत महोत्सवी आंतरराष्ट्रीय संविधान दौड स्पर्धा ठरणार आहे.

संविधान सन्मान दौड मध्ये अधिकाधिक विद्यार्थी व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. पराग काळकर यांनी केले.

"आत्तापर्यंत चार हजार स्पर्धकांनी या स्पर्धेसाठी नोंदणी केली आहे. उद्या (22 जाने) पासून 24 जानेवारी पर्यंत दुपारी 2 ते 6 या वेळेत तथागत गौतम बुद्ध विपश्यना केंद्र, पुणे (पुणे विद्यापीठ, जोशी गेट शेजारी) येथे या जर्सी चे वाटप केले जाणार आहे. तेव्हा ज्या स्पर्धकांनी नावनोंदणी केली आहे त्यांनी या जर्सी घेवून जाव्यात.

**— परशुराम वाडेकर,** मुख्य संयोजक संविधान सन्मान दौड

## 'द स्किल्स ऑफ रायटिंग रिसर्च पेपर्स' विषयावर प्रशिक्षण वर्ग

**पुणे :**भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज, पुणे च्या वतीने 'द स्किल्स ऑफ रायटिंग रिसर्च पेपर्स' या विषयावर मूल्यवर्धित प्रशिक्षण वर्ग (कोर्स) दिनांक २ जानेवारी ते १८ जानेवारी २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आला होता. हा प्रशिक्षण वर्ग डॉ. उज्वला बेंडाळे (अधिष्ठाता आणि प्राचार्या), डॉ. ज्योती धर्म (उपप्राचार्या), डॉ. विद्या ढेरे (आयक्यूएसी आणि मूल्यवर्धित कोर्स समन्वयक), कु. मयूरा पवार (एलएलएम समन्वयक आणि नियमित व दूरस्थ डिप्लोमा समन्वयक) आणि डॉ. रोहित सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

१५ दिवसांचा हा कोर्स विशेषतः पदव्युत्तर विद्यार्थी, अकादमिक तज्ञ आणि संशोधकांसाठी आयोजित करण्यात आला होता. यात २०० हून अधिक संशोधक विविध शैक्षणिक पार्श्वभूमी असलेल्या शैक्षणीक संस्थांमधून आले होते.

# साहित्य रसिकांना दीड हजार मध्ये जाता येणार दिल्लीला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संमेलनासाठी मंजूर झालेल्या विशेष रेल्वेला तिकीट दरामध्ये कोणतीही सवलत मिळणार नसली तरी मराठीप्रेमी प्रायोजकांच्या देणगीतून तिकीट दरातील तूट भरून काढण्यात येणार आहे. दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास उपस्थित राहू इच्छिणाऱ्या साहित्य रसिकांना दीड हजार रुपयांमध्ये दिल्लीवारी घडविण्यात येणार आहे.

या संमेलनासाठी दिल्लीला येणाऱ्या महाराष्ट्रातील साहित्य रसिकांसाठी एका विशेष रेल्वेची मागणी सरहद संस्थेने केली होती. केंद्रीय राज्यमंत्री आणि संमेलनाचे सरकार्यवाह मुरलीधर मोहोळ यांच्या प्रयत्नाने रेल्वे मंत्रालयाने महाकुंभ आणि इतर अडचणी असतानाही ही रेल्वे मंजूर केली. यामध्ये सवलत देण्याबाबत स्वागताध्यक्ष शरद पवार आणि मोहोळ आग्रही आहे. रेल्वे मंत्रालयाने सवलत न देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला असल्याने दिल्लीला येणाऱ्या साहित्य रसिकांची अडचण होऊ नये यासाठी दीड हजार रुपये भरून रेल्वे प्रवासासाठी नोंदणी करण्याचा निर्णय संयोजन संस्था आणि महामंडळाने घेतला आहे.

रेल्वे मंत्रालयाने कोणत्याही प्रकारची सवलत देणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे दीड हजार रुपये भरून रेल्वे प्रवासासाठी नोंदणी करण्याचा निर्णय संयोजन संस्था आणि महामंडळाने घेतला आहे.

१७ डबे असलेली ही स्लीपर क्लास रेल्वे १९ फेब्रुवारीला पुण्यातून निघून २० फेब्रुवारीला दिल्लीला पोहोचेल, २३ फेब्रुवारीच्या रात्री परतीचा प्रवास सुरू होऊन २४ फेब्रुवारीला पुण्यात पोहोचणार असून ही विशेष रेल्वे असल्याने त्यासाठी भरावी लागणारी रक्कम सामान्य तिकिटीच्या तीनपट आहे.

### येथे करता येणार नोंदणी

- दिल्ली येथील साहित्य संमेलनाला जाऊ इच्छिणाऱ्यांनी सरहद, पुणे कार्यालय, सर्व्हे क्र. ६, धनकवडी पुणे ४११०४३ किंवा महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११०३० येथे नोंदणी करावी. ज्यांना प्रत्यक्ष येणे शक्य होणार नाही, अशा साहित्यप्रेमींना ७३९८९८९८५६ किंवा ८४८४०५५२५२ या मोबाइल क्रमांकावर नोंदणी करता येईल.

# लोककला पुढच्या पिढीपर्यंत पोहोचली पाहिजे



**पुणे :** लोकसाहित्य, लोकसंस्कृती आणि लोककला महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाने जीवनाचा अविभाज्य घटक म्हणून जपून ठेवली आहे. असे प्रतिपादन डॉ. सदानंद मोरे यांनी लोकसाहित्य व लोकसंस्कृती कार्यशाळा व महोत्सवात केले.

महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई आयोजित आणि भारतीय लोककला अभ्यास संशोधन कल्याण केंद्र व सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने व फोकलोर अँड क्लचरल हेरीटेज फाउंडेशन पुणे यांच्या समन्वयातून व्याख्यान, परिसंवाद, कार्यशाळा, शोधनिबंध वाचन, लोकसंस्कृती विषयक सांस्कृतिक कार्यशाळा आणि महोत्सवाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले विद्यापीठ येथील संत नामदेव सभागृह येथे संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि लोकसाहित्य अभ्यासक डॉ. अरुणा ढेरे, पुणे विद्यापीठाचे कुलसचिव ज्योती भाकरे, फोकलोर अँड क्लचरल हेरीटेज फाउंडेशनच्या डॉ.सुनीता धर्मराव, शाहीर हेमंत मावळे, प्रवीण भोळे, रमेश वरखडे यांच्या शुभहस्ते हस्ते पार पडले.

# पंचाहत्तर वधु-वरांचे आज शुभमंगल सावधान

## केमिस्टरत्न जगन्नाथ शिंदे यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँण्ड ड्रगिस्ट'चे आणि महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँण्ड ड्रगिस्ट असोसिएशन चे अध्यक्ष आणि केमिस्टरत्न जगन्नाथ शिंदे यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त 'केमिस्ट असोसिएशन ऑफ पुणे डिस्ट्रिक्ट'तर्फे २२ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता कर्वेनगर येथील महालक्ष्मी लॉन्स येथे सामूहिक विवाह समारंभाचे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती केमिस्ट असोसिएशन ऑफ पुणे डिस्ट्रिक्टचे सचिव अनिल बेलकर यांनी दिली.

संस्थेचे अध्यक्ष संदीप पारख, खजिनदार रोहित करपे आणि पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संजय शाह आदीनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला आहे. शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ७५ जोडप्यांची लग्नगाठ बांधण्यात येणार आहे. या उपक्रमात गरीब आणि गरजू अशा ७५ जोडप्यांचा समावेश करण्यात आला आहे. या विवाह सोहळा प्रत्येकाच्या स्मरणात राहील, असा करण्यात येणार आहे.

अनिल बेलकर म्हणाले, केमिस्ट हृदय सम्राट आणि माजी आमदार जगन्नाथ शिंदे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त पुण्यात सर्व तयारी पूर्ण झाली आहे.

# किर्तन महोत्सवातून समाजाला दिला नवा संदेश

## समाज बळकटीकरणासाठी व्यसनाधीनता कमी होणे गरजेचे: ह.भ.प. रोहिणी माने परांजपे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे** : मन, मेंदू आणि मनगट बळकट करायचे असेल तर निर्व्यसनी असणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण शरीरात व्यसनाने प्रवेश केला की शरीर नामक यंत्र गंजू लागते. स्वामी विवेकानंद म्हणायचे निर्व्यसनी देहाचे तरुण मला द्या मी देश बदलून दाखवेन. त्यामुळे समाज बळकट होण्यासाठी व्यसनाधीनता कमी झाली पाहिजे, असे मत प्रख्यात कीर्तनकार ह.भ.प. रोहिणी माने परांजपे यांनी व्यक्त केले.

श्री संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ व ॲम्युनिशन फॅक्टरी तसेचसंलग्न संस्थेच्या वतीने कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. ॲम्युनिशन फॅक्टरी, खडकी येथे हा महोत्सव सुरु आहे. महोत्सवात महिलांच्या सामुदायिक हरिपाठचा विशेष कार्यक्रम तसेच महिलांसाठी विविध स्पर्धा देखील घेण्यात आल्या. यावेळी संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे वंशज सदानंद मोरे, ह.भ.प पार्वती चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते भोला शेठ वांजळे, गणेश चव्हाण, जेजुरी संस्थानचे विश्वस्त डॉ.राजेंद्र खेडेकर, ॲम्युनिशन फॅक्टरी च्या जनरल मॅनेजर हजारे मॅडम, पेशवाई श्रीमंत च्या संचालिका अश्विनी येमुल, राहुल येमुल, प्रिय येमुल, अमोल येमुल आदी उपस्थित होते.

किर्तन महोत्सवाचे अध्यक्ष ह.भ.प ज्ञानेश्वर पंढरीनाथ वांजळे, ह.भ.प प्रमोद महाराज रनवरे यांनी तर महिला कार्यक्रमाचे आयोजन गंगा वांजळे, मनीषा वांजळे यांनी केले. ह.भ.प. डॉ. पुनम महाराज जाचक यांचे प्रवचन देखील झाले. रोहिनी माने- परांजपे म्हणाल्या, भक्तीच्या प्रांतामध्ये केवळ देव भक्ती हाच विचार नसून देवाचे कार्य म्हणजे देशभक्ती, राष्ट्रभक्ती, धर्माभिमान या सर्व गोष्टींचा अंश आपल्या जीवनात असावा. त्यासाठी संत पठण, महापुरूषांच्या जीवनाचा अभ्यास करावा. ह भ प जंगले महाराज यांनी सूत्रसंचालन केले.



**श्री संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ व ॲम्युनिशन फॅक्टरी तसेचसंलग्न संस्थेच्या वतीने कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. ॲम्युनिशन फॅक्टरी, खडकी येथे हा महोत्सव सुरु आहे. त्यामध्ये कीर्तन करताना प्रख्यात कीर्तनकार ह.भ.प. रोहिणी माने परांजपे.**



"देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि त्या देशाचे मी काहीतरी देणे लागतो. ते समाजऋण, देशऋण फेडण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजे. मानवी जन्म मिळणे हे भाग्याचे लक्षण आहे परंतु मानवीजन्म घेवून त्या देहाचे सार्थक करणे हे भाग्याचे लक्षण आहे. तोच खरा देवभक्त, राष्ट्रभक्त संतांचा प्रिय भक्त ठरतो,

**ह. भ. प. रोहिणी माने पराजंपे,ज्येष्ठ किर्तनकार**

» Selected

## ज्येष्ठ कीर्तनकार डॉ. किसन महाराज साखरे यांचे वृद्धपकाळाने निधन



**आळंदी :** संत साहित्याचे गाढे अभ्यासक आणि वारकरी संप्रदायाचा वारसा पुढे नेणारे ज्येष्ठ कीर्तनकार डॉ. किसन महाराज साखरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. सोमवारी रात्री उशिरा पुण्यातील चिंचवड येथील एका रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दोन दिवसांपूर्वी प्रकृती बिघडल्याने डॉ. किसन महाराज साखरे यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयात उपचार सुरू असतानाच त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले, अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली. डॉ. किसन महाराज साखरे यांच्या पश्चात कन्या यमुना कंकाळ, पुत्र यशोधन साखरे आणि चिदंबरेश्वर साखरे असा परिवार आहे. आळंदी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

साखरे महाराज यांनी आळंदी येथील ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त म्हणून काम पाहिले होते. तसेच, आळंदी , देहू परिसर विकास समितीच्या सुकाणू समितीचे अध्यक्षपद देखील त्यांनी भूषवले होते. याशिवाय, ग्रंथराज ज्ञानेश्वरीची दृकश्राव्य प्रत त्यांनी प्रकाशित केली होती. डॉ. किसन महाराज साखरे यांच्या निधनाने वारकरी संप्रदायाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या जाण्याने संत साहित्याचा एक गाढा अभ्यासक हरपला आहे.

## एक्स्प्रेस वे'वर एसटी बस जळून खाक चालकाच्या सतर्कतेमुळे बचावले प्रवासी



**पिंपरी :** मुंबई एक्स्प्रेस वेवर, ओझर्डे गावाजवळ एसटी महामंडळाच्या शिवशाही बसला भीषण आग लागली. ही घटना, बस पुण्याहून मुंबईकडे जात असताना उर्से टोलनाक्यापासून पुढे जाताच काही अंतरावर घडली. बसमध्ये 12 प्रवासी होते. चालकाने आग वेळीच ओळखून बस रस्त्याच्या कडेला थांबवली आणि सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढले. यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. काही वेळातच संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. घटनेमुळे एक्सप्रेसवेवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. आयआरबी कंपनीच्या अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली. या आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. चालकाच्या प्रसंगावधानामुळे 12 प्रवासी सुखरूप खाली उतरले. अपघातामुळे वाहतूक कोंडी; आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाची मदत.

## १४ हजाराहून अधिक महिलांचा सहभाग

**पिंपरी :** पॉलिसीबझार इन्शुरन्स ब्रोकर्स अंतर्गत येणारा ब्रॅन्ड पीबीपार्टनर्स या ब्रॅन्ड ने नेहमीच ग्राहकांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन काम केले आहे. नेहमीच टिअर २ आणि टिअर ३ शहरांमध्ये विम्या विषयीची जागरुगता फारच कमी प्रमाणात होती. महाराष्ट्रात पीओएसपी (पॉईंट ऑफ सेल्स पर्सन) एजंट पार्टनर्स ने नेहमीच रहिवाश्यांमध्ये विम्या विषयी जागरुकता निर्माण करण्यात मोठे योगदान दिले आहे. राज्यातील अधिकाधिक लोक हे वित्तीय सुरक्षेला प्राधान्य देत असतांनाच हे एजंट पार्टनर्स सुध्दा प्रत्येक पावलावर मदत करत त्यांना संपूर्ण विमा प्रवासात वैयक्तिक सल्ला आणि सहकार्य उपलब्ध करुन देत आहेत. या शहरां बरोबरच अन्य शहरांमधूनही कंपनीच्या वाढीच्या योजनांच्या प्रसारात योगदान दिले आहे. मुंबई सह ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, कोल्हापूर आणि पालघर ही शहरे महत्त्वाची केंद्रे बनली आहेत.या शहरां बरोबरच अन्य शहरांमधूनही कंपनीच्या वाढीच्या योजनांच्या प्रसारात योगदान दिले आहे. पीबीपार्टनर्स ने एकट्या मुंबईतच २५०० एजंट पार्टनर्सची नियुक्ती केली आहे. तर ठाण्यात १५७६ एजंट पार्टनर्स, पुण्यात १८३८ एजंट पार्टनर्स असून यामुळे राज्यातील संपूर्ण नेटवर्क हे विशाल बनून राज्यात एकूण १४,५४४ एजंट पार्टनर्स चा समावेश आहे. ही मोठी वाढ विशेषकरुन पीओएसपी (पॉईंट ऑफ सेल्स पर्सन) या नाविन्यपूर्ण मॉडेलचा वापर केल्यानंतर झाली असून यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करुन एजंट पार्टनर्स हे वित्तीय उत्पादने ही शहरी आणि ग्रामीण भागातील ग्राहकांना उपलब्ध करुन देत आहेत.

## ऑटो ग्राहकांचे हित जपण्यात अग्रेसर

**पिंपरी :**अलीकडेच, होंडाने ॲक्टिवा 125 आणि होंडा एसपी 125 चे अपडेटेड दोन मॉडेल भारतीय बाजारात लॉन्च केले आहे. होंडाच्या नवीन वैशिष्ट्यांसह, नवीन डिझाइन देण्यात आले आहे. आज (ता. 18) जानेवारी रोजी जंगली महाराज रोड येथील पाषाणकर ऑटो येथे होंडाच्या दोन्ही टू व्हीलर ग्राहकांना खरेदीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्याचं अनावरण देखील करण्यात आले. याप्रसंगी पाषाणकर ऑटो चे कार्यकारी संचालक सूरज गिरमे, सेल्स हेड प्रवीण रहाटे, अकाउंट रवी गारगोटे, रवी जगधने तसेच सर्विसनेटवर्क टीम तसेच पाषाणकर होंडा बिगविंग पुणे ईस्टचे व्यवस्थापक संतोष कुंडगिर, सेल्स हेड राकेश स्वामी तसेच होंडा इंडिया पुणे विभागाचे इन्चार्ज, पाषाणकर ऑटो टीम आदी उपस्थित होते.

## बिग मराठी बायोस्कोप विथ सुबोध भावे सीझन ३'ची घोषणा



**पिंपरी :** भारतातील आघाडीच्या रेडिओ नेटवर्कपैकी एक असलेले बिग एफएम मराठी चित्रपट उद्योगाचा वारसा साजरा करत आपला बहुप्रतिक्षित शो बिग मराठी बायोस्कोप विथ सुबोध भावे घेऊन येत आहे. मराठी चित्रपटातील मनोरंजक किस्से आणि नॉस्टॅल्जिक प्रवासासाठी ओळख असलेल्या या शोच्या तिसरा सीझनची औपचारिक घोषणा करण्यात आली. प्रसिद्ध अभिनेते सुबोध भावे यांच्या उपस्थितीत आयोजित पत्रकार परिषदेत ही घोषणा करण्यात आली. नाविन्यपूर्ण थीम आणि आकर्षक आशयाने भरलेला हा नवा सीझन मराठी सिनेमाच्या अनोख्या आणि कालातीत वारसा गौरव करेल. तसेच श्रोत्यांचे मराठी सिनेमाशी असलेले नाते बळकट करेल. हा शो पुण्यात सोमवार-शनिवारी संध्याकाळी ७ ते ८ आणि रविवारी, सकाळी ७ ते १० या वेळेत पुणे आणि मुंबई या दोन्ही ठिकाणी फक्त बिग एफएमवर २७ जानेवारी रोजी प्रीमियरसाठी सज्ज आहे. अष्टपैलू प्रतिभा असलेले अभिनेते, लेखक, निर्माता आणि दिग्दर्शक सुबोध भावे पुन्हा एकदा यजमानपदाची धुरा सांभाळत मराठी चित्रपटसृष्टीचे सार आणि माहात्म्य सांगणार आहेत. आपल्या उत्कृष्ट निवेदनाच्या माध्यमातून सुबोध भावे हे प्रेक्षकांना सिनेसृष्टीच्या रोमांचक सफरीवर घेऊन जातील आणि त्यातील सर्वोत्कृष्ट क्षण पुढे आणतील. सीझन ३ हा मनोरंजक अशा 'जोडी स्पेशल' संकल्पनेवर आधारित असेल, यामध्ये काही प्रतिष्ठित जोड्यांचा गौरव करण्यात येईल. यात ऑन-स्क्रीन आवडत्या जोड्यांपासून ते गायक-संगीतकार, दिग्दर्शक-अभिनेता आणि गीतकार-संगीतकार यांच्यासारख्या सर्जनशील सहकाऱ्यांचा समावेश असेल.

# समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध- आ. लांडगे

## सोसायटी फेडरेशनच्या 'महासंमेलन'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी- चिंचवड :** माझ्या संघर्षाच्या काळात सोसायटीधारक नागरिकांनी मला साथ दिली. त्यांच्या समस्या आणि अडचणी सोडवण्यासाठी कायम प्राधान्य देण्यात येईल. रक्ताची नाती नसतानाही ही आपुलकीचे नाते तयार झाले. विधानसभा निवडणुकीत सोसायटीधारकांच्या मदतीमुळेच मी विजयाची 'हॅट्रिक' करु शकलो. याबाबत सोसायटीधारकांसोबत कृतज्ञता व्यक्त करतो, अशा भावना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.

चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून शहरातील सोसायटीधारकांसाठी "महासंमेलन-2025" आयोजित करण्यात आले. यावेळी आमदार लांडगे बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे, सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांच्यासह फेडरेशनचे पदाधिकारी आणि हजारोंच्या संख्येत सोसायटीधारक उपस्थित होते. विशेष म्हणजे, "जय जय महाराष्ट्र माझा.." हे महाराष्ट्र गीत गाऊन आमदार महेश लांडगे यांनी उपस्थित सोसायटीधारकांची मने जिंकली.

पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी मनोगतात फेडरेशनच्या कामाचे आणि त्यांच्या एकजुटीचे कौतुक केले. प्रभुणे म्हणाले की, चिंचवडमध्ये क्रांतिवीर साफेकर स्मारक समितीच्या माध्यमातून शोषित वंचित घटकांसाठी काम केले जाते. या शहराने अशा घटकांसाठी मोठे काम केले आहे. चोऱ्यामाऱ्या करणारी मुले आज शिकतात, मोठी होतात तेव्हा या शहराचे दातृत्व दिसून येते.

सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले की, चिखली मोशी सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून या भागातील सोसायटी धारकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. उपयोग कर्ता शुल्क नागरिकांच्या माथी मारली जात असताना फेडरेशनने भूमिका घेतली. आमदार महेश लांडगे यांची साथ या भूमिकेला लाभली. यांच्या माध्यमातून हे शुल्क रद्द झाले. अशी अनेक नागरिकांच्या उपयोगाची कामे फेडरेशनच्या माध्यमातून केली जातात. त्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून या भागातील आमदारांची खंबीर साथ लागते. म्हणूनच ही अराजकीय फेडरेशन असतानाही संपूर्ण फेडरेशन आमदार लांडगे यांच्या पाठीशी कायमच खंबीरपणे उभे आहे. आगामी काळातही पार्किंग रस्ते ,पाणी, विकसक आणि सोसायटी धारक यांचे प्रश्न सोडवण्यासाठी फेडरेशनच्या माध्यमातून काम केले जाणार आहे, असेही सांगळे यांनी भाषणात नमूद केले.

> पिंपरी-चिंचवड शहरातील सोसायटीधारकांसाठी सहकुटुंब सहपरिवार आयोजित केलेल्या महास्नेहसंमेलन मेळाव्यास सोसायटीधारकांनी उदंड असा प्रतिसाद दिला आणि आपली एकतेची भावना जोपासत एकी दाखवून दिली. त्याबद्दल सोसायटीधारकांचे आभार व्यक्त करतो. सोसायटीधारकांसाठी येणाऱ्या अडचणी समस्या आणि भविष्यासाठी फेडरेशन हे कटिबद्ध असेल."
>
> **— दीपक निकम,** प्रवक्ता, चिखली-मोशी- चऱ्होली -पिंपरी चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशन

> "एक है तो सेफ है.." असा नारा जो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. त्याचा खरा अर्थ सोसायटीधारकांनी जाणला आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत सोसायटीधारकांनी एकजुट केली आणि माझ्या पाठीशी ताकद उभा केली. आगामी काळात सोसायटीधारकांच्या न्याय हक्कांसाठी कायम आग्रही राहण्याचा संकल्प आम्ही केला आहे."
>
> **— महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे

# ठाकरेंच्या शिवसेनेची गळती आजही सुरूच

## मोरेश्वर भोंडवेंचा जय महाराष्ट्र



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** – विधानसभा निवडणूक काळात ठाकरेंच्या शिवसेनेला भरते आले होते मात्र, दारूण पराभवानंतर ओहटी सुरू झाली आहे. महापालिकेत पाच वर्षे सत्ताधारी नेते असलेल्या भाजपच्या एकनाथ पवार यांनी दोनच दिवसांपूर्वी शिवसेना सोडली. आता पाठोपाठ रावेत परिसरातील ताकदिचे नेते मोरेश्वर भोंडवे यांनीही अवघ्या तीनच महिन्यांत शिवसेनेला जयमहाराष्ट्र केला आणि पुन्हा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची वाट धरली आहे. दरम्यान, सत्तेच्या अपेक्षेने भाजप सोडून शिवसेनेत आलेले आणखी काही नेते, पदाधिकारी पुन्हा स्वगृही परतण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.

मोरेश्वर भोंडवे हे रावेत परिसरातून दोन वेळा राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक होते. रावेत, वाल्हेकरवाडी परिसरात त्यांचा दांडगा लोकसंपर्क आहे. भोडवे हे ज्या पक्षात जातील ते पॅनल या भागातून विजयी होणार अशी परिस्थिती असल्याने त्यांच्या भूमिकेला महत्वा आहे. विधानसभा निवडणूक काळात भोंडवे यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघातून महायुतीची उमेदवारी मिळावी म्हणून नोव्हेंबर २०२४ मध्ये अगदी वाजतगाजत मातोश्रीवर जाऊन शिवसेनेत प्रवेश केला होता. प्रत्यक्षात त्यांना संधी मिळाली नाही. युतीच्या जागा वाटपात ही जागा शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडे गेली आणि ठाकरेंच्या शिवसेनेतून आलेल्या राहुल कलाटे यांना तिथे उमेदवारी मिळाली. तेव्हापासून भोंडवे हे नाराज होते.

रावेत परिसरात त्यांनी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले असून त्या फलकावर भोंडवे यांनी आमचे नेते म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समवेत फोटो टाकला आहे. भोडवे यांच्याकडे विचारणा केली असता ते म्हणाले, मी सुरवातीपासून अजितदादांच्या बरोबर होतो आणि आहे. पुन्हा प्रवेश करण्याची किंवा तशी घोषणा करण्याची गरज मला वाटत नाही. दुसरे म्हणजे शिवसेनेचा जय महाराष्ट्र ही मराठी माणसाचा आहे. एकनाथ पवार, मोरेश्वर भोंडवे यांच्यासारखे बडे नेते शिवसेना सोडून स्वगृही परतले. आता भोसरी मधून आमदार महेश लांडगे यांच्या विरोधात दंड थोपटून उध्दव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून शिवसेनेत प्रवेश करणारे माजी नगरसेवक रवी लांडगे काय करणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. याबाबत रवी लांडगे यांना विचारणा केली असता, आपण अद्याप असा कोणताही निर्णय घेतलेले नाही मात्र, महापालिका निवडणूक नव्या दमाने लढवणार असे स्पष्ट केले.

# दृढनिश्चयाने केलेले काम म्हणजे संकल्प!– डॉ. उपाध्ये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** "दृढनिश्चयाने केलेले काम म्हणजे संकल्प होय. त्यासाठी एक जानेवारी अथवा गुढीपाडवा अशा मुहूर्तांची गरज नसते!" असे प्रतिपादन ज्येष्ठ निरूपणकार डॉ. संजय उपाध्ये यांनी काशीधाम मंगल कार्यालय, चिंचवडगाव येथे शनिवार, दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी केले. गांधीपेठ तालीम मित्रमंडळ आयोजित 'मन करा रे प्रसन्न!' या प्रवचनमालिकेंतर्गत ६४वे प्रवचनपुष्प गुंफताना 'संकल्पाला नवीन वर्षच का?' या विषयावर डॉ. संजय उपाध्ये बोलत होते. माजी नगरसेवक मधू जोशी, किरण येवलेकर, सुदाम शिंदे, गीतल गोलांडे, ॲड. अंतरा देशपांडे, सुप्रिया सोळांकुरे आणि गांधीपेठ तालीम मित्रमंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ गोलांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. संजय उपाध्ये पुढे म्हणाले की, "'संकल्प' या शब्दातील 'सं' हे अक्षर सातत्याचे द्योतक आहे. त्यामुळे संकल्पाला सातत्याची जोड असलीच पाहिजे. वास्तविक प्रत्येक दिवस हा नवा दिवस असतो; तसेच दररोज झोपेतून जाग आल्यावर आपला पुनर्जन्म होत असतो. त्यासाठीच त्या दिवशी त्या क्षणाला घेतलेला निर्णय महत्त्वाचा असतो. आपले आयुष्य संकल्पाने भारून टाकायचे की, विकल्प शोधायचे हे प्रत्येकाने ठरवायचे असते. संकल्पासोबत आपले नाते अद्वैत स्वरूपाचे हवे. त्यासाठी निश्चयात्मक बुद्धी पणाला लावावी लागते; तसेच त्यासाठी मेंदू आणि मन यांची एकवाक्यता झाली पाहिजे. संकल्प करण्याआधी सर्व संभाव्य शक्यतांचा अभ्यास केला; तर त्याच्या सिद्धीची ग्वाही मिळते. आपले शरीर हेच एक न्यायालय आहे अन् त्यातील न्यायाधीश आपण स्वतःच असतो. अर्थातच त्यामुळे आपले व्यक्तिगत यश आपल्या स्वतःच्या आचरणात दडलेले असते. व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय अशी त्या संकल्पित यशाची व्याप्ती वाढली पाहिजे.


**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४९४/२०२४/४४८५

**अर्जदार**
पारस बसेरा सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: सर्वे नं. २९६/२, पोरवाल रोड, (संत तुकाराम रोड) लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४७
तर्फे, अर्जदार, अध्यक्षः श्री. अमृत रामचंद्र काळे, सचिव : श्री. रोहित विभुते.
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**प्रवर्तक / जाब देणार**
१.मे. पारस डेव्हलपर्स नोंदणीकृत भागीदारी संस्था
तर्फे भागीदार, अ. श्री. नरेश मधुसुदन मेहता, रा. टी. एस. ६५, मार्केट रोड, खडकी, पुणे- ४११ ००३
ब. श्री. विशाल अनिल मेहता, रा. ४९६, मेहता टॉवर्स, के. जे. रोड, खडकी, पुणे- ४११ ००३
क. श्री. हेमंतभाई अंबालाल शहा
रा. फ्लॅट नं. १०२, मुनिसुव्रत छाया को. ऑप हौसिंग सोसायटी, आय सी आय बँकचे वर, शहार रोड, कुलडुंगरी, अंधेरी पूर्ण, मुंबई - ४०००६९.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये पारस बसेरा सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः सर्वे नं. २९६/२, पोरवाल रोड, (संत तुकाराम रोड) लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०४७ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४९४/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०७/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृद्धी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ (अ ते क) गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ (अ ते क) यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २८/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ (अ ते क) यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांक: २०/०१/२०२५
शिक्का
सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४८८/२०२४/४४९०

**अर्जदार**
१० वृंदावन बिल्डींग अ व बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्व्हे नं. २१/२/२अ व सर्व्हे नं. २१/२ब/२, धानोरी, ता. हवेली जि. पुणे- ४११ ०१५.
तर्फे, अध्यक्षः श्री. जितु नायर, खजिनदारः श्री. सचिन संजय पाटील.
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**विकसक / जागा मालक / जाब देणार नं. १,**
१. मे. श्रीराम प्रॅापर्टीज, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफिस पत्ता- सेक्टर नं. २७, प्लॉट नं. २९८, प्राधिकरण, निगडी, ता. हवेली जि. पुणे- ४११ ०४४.
तर्फे भागीदार, अ. श्री. जगन्नाथ रामकीशन आगरवाल, ब. श्री. नितीन जगन्नाथ आगरवाल, ऑफिस पत्ता सेक्टर नं. २७, प्लॉट नं. २९८, प्राधिकरण, निगडी, ता. हवेली जि. पुणे- ४११०४४. इतर इमारत/ जाब देणार नं. २
२. अ. इमारत- सी, ब. इमारत - डी, क. इमारत- ई, ड. इमारत- एफ
पत्ताः सर्व्हे नं. २१/२/२अ व सर्व्हे नं. २१/२ब/२, धानोरी, ता. हवेली जि. पुणे- ४११ ०१५.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये १० वृंदावन बिल्डींग अे व बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः सर्व्हे नं. २१/२/२अ व सर्व्हे नं. २१/२ब/२, धानोरी, ता. हवेली जि. पुणे- ४११ ०१५ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४८८/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०७/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. आदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. २ ( अ ते ड) गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. २(अ ते ड) यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २८/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. २ ( अ ते ड) यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांक: २०/०१/२०२५
शिक्का
सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४८०/२०२३/४४९१

**अर्जदार**
ईशा बेला व्हिस्टा ए सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता : स. नं. १५, हिस्सा नं. १/१/३, १/१/४, १/३ (पार्ट), १/३/२, १/३/३, १/३/४, प्लॉट नं. ब, कोंढवा बु., ता. हवेली, जि. पुणे ४११ ०४८ तर्फे
अध्यक्ष, श्री. मोहमदहुसेन शौकतली प्रेमजी, सचिव, श्री. सर्फराज पटेल.
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
३. मे. ईशा कॉनकर्ड रियलटर्स,
ऑफिस पत्ता : महु कॉम्प्लेक्स, ५, बंडगार्डन रोड, पुणे ४११००१ तर्फे भागीदार श्री. भरत मीठालाल नागोरी
४. ए. बिपीनभाई तुलसीभाई व्होरा, रा. १४१ / ८, मीरा सोसायटी, शंकरशेठ रोड, पुणे ४११ ०३७. बी. जयेश हसमुखभाई पटेल, रा. आबा काटे चौक, कोंढवा खु. पुणे ४११०४८. सी.गिरीषभाई अंबालाल पटेल, रा. मेहता हाऊस, ३६ / ए, पंडीत रमाभाई रोड, मुंबई ४०० ००७. डी. प्रेमचंद रघुनाथप्रसाद आगरवाल, रा. दुसरा मजला, खलिफा मानसिओन, पारशीवाडा, १ लेन, डी. पी. रोड, मुंबई ४०० ००४, इ. काळुराम लक्ष्मण धांडेकर, एफ. रोहिदास लक्ष्मण धांडेकर, दोघे रा. स.नं. १५/१/३, कोंढवा बु. ता. हवेली, जि. पुणे, जी. राजेंद्र चुनीलाल गुगले, रा. २१, वैभवनगर, धनकवडी, एच. जितेंद्र बापु पाटील रा. प्लॉट नं. ५, निर्मल बाग, पर्वती, पुणे (जाब देणार नं. २ तर्फे कु. मु. म्हणून श्री. भरत मीठालाल नागोरी).
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये ईशा बेला व्हिस्टा ए सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः स. नं. १५, हिस्सा नं. १/१/३, १/१/४, १/३ (पार्ट), १/३/२, १/३/३, १/३/४, प्लॉट नं. ब, कोंढवा बु., ता. हवेली, जि. पुणे ४११ ०४८ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४८०/२०२३ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०१/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृध्दी कोठारी तर्फे ॲड. भार्गवी हिवाळे हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २ (ए ते एच) गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ ( ए ते एच) यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २८/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २ (ए ते एच) यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांक: २०/०१/२०२५
शिक्का
सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४८९/२०२४/४४९२

**अर्जदार**
लॉरेल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्व्हे नं.१८७/१/१(पैकी), १८७/१२/२ (पैकी), १८७/२/१(पैकी) व १८७/२/२, वाकड, ता. मुळशी जि. पुणे ५७
तर्फे, अध्यक्षः श्री. मनोजकुमार रामशीष सिन्हा, सचिव : श्री. सतीश तरडे.
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
1. मे. मैत्रेय वाकडकर असोसिएटस्, (जॉईट व्हेन्च्युर ऑफ वाकडकरस ॲन्ड मे. निर्मिती बिल्डर्ल्स ॲन्ड बेलवालकर हाऊसिंग स्किम्स श्री. आर. ए. पंडीत ॲन्ड श्री. एस. ए. जावडेकर),असोसिएशन ऑफ पर्सनस, (ए.ओ.पी.) तर्फे कॉन्स्टियुअन्ट व अधिकृत साक्षरीकार, श्री. समीर शरदचंद्र बेलवलकर,
ऑफिस पत्ता- सिटीएस नं. ११७५/१, निर्माती एमिनेंस, ४ था मजला, एरंडवणे. ता.हवेली जि. पुणे - ०४. जागा मालक/मान्यता देणार/ जाब देणार नं. २
२. ए. श्री. म्हातु हरिभाऊ वाकडकर, बी. श्री. हनुमंत नामदेव वाकडकर, सी. श्री. विनोद हनुमंत वाकडकर डी. शामराव हनुमंत वाकडकर, ई. शकुंतला संभाजी बुचडे, एफ. सौ. आशा हरिभाऊ वाकडकर, जी. सौ. धोंडीबा पोपट लोखंडे, एच. श्रीमती. सुंदराबाई चंद्रकांत मोरे, आय. सौ. इंदुबाई पंढरीनाथ जांभुळकर पत्ता- सिटीएस नं. ११७५/१, निर्माती एमिनेंस, ४ था मजला, एरंडवणे. ता.हवेली जि. पुणे - ०४. (जाब देणार नं. २ तर्फे कु. मु. धारक म्हणुन जा. देणार नं.१).
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये लॉरेल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः सर्व्हे नं.१८७/१/१(पैकी), १८७/१/२ (पैकी), १८७/२/१ (पैकी) व १८७/२/२, वाकड, ता. मुळशी जि.पुणे ५७ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४८९/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०७/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृद्धी कोठारी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २ ( ए ते आय) गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २(ए ते आय) यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २८/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ ( ए ते आय) यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांक: २०/०१/२०२५
शिक्का
सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. १४९/२०२४/४४८८

**अर्जदार**
नियो.विनायक सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता:-सिटीएस नं.३८७/१,राष्ट्रभाषा भवन रस्ता (लोखंडे तालीम ते मोदी गणपती), नारायण पेठ, जि. पुणे-४११०३०.
तर्फे,
मुख्य प्रवर्तक, श्री. अतुल भीमाशंकर पुरवंत..
**विरुध्द**
**जाब देणार**
१. श्री. सदाशिव अबाजी नेर्लीकर (मयत)
तर्फे वारसदार,अ.श्री.दिनकर अबाजी नेर्लीकर.
रा. सिटीएस नं.३८७/१, राष्ट्रभाषा भवन रस्ता (लोखंडे तालीम ते मोदी गणपती), नारायण पेठ, जि. पुणे-४११०३०.
ब.श्री.विनायक अबाली नेर्लीकर. रा. नेर्लीकर हॉस्पीटल, जेहान सर्कल जवळ, गंगापुर रोड, नाशिक-४२२२२२.
क.वैजयंती गोहाड.रा.५७, एक्स सर्व्हिसमेन कॉलनी, मोरे विद्यालयसमोर, एरंडवणा,पुणे-४११ ०३८.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे.
उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. विनायक सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता:- सिटीएस नं. ३८७ / १, राष्ट्रभाषा भवन रस्ता ( लोखंडे तालीम ते मोदी गणपती), ), नारायण पेठ,जि.पुणे-४११ ०३० या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. १४९/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १५/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड.समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १ अ,ब व क गैरहजर. सबब जाब देणार क्र. १अ,ब व क यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि.१८/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १अ,ब व क यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांक: २०/०१/२०२५
शिक्का
सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

संपादकीय विशेष

# सोनेतारण आणि सामान्यजन

गेल्या काही काळात सोने तारण ठेवून कर्ज घेणाऱ्या ग्राहकांची थकबाकी वाढत आहे. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसारच बँका आणि नॉन बँकिंग फायनान्स कंपनीज, म्हणजेच एनबीएफसीजकडून सोने गहाण ठेवून देण्यात आलेल्या कर्जे देण्यात आलेल्या कर्जांच्या थकबाकीमध्ये तीस टक्के वाढ झाली आहे. म्हणजेच त्या प्रमाणात बँकांचे ओझे वाढले आहे. जून 2024 अखेर ही थकबाकी 6,696 कोटी रुपये होती. त्या अगोदर तीन महिने ती 5,149 कोटी रुपये होती.

2022-23 या आर्थिक वर्षाशी तुलना केल्यास सोन्याच्या कर्जवाटपात 14.6 टक्के इतकी वाढ झाली आहे. सर्वसामान्य ग्राहक तात्पुरत्या खर्चासाठी किंवा लग्न व अन्य समारंभासाठी या प्रकारचे कर्ज घेतो. अनेकदा अत्यंत संकटात आलेला माणूस अखेरचा उपाय म्हणून घरात साठवून ठेवलेले सोने सोनाराकडे नेऊन देतो किंवा बँकेकडे अथवा वित्तीय कंपनीकडे घेऊन जातो आणि मिळेल तेवढे कर्ज घेतो. परंतु तेही फेडणे त्याला शक्य होत नाही, असे दिसते. अनेकांकडे स्थायी स्वरूपाचा रोजगार नसतो किंवा त्यांचा छोटा-मोठा व्यवसाय संकटात सापडलेला असतो. सहजासहजी माणूस सोने गहाण ठेवत नाही. परंतु ते गहाण ठेवण्याची पाळी त्याच्यावर जास्त वेळा येत आहे, असे दिसते. अलिकडच्या काळात व्यापारी बँकांनी सोन्यावर दिलेल्या थकित कर्जात 62 टक्क्यांची तर एबीएफसीजच्या थकित कर्जात 24 टक्क्यांची वाढ झाली आहे.



लोकांच्या सरासरी उत्पन्नात घट होत असून कर्जबाजारीपणा वाढत चालला आहे. सोन्याचे भाव गगनाला भिडले, तेव्हा लोकांनी आपल्या घरातले सोने भराभर बाहेर काढून, तारण ठेवून बँकांकडून कर्जरकम उचलण्यास सुरुवात केली. त्यातून अनेकांनी शाळा आणि कॉलेजच्या फीज भरल्या तसेच इस्पितळांची बिलेही चुकती केली. कर्ज थकवल्यास आपला क्रेडिट स्कोअर कमी होईल, हे माहीत असूनही बरेच लोक कर्जाचे हप्ते फेडूच शकले नाहीत. या परिस्थितीत बँकांची सोने तारणावर दिलेल्या कर्जाची येणे असलेली रक्कम एक लाख दोन हजार 562 कोटी रुपयांवरून एक लाख 54,282 कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली.

एनबीएफसीजची थकबाकी या रकमेत मिळवल्यास एकूण थकबाकीची रक्कम तीन लाख कोटी रुपये इतकी भरते. वास्तविक, सोन्याच्या आधारावर दिलेले कर्ज वगळल्यास बँकांची एकूण थकित रक्कमही कमी झाली आहे. त्यामुळे सोन्याच्या तारणावर कर्ज देताना आपल्या धोरणांचा फेरआढावा आणि काळजी घ्या, जोखमीचे नीट मूल्यमापन करा तसेच सुवर्णालंकार आणि दागिन्यांचे लिलाव करताना पारदर्शकता बाळगा, अशा सूचना रिझर्व्ह बँकेने बँकांना दिलेल्या आहेत. सर्वसाधारणत: व्यक्तिगत कर्जे घेताना, प्रिपेमेंट चार्जेस असतात. सुवर्णाधारित कर्ज घेताना असे चार्जेस नसतात. परतफेड करण्याबाबत एक प्रकारची लवचिकता उपलब्ध असते. अल्पमुदतीची सोय म्हणून सोने गहाण ठेवून उधार उसनवार करण्याची पद्धत आपल्याकडे आहे. त्यामुळे या प्रकारची कर्जे घेण्याच्या प्रमाणात वर्षागणिक 25-25 टक्क्यांची वाढ होत आहे. सामान्यजनांच्या पोर्टफोलिओमध्ये सोने पाच ते दहा टक्क्यांच्या दरम्यान असावे; त्यापेक्षा सोन्यात जास्त गुंतवणूक करू नये, असे तज्ज्ञांचे मत आहे. भाववाढीमुळे लोक अडचणीत असतात, तेव्हा सोन्याचे भाव वाढत असतात.

भारतासह आशियाई देशांमध्ये सोन्याकडे एक महत्त्वाची मालमत्ता म्हणून पाहिले जाते, तर इतर अनेक देशांमध्ये सोने ही एक गुंतवणूक मानली जाते; परंतु आपल्याकडे तातडीच्या संकटावर मात करण्यासाठी सोने गहाण ठेवून कर्ज घेण्याकडे लोकांचा कल वाढला आहे. यावरून देशाचे आर्थिक आरोग्य कळते. सोनेतारण कर्जाची प्रक्रिया सुलभ असते तसेच त्यावरील व्याजही तुलनेत कमी असल्याने कर्जदार हा पर्याय निवडत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार जाहीर केली. त्यानुसार 18 ऑक्टोबर 2024 पर्यंत सोन्यावरील कर्जाची थकबाकी 1,54,282 कोटी रुपये इतकी आहे. मार्च महिन्याच्या अखेरीपर्यंत हीच थकबाकी 1,02,562 कोटी रुपये इतकी होती. वार्षिक आधारे या थकबाकीमध्ये 50.4 टक्के इतकी वाढ झाली आहे. यामागे नेमकी कारणे काय, असा प्रश्न पडतो. आर्थिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते बिगरबँक वित्तीय संस्थांनी असुरक्षित कर्जापेक्षा सोन्यावरील सुरक्षित कर्जाचे धोरण स्वीकारले आहे. चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांमध्ये या संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या कर्जामध्ये 0.7 टक्के घट झाली आहे. मागील काही दिवसांमध्ये सोन्याच्या किमती कमालीच्या वाढल्या आहेत. यामुळे ग्राहकांनाही अधिक कर्ज सहजपणे मिळण्याचा पर्याय उपलब्ध झाला आहे. त्यामुळेही सोनेतारण कर्जाचे प्रमाण वाढल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांमध्ये गृहकर्जाचे प्रमाण वाढून 28.7 लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. 2023 च्या तुलनेत यात 36.6 टक्के वाढ झाली आहे. याच कालावधीमध्ये क्रेडिट कार्डवरील थकबाकी 2.81 लाख कोटींवर पोहोचली आहे. यात वार्षिक आधारे 9.2 टक्के वाढ झाली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे एकूण बुडीत कर्जाचे प्रमाण (एनपीए) सरलेल्या 30 सप्टेंबरअखेर 3.16 लाख कोटी रुपये होते. ते थकित कर्जाच्या 3.09 टक्के आहे. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, सार्वजनिक क्षेत्रातील बँक आणि खासगी क्षेत्रातील बँकांचे एकूण बुडीत कर्जाचे प्रमाण 30 सप्टेंबरअखेर अनुक्रमे तीन लाख 16,331 कोटी रुपये आणि एक लाख 34,339 कोटी रुपये राहिले आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या थकित कर्जाच्या तुलनेत ते 3.09 टक्के आणि खासगी क्षेत्रातील बँकांमधील कर्जाच्या तुलनेत 1.86 टक्के आहे. 31 मार्च 2024 अखेर बँकांनी 580 संस्थांना कर्जबुडवे (विल्फुल डिफॉल्टर) म्हणून वर्गीकृत केले असून प्रत्येकाचे 50 कोटी रुपयांपेक्षा अधिक कर्ज थकीत आहे. दिवाळखोरी आणि नादारी संहितेच्या माध्यमातून बँकांनी 30 सप्टेंबर 2024 अखेरपर्यंत 1,068 कंपन्यांचा दिवाळखोरी निराकरण प्रकियेमध्ये समावेश केला आहे. थकीत कर्जदारांकडून आतापर्यंत 3.55 लाख कोटी रुपयांची वसुली झाली. तथापि बँकांची थकवलेली एकूण देणी 11.45 लाख कोटींची तर व्यवसाय मोडीत काढून अर्थात अवसायानांतून मिळवल्या गेलेल्या रकमेचे मूल्य 2.21 लाख कोटी रुपये आहे. सरकारने कितीही कायदे केले, नादारी सोपी केली, तरी एकूणच देशात कर्जबाजारी होण्याचे प्रमाण वाढत असून, कर्जबुडवेही त्या प्रमाणात वाढत आहेत, ही चिंतेची बाब आहे.

# ‘वेदब्रह्म’ किसन महाराज साखरे

**संत साहित्याचे अभ्यासक आणि वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार डॉ. किसन महाराज साखरे यांचे निधन झाले. त्या निमित्ताने एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचा लेख**

आठवण

विश्वधर्मी
प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड



माझे मित्र व परमस्नेही श्रीकृष्ण भिडे हे आमच्या पूना इंजिनिअरिंग कॉलेजच्या वर्कशॉप विभागाचे प्रमुख असताना, त्या ठिकाणी श्री. अष्टेकर नावाचे एक कारागीर, हे आळंदीच्या प्रसिद्ध साखरे महाराजांचे शिष्य होते. योगायोगाने, ह.भ.प. श्री. किसन महाराज साखरे यांचे एक व्याख्यान वर्कशॉपमध्ये आयोजित केले असताना, माझी आणि त्यांची पहिली भेट झाली. संपर्क वाढत गेला, स्नेहबंध जुळत गेले. माझ्या पूज्य भगिनी प्रयागअक्कांची साखरे महाराजांवर फार मोठी निष्ठा होती. त्या अनेक वर्षापासून आळंदी-पंढरपूर या ठिकाणी त्यांची कीर्तनं-प्रवचनं न चुकता ऐकत असत. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून आमचे साखरे महाराजांच्या घराण्याशी निकटचे संबंध प्रस्थापित झाले. मी माझ्या मनातील इंद्रायणी नदीच्या तीरावरील अस्वच्छ व घाण परिसर स्वच्छ व सुंदर करण्याविषयीची व छोटासा का होईना घाट बांधण्याची संकल्पना साखरे महाराजांना बोलून दाखविली. आश्चर्य असे की, त्यावर साखरे महाराज एवढेच म्हणाले, “अहो कराड, माझ्याही मनामध्ये अनेक वर्षापासून हा विचार घोळतो आहे. मलाही वारकरी भाविकभक्तांच्या स्नानासाठी व तीर्थ म्हणून स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्याची तीव्र इच्छा आहे. आपण सर्वांनी मिळून काहीतरी केलं पाहिजे.”

योगायोगाने त्या आधी थोडयाच दिवसापूर्वी, श्री साखरे महाराज व त्यावेळचे महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचे अध्यक्ष, गांधीवादी विचारसरणीचे प्रसिद्ध बाळासाहेब भारदे यांची भेट झाली असताना, श्री भारदे यांनी त्यांना आवर्जून सांगितले की, रोजगार हमी योजनेखाली, श्रीक्षेत्र आळंदी येथील इंद्रायणीच्या तीरावरील परिसर सुधारणेसाठी आम्ही तुम्हाला निधी देतो, परंतु तुम्ही या निधीतून इंद्रायणी नदीच्या दोन्ही तीरावरील परिसर साफ व स्वच्छ करून, घाण पाण्याचा बंदोबस्त करून, घाटाच्या स्वरूपात काही कार्य उभे करा.

### श्रीक्षेत्र आळंदी देहू परिसर विकास समितीचा शुभसंकल्प

२८ नोव्हेंबर १९८६ रोजी मला महापूजेला जाण्याचा योग आला. महापूजा संपल्यानंतर,



सुवर्णपत्रावर कोरलेले पसायदान व ताम्रपटमुद्रित ‘श्री ज्ञानेश्वरी’ सहित प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड व ह. भ. प साखरे महाराज

सुवर्ण पिंपळाच्या समोरील मेघडंबरीस्वरूप बैठकीच्या जागी सर्व पूजेला आलेली भक्तमंडळी व प्रमुख वारकरी चहापानासाठी एकत्र आले. त्या दिवशी विशेष करून, महाराष्ट्र राज्याच्या सहकार खात्याचे आयुक्त श्री. श्रीवास्तव, साखरे महाराज, शंकरबापू, माझे बंधू श्री. तुळशीराम कराड, माझ्या भगिनी पूज्य प्रयागअक्का कराड, पत्रकार श्री. मधुकर जोशी, आळंदी संस्थानचे बाळ ज. पंडित, प्रा. नूलकर, प्रा. प्र. ल. गावडे, श्री. मामासाहेब पिंपळे, श्री. ज्ञानेश्वर लांडगे, आळंदीचे त्यावेळचे नगराध्यक्ष श्री. दत्तोबा कुऱ्हाडे, त्यांचे सहकारी हजर होते. अनेक वेळेला माझ्या चर्चेमधून, आळंदी-देहू परिसर विकासाची संकल्पना मी साखरे महाराज, श्री. श्रीवास्तव, श्री. व्ही. पी. राणे, श्री. बाळासाहेब भारदे यांना बोलून दाखविली होती. मी या गोष्टीचा ध्यास घेतला आहे.

सहकार आयुक्त श्रीवास्तव यांनी मला आठवण करून दिली की, ‘आपण नेहमीच आळंदी-देहूच्या इंद्रायणीच्या तीरावरील परिसर विकासाच्या व घाट बांधणीच्या संकल्पना बोलून दाखविता, तर मग खरोखरीच तुम्हाला काही कार्य उभं करावयाचं असेल, तर मग श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकासाच्या कार्यासाठी एखादी समिती वा विश्वस्त मंडळ स्थापन का करीत नाही? मला असं वाटतं की, तुम्ही अशा प्रकारचा एखादा ट्रस्ट वा समिती स्थापन केल्याशिवाय, अशा प्रकारचे सामुदायिक कार्य उभे राहू शकत नाही. तेव्हा कराड साहेब, आपण स्वत: पुढाकार घेऊन, या समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारावी आणि मग साखरे महाराज, बापू व इतर मान्यवर, त्याचे प्रमुख विश्वस्त वा सदस्य म्हणून सामावून घेऊन, या समितीद्वारे परिसर विकासाच्या कार्याला सुरुवात करावी.’ ही सूचना ऐकताच मी एवढेच म्हणालो, “श्रीवास्तव साहेब, आपली या कार्यासाठी समिती स्थापन करण्याची संकल्पना मला पूर्णपणे मान्य आहे, फक्त या समितीचा मी अध्यक्ष न होता, ह.भ.प. श्री. किसन महाराज साखरे हे अध्यक्ष असतील व ह.भ.प. श्री. शंकरबापू आपेगावकर हे याचे प्रमुख विश्वस्त असतील. मी एक प्रमुख कार्यवाह वा कार्याध्यक्ष म्हणून काम करायला तयार आहे.” त्यावेळी अनेकांनी देणगी दिली येथे अवघ्या तासाभराच्या आतच सुमारे रु. १,११,०००/- (एक लाख अकरा हजार रुपये) एवढी वर्गणीची रक्कम जमा झाली. श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या शुभकार्यामध्ये सहभागी झाले

### वेदब्रह्मांची कसोटी

श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या कार्याला चांगली गती येऊ लागली. मधल्या काळामध्ये ह.भ.प. श्री. साखरे महाराजांच्या समोर एक वेगळाच पेच निर्माण झाला. काही गैरसमजातून वा अज्ञानातून संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराज देवस्थान कमिटीच्या काही सदस्यांनी, साखरे महाराजांना संस्थानच्या मिटींगमध्ये विचारले की, “आपण या देवस्थान कमिटीचे विश्वस्त व सदस्य असताना, श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीसारख्या नवीन स्थापलेल्या संस्थेचे विश्वस्त/अध्यक्ष म्हणून कसे काय काम करू शकता? आपणास जर प्रा. कराडांनी स्थापन केलेल्या समितीवर काम करायचे असेल, तर देवस्थानच्या विश्वस्त पदाचा राजीनामा द्यावा, अथवा आम्हाला आपले विश्वस्तपद रद्द करावे लागेल.” ह.भ.प. श्री. साखरे महाराज त्यांनी त्यावर अतिशय शांतचित्ताने सर्व पदाधिकाऱ्यांना विनम्रपणे विचारले की,“देवस्थान समिती व श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती या दोन्ही संस्थांचे कार्य हे संतशिरोमणी ज्ञानेश्वर माऊलींच्या नावानेच होणार आहे, तेव्हा या दोन कामामध्ये भेदभाव करण्याची गरज काय? मी तर प्रा. विश्वनाथ कराड सरांना वचन दिले आहे आणि त्यानुसार माऊलींच्या संजीवन समाधीसमोर आम्ही हे कार्य करण्याचा संकल्प सोडला आहे. तेव्हां मी श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती सोडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही!’ पुढे दुर्दैवाने, देवस्थान समितीने साखरे महाराजांचे विश्वस्तपद रद्द केले, परंतु साखरे महाराजांनी आपला शब्द बदलला नाही व ते या संस्थेच्या कार्याला वचनबद्ध राहिले,

साखरे महाराजांच्या अंगची विद्वत्ता, त्यांचा वेदाभ्यास, ज्ञानेश्वरीवर प्रभुत्व, कुठलीही विद्यापीठाची पदवी नसतानादेखील पुणे व नागपूर विद्यापीठाचे पी.एचडी.चे गाईड असणं, त्यांचं अत्यंत व्रतस्थ जीवन, त्याचबरोबर आषाढी वारीच्या वेळी उपवास करून, पूर्णपणे पायी चालण्याचा त्यांचा प्रघात, या सर्व गोष्टींच्यामुळे त्यांच्याविषयी माझ्या मनात अतिशय आदर होता. मी स्वत: नेहमी इतरांच्या अंगी असलेले सकारात्मक गुणच पाहात आलो आहे. ‘सद्गुणांची पूजा हीच ईश्वर पूजा’ अशी माझी धारणा आहे, त्यामुळे अशा स्वरूपाच्या व्यक्तीद्वेषापोटी केल्या जाणाऱ्या टीकेकडे मी नेहमीच दुर्लक्ष करीत आलो.

खेचाखेची

### बावळट कोण?

एकदा बाळुने शेजारच्या नानांना एक प्रश्न विचारला.

**बाळू :** ‘सूर्य प्रकाश देतो, अंधार का देत नाही?’

**नाना :** (चिडलेल्या स्वरात) ‘असला प्रश्न एखाद्या बावळट व्यक्तीला जाऊन विचार. मला काय विचारतोस? मी असल्या फालतू प्रश्नांची उत्तर देत नसतो.’

.

**बाळू :** ‘पण बाबांनी तुम्हालाच विचारायला सांगितलं होतं.’


वेगळे काही

चीनमधील जिनजियांग प्रांतात राहणाऱ्या एका मेंढपाळाकडे असणाऱ्या या बोकडाला सहा शिंग आहेत. सामान्यपणे बोकडाला दोन शिंग असताना सहा शिंग असणारं हे देखणं जनावर सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. त्याचा सांभाळ करणाऱ्या गुलीबहाटी नामक मेंढपाळाच्या म्हणण्याप्रमाणे हे बोकडं जन्मलं तेव्हा अगदी सामान्य होतं. पण वय वाढेल तसंतसं त्याला एक-एक शिंग उगवू लागलं. दोन्ही कानांवर तीन-तीन या प्रमाणे त्याला सहा शिंग आहेत. तज्ज्ञांच्या मते, क्रॉस-ब्रीडिंगचा हा परिणाम आहे. अनेक जण त्याला विकत घेण्यास पुढे येतात. पण कितीही मोठी रक्कम मिळाली तरी मी त्याला विकणार नाही असं गुलीबहाटी सांगतो.


समुपदेशन

### जाणावं मुलीचं भावविश्व

मी एका कोवळ्या वयातल्या मुलीची आई असून चिंतेत आहे. आत्ता कुठे तिने शालेय शिक्षण पूर्ण केलं आहे. पण आत्तापासून बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंड हे शब्द तिच्या शब्दकोशात येत आहेत. डेटिंगविषयी ती सांगते तेव्हा पोटात धस्स होतं. हे सगळं निरागसतेने सांगत असली तरी मोकळ्या स्वभावामुळे नको त्या नात्यात अडकेल, अशी शंका वाटते. तिला मैत्रिणींपेक्षा मित्र जास्त आहेत. बर्थ डे पार्टीज, फनफेअर, गेट टूगेदर या निमित्ताने सगळे एकत्र असतात. यात ती प्रलोभनांच्या जाळ्यात अडकण्याची भीती वाटते. काय करु?



– सध्याच्या बदललेल्या जीवनशैलीचा अंगिकार करुनही मातांना अपत्यांबद्दल अशी भीती वाटते तेव्हा त्या या व्यवस्थेकडे जुनाट नजरेने पाहतात असं दिसतं. आताच्या मैत्रीच्या संकल्पना अधिक मोकळ्या-ढाकळ्या आहेत. त्यामुळे मुलीला या सगळ्यापासून तोडू पाहशील तर तुमच्या नात्यात वितुष्ट येण्याचा संभव आहे. त्यामुळे सर्वप्रथम तिच्यावर विश्वास टाक. तिच्याशी मैत्री कर. तिला भविष्यातले धोके, फसवणुकीची प्रकरणं, करिअरचं महत्त्व समजावून सांग. अशा प्रकारे तिच्या बदलत्या भावविश्वाचा एक भाग बनून राहिलीस तर खात्रीने ती या व्यवस्थेला बळी पडणार नाही. ती स्वत:ला उत्तम प्रकारे कॅरी करु शकेल.




राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षापूर्तीचं समाधान लाभेल. करार लाभदायक ठरतील. व्यवसायात नव्या समस्या येतील.
- **वृषभ** : वैवाहिक सौख्य लाभणार आहे. प्रिय व्यक्तिंच्या भेटीनं समाधानी व्हाल. धनलाभाचे योग आहेत.
- **मिथुन** : कसल्याही आमिषापासून सावध रहावं. रखडलेल्या कामांना गती येईल. विद्यार्थ्यांना यश लाभेल.
- **कर्क** : सरकारी कामं मनाजोगी होतील. ताण-तणावातून सुटका होईल. प्रक्रिया उद्योगात संधी लाभतील.
- **सिंह** : जुनी येणी वसूल होतील. नव्या ओळखी लाभदायक ठरतील. अपेक्षित कामं मनासारखी होतील.
- **कन्या** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. उत्पन्नाचे अन्य पर्याय समोर येतील. प्रवासात काळजी घ्या.
- **तूळ** : महत्त्वाची कामं रखडतील. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल. विद्यार्थ्यांना अपेक्षित संधी प्राप्त होतील.
- **वृश्चिक** : विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील. कुलदेवतेची उपासना करावी. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **धनु** : सरकारी कामांना गती येईल. प्रवासात प्रकृतीची काळजी घ्यावी. प्रेम प्रकरणात वाद टाळायला हवे.
- **मकर** : कौटुंबिक समस्यांचा ताण राहील. आर्थिक बाबतीत फसवणूक संभवते. विद्यार्थ्यांना यश लाभेल.
- **कुंभ** : सरकारी कामं विलंबानं होतील. जुन्या सहकाऱ्यांच्या भेटीने समाधान लाभेल. बाकी चिंता नसावी.
- **मीन** : कौटुंबिक प्रश्नांबाबत दिलासा मिळेल. खरेदीचे व्यवहार लाभदायक ठरतील. महत्त्वाच्या भेटी होतील

सल्ला मोलाचा

### केस खूप गळतात?

केसगळती रोखणाऱ्या पॅकमध्ये कांद्याच्या रसाचा वापर केला जातो. कांद्यामध्ये सल्फरची मात्रा मुबलक प्रमाणात असते. हा घटक केसांच्या वाढीसाठी कारक ठरतो. कांद्याच्या रसात मध मिसळल्यास चांगले परिणाम बघायला मिळतात. हा रस डोक्याला चोळल्यास रक्तप्रवाह वाढतो आणि रक्त केसांच्या मुळांपर्यंत पोहोचल्याने तेथील ग्रंथी कार्यरत होतात. परिणामी, केस वाढू लागतात. मसाजमुळे केस मऊ-मुलायम होण्यासही मदत होते. म्हणजेच या पॅकमुळे केसांचं आरोग्य सुधारतं आणि सौंदर्यही वाढतं. सर्वात आधी दोन कांदे बारीक चिरा आणि मिक्सरमध्ये वाटून घ्या. कांद्याचा रस पिळून घ्या. या रसात दोन चमचे शुद्ध मध आणि चार चमचे लव्हेंडर ऑईल मिसळा. रात्री झोपताना या मिश्रणाचा लेप केसांवर लावा. आता शॉवर कॅपने केस झाकून टाका. हा लेप रात्रभर डोक्यावर रहायला हवा. सकाळी उठल्यावर केस सौम्य शॅम्पूने धुवा आणि नंतर कंडिशनरचा वापर करा. काही कारणाने रात्रभर डोक्यावर लेप ठेवणं शक्य नसेल तर किमान दोन तास लेप केसांवर राहील याची काळजी घ्या.

### २२ जानेवारी

दिनविशेष

- **१९२०** : संत साहित्याचे गाढे अभ्यासक ह. श्री. शेणोलीकर यांचा जन्म.
- **२००४** : ‘आकाश’ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी.
- **२०१३** : शिक्षक भरतीप्रकरणी हरियाणाचे माजी मुख्यमंत्री ओमप्रकाश चौताला आणि त्यांचा मुलगा अजय यांना दहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा.
- **२०१४** : केंद्रीय मंत्री शशी थरूर यांच्या पत्नी सुनंदा पुष्कर यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाचा तपास दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे सोपवला गेला.

महत्त्वपूर्ण काही...

### हरितगृह वायूंवर नियंत्रण

पृथ्वीच्या भूपृष्ठापासून दहा किमी उंचीवर ओझोन वायूचा जाड थर आढळतो. पृथ्वीवरील सर्व सजिवासाठी हे संरक्षण कवच आहे. पण ओझोन वायू भूपृष्ठालगत प्राणवायूच्या विघटनामुळे तयार होऊ लागल्यास तो पर्यावरणासाठी हानीकारक ठरतो. ओझोनची अशी निर्मिती पर्यावरण व मानवी आरोग्यास घातक असते. सीएफसी म्हणजे मानव निर्मित कूलिंग गॅस. हा वायू वातानुकूलन यंत्रे (एसी) किंवा शीतपेटया (फ्रीझर) यामध्ये थंडावा निर्माण करण्यासाठी वापरला जातो. मात्र नियंत्रित जागेत थंडावा निर्माण करतानाच हा वायू हळुहळू वातावरणात प्रवेश करतो, तेव्हा मोठ्या प्रमाणात उष्णता ग्रहण करून हवेत उबदारपणा वाढवण्याचं कार्य करतो. या चार हरितगृह वायूंना नियंत्रणात ठेवून पर्यावरण सुदृढ करण्याचं कार्य जीवनशैली बदलून सहज साध्य करु शकतो. शेवटी वातावरण, पर्यावरण हे सर्वांचं आहे ही भावना जनमानसात निर्माण होणं गरजेचं आहे. तरच या हरितगृहवायूंवर नियंत्रण सहज होऊ शकतं. सुदृढ पर्यावरण हा माझा हक्क आहे असं म्हणताना आपण त्यासाठी किती जबाबदारीने वागतो हेही तेवढंच महत्त्वाचं.

पंचांग

**बुधवार, २२ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष कृ. ८, नक्षत्र : स्वाती
चंद्रराशी : तूळ, शूल योग,
सूर्योदय : ७.१४, सूर्यास्त : ६.२५

फॉरवर्डस

प्रेमाच्या वणव्यात हृदय जळल्याचंही काही वाटत नाही...


**रोशनी में कुछ कमी रह गयी हो तो बता देना, दिल आज भी हाजिर है, जलने के लिए...**

आरोग्यमंत्र

### निवड मल्टीग्रेन ब्रेडची

सध्याच्या धावपळीच्या जमान्यात आहाराच्या संकल्पना बदलत चालल्या आहेत. झटपट खाण्याकडे तसंच तयार खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्याकडे ओढा वाढत आहे. त्यातच आहारात ब्रेडचं वाढतं प्रमाण विचारात घेण्याजोगं ठरत आहे. मात्र, या संदर्भातही पुरेशी काळजी घ्यायला हवी.

✲ गव्हाच्या ब्रेडपेक्षा मल्टीग्रेन ब्रेड आरोग्यासाठी योग्य असतो. मल्टीग्रेन ब्रेडमध्ये राई, जवस, बाजरी, गहू आदी धान्यांचा वापर होतो. त्यामुळे सालयुक्त धान्य पोटात जातं. या ब्रेडच्या सेवनाने वजन आणि कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित राहते. पौष्टिक घटकांनी युक्त असा हा ब्रेड हृदयरोग आणि मधुमेहाचा धोका कमी करतो, त्याचप्रमाणे पचनाशी संबंधित तक्रारीही कमी होतात. ✲ मल्टीग्रेन ब्रेडच्या एका स्लाईसमध्ये चार ग्रॅम फायबर असतं. फायबर शरीराला ताकद प्रदान करतं आणि रक्तदाब नियंत्रित ठेवून रक्तातील शर्करेचा स्तर योग्य राखण्यास मदत करतं. ✲ मल्टीग्रेन ब्रेडचं सेवन केल्यास मधुमेह, स्ट्रोक आणि कर्करोगाचा धोका कमी होतो. याउलट गव्हाच्या ब्रेडमुळे हे लाभ मिळत नाहीत. गव्हाचा ब्रेड पचण्यास जड असतो आणि या ब्रेडचं सेवन मधुमेहींच्या रक्तातील शर्करेचं प्रमाण वाढवण्यास कारक ठरतं. ✲ मैद्याच्या ब्रेडमध्ये कोलेस्टेरॉलचं प्रमाण नगण्य असतं. मल्टीग्रेन ब्रेडच्या एका स्लाईसमध्ये ६९ कॅलरीज असतात तर गव्हाच्या ब्रेडच्या एका स्लाईसमध्ये ६६ कॅलरीज असतात.



वाचा तर खरं

बाजारातून आणलेली केळी साधारणपणे दोन-तीन दिवसांनंतर काळी पडू लागतात. ती लिबलिबीत होतात. अशा मऊ झालेल्या केळांवर चिलटं आणि माशा बसल्याने ती खाण्यायोग्य रहात नाहीत. हळूहळू त्यांचा शिरोभागही काळा पडू लागतो. शेवटी ती टाकून द्यावी लागतात. हे टाळायचं असेल तर पुढील युक्ती वापरा. केळांच्या देठांना अल्युमिनियम फॉईल किंवा प्लास्टीक गुंडाळून ठेवा. काठ सेलोटेपने चिटकवा. अशा प्रकारे केळी ठेवली तर जास्त दिवस टिकतात.

‘राष्ट्र संचार’ (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

## तळेगावमध्ये बालनाट्य स्पर्धे'चे आयोजन

**तळेगाव दाभाडे :** अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद तळेगाव दाभाडे - मावळ शाखेच्या वतीने मावळ तालुक्यासाठी पै. मोहन महादेव काकडे यांच्या स्मरणार्थ ज्येष्ठ साहित्यिक गो.नी. दांडेकर करंडक आंतर शालेय बालनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा पहिली ते चौथी प्राथमिक गट व पाचवी ते दहावी माध्यमिक गट अशा दोन विभागात होणार असून, प्राथमिक विभागाच्या स्पर्धा ११ फेब्रुवारी रोजी व माध्यमिक विभागाच्या स्पर्धा १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत श्रीरंग कलानिकेतन सभागृह, वनश्री नगर, तळेगाव दाभाडे येथे होणार आहेत. तसेच या स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता होईल.

या स्पर्धांसाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेचे अर्ज अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद तळेगाव दाभाडे - मावळ शाखेचे कार्यालय शुभम कॉम्प्लेक्स, चाकण रोड, तळेगाव स्टेशन येथे मिळतील. अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ३१ जानेवारी ही आहे. मावळ तालुक्यातील सर्व शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन स्पर्धा प्रमुख नयनाताई डोळस (९९२१३८७३०७), भगवान शिंदे (९८२२७२५४५१) व अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद तळेगाव दाभाडे - मावळ शाखेचे अध्यक्ष सुरेश धोत्रे यांनी केले आहे.

# वेतनवाढ करारमुळे जीवनमान सुधारेल

## माथाडी कामगारांना आर्थिक मदत होईल: कामगार नेते इरफान सय्यद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** औद्यगिक क्षेत्रातील वाढत्या बदलामुळे कामगार संघटना मोडकळीस येऊन कामगारांचे उदयोगधंदे संकटात आले आहे. नोकरीवरच गदा येत असल्याने वेतन करार करताना अडचणी येत होत्या कामगार कपात आणि वेतन कपातीच्या निर्णयामुळे कामगार देशोधडीला लागत आहेत. तशातच व्यवस्थापन आणि कामगार यात समन्वय साधून वेतन करार करून माथाडी कामगारांना आणि व्यवस्थापन यामध्ये मार्ग काढून त्यांना काहीसा दिलासा देण्याचा प्रयत्नही महाराष्ट्र मजदुर संघटना करीत आहे. शिवसेना प्रणित महाराष्ट्र मजदुर संघटना आणि महाराष्ट्र राज्य माथाडी कामगार सल्लागार समिती सदस्य, तथा शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद यांच्या प्रयत्नातून पिंपरी चिंचवड/ पुणे शहरातील टाटा ग्रुप ऑफ कंपनीज च्या युनिट्समध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांना 5250 रुपयांची घसघशीत पगारवाढ लागू करण्यात आली. ही पगारवाढ जुलै 2024 या महिन्याच्या पगारामध्ये समाविष्ट देखील करण्यात आली आहे. वेतनात भरघोस वाढ झाल्यामुळे कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यानिमित्त कामगारांनी इरफानभाई सय्यद यांचा युनियनच्या कार्यालयात नुकताच सत्कार आयोजित केला होता. कार्याध्यक्ष परेश मोरे, उपाध्यक्ष भिवाजी वाटेकर, जन. सेक्रेटरी प्रवीण जाधव, संघटक प्रदीप धामणकर ,मातोश्री माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेचे चेअरमन पांडुरंग कदम, रायरेश्वर माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेचे चेअरमन सतीश कंठाळे, गोरक्ष दुबाले, श्रीकांत मोरे,बबन काळे,सुनील सावळे, अशोक साळुंके, नागेश व्हनवटे, समर्थ नायकवडे, विश्वनाथ गांगड, अमित पासलकर,रत्नाकर भोजणे, गणेश नाईकवाडे, आयुष शिंदे तसेच माथाडी मंडळातील टाटा ऑटो कॅम्प सिस्टीम लिमिटेड चिंचवड मुकादम केशव रासकर,आसल चाकण मुकादम गिरीश देशमुख,आसाल चाकण विजय खंडागळे,टी एम ऑटोमॅटिक सिस्टीम चिंचवड मुकादम गणेश पिंपरे,टॅको हॅन्ड्रीक्सन चाकण, मुकादम सचिन नाळे, टाटा ऑटो कॉम सिस्टम हिंजवडी मुकादम स्वामी गंगाधर, भोसरी मुकादम प्रताप खाडे कामगार नामे सुमित पाठारे,दौलत पवार, प्रदीप डफळ,विशाल कांबळे,दीपक शेळके,सिद्धेश्वर फाटक,प्रसाद शिंदे,संदीप धायरकर, दिलीप तेलंगे,शंकर स्वर्गेकर, आप्पासाहेब नवले,नामदेव जाधव, तसेच माथाडी कामगार व संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मगारांनी यावेळी इरफानभाईंचे आभार मानले.



## सराईत चोरट्याला अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** मौजमजेसाठी वाहनचोरी करणाऱ्या सराईत चोरट्याला वाकड पोलिसांनी सापळा रचून अटक केली. त्याच्याकडून सात गुन्हे उघडकीस आले असून नऊ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत. नवनाथ बाबासाहेब नरळे (वय २२, रा. जयहिंद कॉलनी, काळेवाडी) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहनचोरीच्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने तपास करत असताना तांत्रिक विश्लेषण तसेच बातमीदारामार्फत पोलिसाना सराईत चोरट्याबद्दल माहिती मिळाली. त्यानुसार संशयित नरळे याला वाकड पोलिसांनी सापळा रचून कसपटे वस्ती परिसरातून ताब्यात घेतले. विश्वासात घेऊन तपास केला असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून ५ लाख रुपये किमतीच्या नऊ दुचाकी हस्तगत करण्यात आहेत. त्यातील सात गुन्हे उघडकीस आले असून इतर दोन दुचाकीबाबत तपास सुरु आहे. वाकड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर, पोलीस निरीक्षक निता गायकवाड, सहायक निरीक्षक सुभाष चव्हाण, उपनिरीक्षक अनिरुद्ध सावर्डे, दिनेश चव्हाण, बिभीषण कन्हेरकर यांच्या पथकाने केली.

# आशियाई सिलंबम् स्पर्धेतील विजेत्यांचे केले स्वागत



**पिंपरी:** : दोहा कतार येथे झालेल्या आशियाई सिलंबम स्पर्धेमध्ये विजयी ठरलेल्या महाराष्ट्र संघातील खेळाडू व संघाचे मुख्य प्रशिक्षक संजय बनसोडे यांचा पिंपरी चिंचवड महापालिका माहिती व जनसंपर्क विभागाचे उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी महापालिकेत सत्कार केला. तसेच खेळाडूंना स्पर्धेत आलेले अनुभव जाणून घेत त्यांना विविध विविध विषयांवर मार्गदर्शन केले. नुकत्याच दोहा कतार येथे झालेल्या आशियाई सिलंबम स्पर्धेमध्ये महाराष्ट्र सिलंबम संघाने चमकदार कामगिरी करत १ सुवर्ण, ६ रौप्य आणि १ कांस्य पदक आपल्या नावावर केले. या स्पर्धेमध्ये आशिया खंडातील मलेशिया, दुबई, भारत, श्रीलंका, सिंगापूर, बांगलादेश, कतार, साउद अरेबिया या देशातील खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेत पिंपरी चिंचवड येथील रहिवासी महाराष्ट्र सिलंबमचे मुख्य प्रशिक्षक संजय बनसोडे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये भारतीय संघाकडून मुलांच्या गटात सूरज बांगर याने (१४ वर्षाखालील वयोगट) काठी फिरविणे या खेळ प्रकारामध्ये सुवर्णपदक आणि काठीची लढत मध्ये रौप्य पदक मिळविले. केतन नवले (खुला वयोगट) याने काठी फिरविणे या खेळ प्रकारात रौप्य पदक आणि काठीची लढतमध्ये कांस्य पदक मिळविले. मुलींच्या गटात रिद्धीका पाटील हिने (१२ वर्षाखालील वयोगट) काठी फिरविणे या खेळ प्रकारात रौप्य पदक आणि काठीची लढतमध्ये रौप्य पदक मिळवले. श्रेया दंडे हिने (१८ वर्षाखालील वयोगट) काठी फिरविणे खेळ प्रकारात रौप्य पदक आणि काठीची लढतमध्ये रौप्य पदक मिळवले. असे एकूण महाराष्ट्र संघासाठी १ सुवर्ण, ६ रौप्य आणि १ कांस्य पदके मिळाली. या सर्व खेळाडूंसोबत मुख्य प्रशिक्षक म्हणून पिंपरी चिंचवड येथील रहिवासी महाराष्ट्र सिलंबम स्पोर्ट्स अध्यक्ष संजय बनसोडे यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

# फेरीवाल्यांना ओळखपत्र, प्रमाणपत्राची प्रतीक्षा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** नववर्ष सुरू झाल्यानंतरही शहरातील पात्र फेरी विक्रेत्यांना अद्याप ओळखपत्र व विक्री प्रमाणपत्र मिळालेले नाही. महापालिका प्रशासनाकडून त्यासाठी केवळ तारीख पे तारीख दिली जात आहे. मात्र, फेरीवाल्यांना काही ओळखपत्र व प्रमाणपत्र अद्याप मिळालेले नाहीत. त्यासाठी त्यांच्या पदरी प्रतीक्षाच उरलेली आहे.

महापालिकेने न्यायालयाच्या आदेशानुसार 1 नोव्हेंबर ते 31 डिसेंबर 2022 या कालावधीत शहरातील फेरीवाले आणि पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण केले. त्यामध्ये एकूण 18 हजार 603 फेरीवाल्यांची नोंदणी झाली. त्यातील छाननी तसेच सुनावणीत कागदपत्रांची पुर्तता न केल्याने काही अर्ज बाद झाले. शहरातील एकूण 15 हजार 13 फेरीवाले पात्र ठरले आहेत. या पात्र फेरीवाल्यांना 2 वर्षांपेक्षा अधिक कालावधी उलटला तरी अद्याप ओळखपत्र व विक्री प्रमाणपत्र दिलेले नाही. फेरी विक्रेत्यांना सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांच्या नोंदणीसाठी 1 हजार रुपये शुल्क आहे. ओळखपत्र व विक्री प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी 200 रुपये शुल्क आहे. हे शुल्क आकारण्यासाठी ऑक्टोंबर 2024 पासुन सुरुवात झाली. दरम्यान, फेरी विक्रेत्यांना देण्यात येणार्या ओळखपत्र व प्रमाणपत्रावर क्षेत्रीय अधिकार्यांच्या डिजिटल स्वाक्षरीची प्रक्रिया शिल्लक आहे.

> फेरी विक्रेत्यांना ओळखपत्र आणि प्रमाणपत्र लवकर मिळावे, महापालिका आयुक्तांची भेट घेतली. सध्या अधिकर्यांच्या डिजिटल स्वाक्षरीचे काम सुरू आहे, अशी माहिती त्यांच्याकडून देण्यात आली. पुढील आठवडाभरापासून सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये ओळखपत्र आणि प्रमाणपत्राचे वाटप सुरू होणार आहे.
>
> **— काशिनाथ नखाते,** कामगार नेते

# बॅटरीचे ॲसिड घेऊन जाणाऱ्या टँकरचा अपघात

**थेरगांव:** थेऊर फाटा केसनंद रस्त्यावर एक्साइड बॅटरीचे ॲसिड लिक्विड वाहतूक करणारा ट्रक पलटी झाल्याची घटना घडली आहे. थेऊर फाटा येथून चिंचवड येथील एक्साइड बॅटरी कंपनीमध्ये हा टँकर चालला होता. तेव्हा टँकर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची माहिती मिळत आहे. यामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून कोणालाही टँकरच्या आसपास जाण्यास पोलिसांनी मनाई केली आहे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४९२/२०२४/४४८७

**अर्जदार**
फ्लोरा पार्क सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः गट नं. १५९२, चिखली, ता. हवेली, जि. पुणे - ४११०६२
तर्फे, अध्यक्षः श्री. संजय धनसिंग सपकाळे, सचिव : श्री. रावसाहेब भीमराव माळी.
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**प्रवर्तक / जाब देणार नं. १**
१. मे. एल. एम. के. असोसिएटस, नोंदणीकृत भागीदारी संस्था, तर्फे भागीदार,
अ. श्री. सुनिल ज्ञानदेव लोखंडे, पत्ताः पाटील नगर, चिखली,
ता. हवेली, जि. पुणे - ४११०६२
ब. श्री. जितेंद्र राजकुमार मेहता, क. श्री. सतीश दिगंबर कहाणे
अनु. क्र. ब व क पत्ताः चिखली, ता. हवेली, जि. पुणे - ४११०६२
अनुक. २ ते ३ तर्फे कु.मु. म्हणुन जाब देणार नं. २
२. श्री. रमेश बबन लोखंडे, ३. श्री. संजय बबन लोखंडे
अनु क्र. २ व ३ पत्ताः चिखली, ता. हवेली, जि. पुणे - ४११०६२

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये फ्लोरा पार्क सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः गट नं. १५९२, चिखली, ता. हवेली, जि. पुणे- ४११०६२ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४९२/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०७/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृद्धी कोठारी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २८/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २०/०१/२०२५
शिक्का
सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम १०(१) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.१४७/२०२४/४४८४

**अर्जदार**
नियो.सिध्दी अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः-स.नं.५२/३/१(पैकी), मौजे वडगांव शेरी, ता. हवेली, जि. पुणे - ४११ ०१४.
तर्फ,
मुख्य प्रवर्तक, सौ. योजना अनंत मंकणी.
**विरुद्ध**
१.मे.भुजबळ –करपे असोसिएटस् तर्फे भागीदार, ए.श्री.महेश संभाजीराव करपे.
ब. श्री. रविंद्र ज्ञानेश्वर भुजबळ.
रा.श्रीरामकुंज,चंदननगर, खराडी, पुणे- ४११ ०१४.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (५), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. सिध्दी अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ताः-स.नं.५२/३/१ (पैकी), मौजे वडगांव शेरी, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०१४ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र.१४७ / २०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १५/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १अ व ब गैरहजर. सबब जाब देणार क्र. १अ व ब यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि.१८/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १अ व ब यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २०/०१/२०२५
**संजय राऊत**
शिक्का

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४९३/२०२४/४४८९

**अर्जदार**
सैनिक रेसिडेन्सी फेज ‖ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. १४८, हिस्सा नं. २/१/६६, बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे- ४११०१६
तर्फे, अध्यक्षः श्री. शिरीष शंकर भोसले, सचिव : श्री. राजन रोहिदास मेस्त्री.
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**प्रवर्तक / जाब देणार नं. १,**
श्री. किशोर विश्वास पाटील,
पत्ताः रा. फ्लॅट नं.१२, अमरनाथ अपार्टमेंट (अ) कॉलनी नं. ३, गणेशनगर,
बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०१६..

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये सैनिक रेसिडेन्सी फेज 11 सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः सर्वे नं. १४८, हिस्सा नं. २/१/६६, बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०१६ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४९३/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०७/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृद्धी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २८/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २०/०१/२०२५
शिक्का
सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.१४८/२०२४/४४८३

**अर्जदार**
नियो. समृध्दी हाईटस् सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः-स.नं.२७,हिस्सा नं. २/१/३१, कळस, ता. हवेली, जि. पुणे-४१३१०५.
तर्फे,
मुख्य प्रवर्तक, श्री. सचिन शिवाजी शेटे.
**जाब देणार**
**विरुद्ध**
१.मे.बालाजी असोसिएटस् तर्फे प्रोप्रायटर,
श्री. नितीन शिवाजी भिलारे.
रा.कॉलनी नं.१३,गणेश नगर, बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (५), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. समृध्दी हाईटस् सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ताः- स.नं. २७, हिस्सा नं. २/१/३१, कळस, ता. हवेली, जि. पुणे - ४१३ १०५ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. १४८/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १५/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १ गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. ११/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २०/०१/२०२५
शिक्का
सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम ११(३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४९४/२०२४/४४८६

**अर्जदार**
कदम प्लाझा अ-२ बिल्डींग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं.७/१/प्लॉट नं. अ-१, स.नं.७/१/प्लॉट नं. एक्स, कात्रज,
ता. हवेली जि. पुणे- ४११०४६. तर्फे, अध्यक्षः श्री. सुनिल तुकाराम शिळीमकर,
सचिव : श्री. सुनिल शंकर सौदागर.
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**विकसक / जाब देणार नं. २**
१. मे. योगीराज डेव्हलपर्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था, तर्फे भागीदार, श्री. प्रसन्ना माधवराव कदम ऑफिस पत्ता- प्लॉट नं. एक्स + ए१, कदम प्लाझा, स.नं. ७/१, कात्रज, ता. हवेली, जि. पुणे - ४११०४६. जागा मालक / जाब देणार नं. २
२.ए. श्री. कृष्णा शंकरराव कदम, बी. श्री. अशोक शंकरराव कदम, सी. लिला शिवाजीराव कदम डी. नितीन शिवाजीराव कदम, ई. श्री. हेमंत शिवाजीराव कदम, एफ. संगिता मोहन दरेकर जी. अनिता शैलेंद्र भोसले, एच. कविता सुनील पवार, आय. प्रसन्ना माधवराव कदम जे. अभिजीत माधवराव कदम, के. किरण शशिकांत कदम, एल. प्रज्ञा शशिकांत कदम एम. परिणीता प्रताप शिंदे, एन. श्रध्दा शशिकांत कदम, ओ. आदित्य शशिकांत कदम पी. सुरेश विठ्ठल कदम, क्यु. रमेश विठ्ठल कदम, आर. चंद्रकांत विठ्ठल कदम, एस. प्रकाश विठ्ठल कदम, टी. प्रभाकर विठ्ठल कदम, यु. नंदा बबन काळभोर
पत्ताः स.नं. ७/१/प्लॉट नं. अ-१, स.नं. ७/१/प्लॉट नं. एक्स, कात्रज, ता. हवेली जि. पुणे- ४११०४६. इतर संस्था / जाब देणार नं. ३
३."कदम प्लाझा अ-१ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित '
पत्ताः स.नं. ७/१/प्लॉट नं. अ-१, स.नं. ७/१/प्लॉट नं. एक्स,
कात्रज, ता. हवेली जि. पुणे - ४११०४६

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये कदम प्लाझा अ-२ बिल्डींग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः स.नं.७/१/प्लॉट नं. अ-१, स.नं.७/१/प्लॉट नं. एक्स, कात्रज, ता. हवेली जि.पुणे- ४११ ०४६ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४९५/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०७/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृद्धी कोठारी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २८/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २०/०१/२०२५
शिक्का
सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

पान १ वरून

## कराडचे पाय खोलात..!

मोठा पुरावा लागला आहे. पोलिसांच्या हाती आलेल्या या व्हिडिओत वाल्मीक कराड,विष्णू चाटे,सुदर्शन घुले आणि इतर आरोपी एकत्रितपणे दिसत आहेत. दुपारी १२ वाजताच्या दरम्यानचा हा व्हिडिओ आहे. विष्णू चाटे याच्या कार्यालयातील हे सीसीटीव्ही फुटेज पोलीसांनी ताब्यात घेतले आहेत.

खंडणी व देशमुख हत्या प्रकरणाचे कनेक्शन आहे. २ कोटी रुपयांपैकी ५० लाख निवडणूक काळात दिले होते. उर्वरित रक्कम घेण्यासाठी वाल्मिकची गँग कंपनी कार्यालयात गेली असता तेथे त्यांची सुरक्षारक्षकाशी बाचाबाची झाली. त्यानंतर सुरक्षा रक्षकाने सरपंच संतोष देशमुख यांना फोन करून बोलावले. देशमुख यांनी मध्यस्थी करत प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला.

खंडणी प्रकरणात मध्यस्थी केल्याचा राग मनात ठेवून संतोषची हत्या झाल्याचे सांगितले जाते. खंडणी आणि खून प्रकरण एकमेकांशी संलग्न असल्याने दोन्ही प्रकरणांचा तपास सीआयडी आणि एसआयटीमार्फत केला जात आहे.

## पालिका निवडणुक

प्रभाग रचना यासाठी किमान ९० दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात जानेवारी अखेरपर्यंत निवडणुकांसंदर्भात निकाल न लागल्यास एप्रिल-मे महिन्यात निवडणुका घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे या निवडणुका थेट सप्टेंबर- ऑक्टोबरमध्येच घ्याव्या लागतील, अशी परिस्थिती आहे.

## आता करभरणा ...

अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात हे विधेयक मांडलं जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण हे विधेयक मांडतील. यामध्ये सध्याचे करासंदर्भातील कायदे अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने नवीन नियमावलीचा समावेश असेल. ही नियमावली सध्याच्या आर्थिक परिस्थितीला अनुसरून असेल, असंही सांगितलं जात आहे.

## नवीन विषाणूचा शिरकाव

व्यक्तीला प्रभावित करू शकतो.

जीबीएस या आजाराचे पहिले लक्षण म्हणजे अशक्तपणा आणि हातपाय मुंग्या येणे. या आजाराचे कारण सध्या माहीत नाही. गुइलेन बॅरे सिंड्रोमची कारणे पूर्णपणे समजून घेणे वैद्यकीय शास्त्रासाठी अजूनही एक आव्हान आहे. गुइलेन बॅरे सिंड्रोम दोन तृतीयांश रुग्णांमध्ये शस्त्रक्रिया किंवा लसीकरणानंतर सात दिवस ते पाच आठवड्यानंतर दिसून आले आहे. जीबीएस किंवा एआयडीपी या आजारावर आयव्हीआयजी हे इंजेक्शन देणे महत्त्वाचे आहे. हे इंजेक्शन महागडे असून तीन दिवसांच्या आत दिल्यास रुग्णांवरील धोका टळतो. मात्र, हे उपचार तज्ज्ञ डॉक्टरांच्या निगराणीमध्येच हिताचे ठरते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

## राज्य निवडणूक आयोगाच्या ..

नावाची शिफारस राज्यपालांकडे केली होती. त्यानुसार राज्यपालांची दिनेश वाघमारेंच्या नावाला मंजुरी मिळाली आहे. त्यानंतर राज्य सरकारच्या वतीने वाघमारेंच्या नियुक्तीचा एक आदेश जाहीर करण्यात आला आहे.राज्य सरकारतर्फे सरकारी आदेश काढून त्यांच्या नावाची घोषणा केली. दिनेश वाघमारे हे पुढच्या पाच वर्षांसाठी राज्याचे निवडणूक आयुक्त असतील.

## इलेक्ट्रिक बसने ५०० किलोमीटर्सचा

फक्त नाशिक, पुणे नाही तर थेट छत्रपती संभाजी नगर , नगर, कोकणात थेट सांवतवाडी पर्यंत ही बस एका चार्जमध्ये प्रवास करू शकते.

## नक्षलवाद्यांचा खात्मा!

सुरक्षा दल यशस्वी झाले आहे. चलापथी हा श्रीकालुलम-कोरापुट विभागातील दहशतवादी गटाचा नेता होता. चलापथी याच्यावर पोलिसांनी १ कोटी रूपयांचा इनाम जाहीर केला होता.

## आघाडीची बिघाडी! काँग्रेस नेत्याची न्यायालयात धाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभेच्या निवडणुकांचे बिगुल वाजल्यानंतर 'इंडी' आघाडीतील काँग्रेस आणि आम आदमी पक्ष यांच्यातील वाद आता चव्हाट्यावर येऊ लागले आहेत. काँग्रेसचे वरिष्ठनेते संदीप दीक्षित यांनी आम आदमी पक्षाचे नेते संजय सिंह आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी दिवाणी आणि फौजदारी मानहानीचे खटले दाखल केले आहेत. आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी २६ डिसेंबर रोजी पत्रकार परिषद घेत दीक्षित यांच्यावर आरोप केला होता की त्यांनी आम आदमी पक्षाचा पराभव करण्यासाठी भाजपकडून कोट्यावधी रूपये घेतले आहेत. दीक्षित यांनी हा आरोप फेटाळत आम आदमी पक्षाच्या नेत्यांविरोधात मानहानीचा दावा ठोकला आहे. संदीप दीक्षित यांनी त्यांच्यावर केलेले आरोप फेटाळून लावत १० कोटी रूपयांची मागणी केली. २० जानेवारी रोजी यातील दिवाणी खटल्याची सुनावणी होणार होती.

## भारताने चॅम्पियन ट्रॉफी जिंकली

साखळी फेरीत पाकिस्तान, इंग्लंड, श्रीलंका यांना पराभूत केले होते. पाकिस्तानला दोनदा भारताने या स्पर्धेत पराभूत केले होते. तसेच श्रीलंकेलाही भारताने दोनदा हरवले.मात्र इंग्लंडने भारताला दुसऱ्या सामन्यात पराभूत करत अंतिम फेरी गाठली होती. मात्र अंतिम फेरीत पुन्हा भारत आणि इंग्लंड आमने-सामने होते. अखेर अंतिम सामन्यात भारतानेच बाजी मारली. विक्रांत केणी याने या स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व केले होते. त्याच्या नेतृत्वात भारतीय संघाने मिळवलेल्या या यशाचे सध्या देशभरातून कौतुक होत आहे. भारतीय संघाने विजेतेपद जिंकल्यानंतर जोरदार सेलिब्रेशनही केले.

» Selected

## लोणीकंदमध्ये आढळला फुरसा



**शिक्रापूर :** लोणीकंद परिसरातील कल्पतरू पार्क सोसायटीच्या पार्किंग मध्ये एक साप असल्याचे सुलोचना बेंद्रे यांना दिसले. त्यांनी याबाबतची माहिती निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे सर्पमित्र सुरज वाघमारे यांना दिली असता, सर्पमित्र सुरज वाघमारे, आदित्य वाघमारे यांनी तेथे धाव घेत पाहणी केली असता पार्किंग मध्ये अतिविषारी फुरसे जातीचा साप असल्याचे दिसून आले. मात्र, लोणीकंद परिसरात प्रथमच विषारी फुरसे जातीचा साप आढळून आला असून, परिसरातील डोंगराळ भागामुळे सदर साप मनुष्यवस्तीत आल्याचा अंदाज निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे सर्पमित्र सुरज वाघमारे यांनी वर्तविला आहे. दरम्यान सदर सापाला पकडून निसर्गाच्या सानिध्यात मुक्त करण्यात आले आहे.

## कामगाराला ऑनलाईन लुटले



**शिक्रापूर :** रांजणगाव एमआयडीसी येथील कंपनीतून रात्रीच्या सुमारास मोहमद अन्सारी हे पायी घराकडे जात असताना, पाठीमागून दुचाकीहून दोन युवक आले. त्यांनी मोहमद यांना दारु कोठे मिळते, कोठे राहतो असे विचारून आम्ही पण ढोकसांगवीत चाललो, असे म्हणून दुचाकीवर बसवले. त्यानंतर काही अंतर जात मारहाण करत त्यांचा मोबाईल काढून घेत पासवर्ड विचारून एका मोबाईलवर एक हजार रुपये पाठवून घेतले. दरम्यान मोहमदच्या ओळखपत्राचा फोटो काढून घेत याबाबत कोणास काही सांगितले अथवा पोलिसांमध्ये गेला, तर तुला जीवे मारु अशी धमकी देत दोघे निघून गेले. याबाबत मोहमद आदिल अन्सारी (२२, रा. ढोकसांगवी ता. शिरुर) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे.

## रब्बी हंगामात चांगले उत्पादन, हरभराच्या क्षेत्रात वाढ



**पुणे :** राज्यात रब्बी हंगामातील पिकांच्या पेरण्या सरासरी क्षेत्रापेक्षा अधिक म्हणजे ११७ टक्के क्षेत्रावर झालेल्या आहेत. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांप्रमाणेच रब्बी हंगामातील धान्योत्पादनात वाढ होऊन यंदा चांगले उत्पादन हाती येण्याचा कृषी आयुक्तालयाचा प्राथमिक अंदाज आहे. रब्बी हंगामात हरभरा हे प्रमुख पीक झाले असून, तब्बल २८.४० लाख हेक्टरवर (४५ टक्के क्षेत्र) पेरा पूर्ण झाला असून, त्याखालोखाल गहू, मका या पिकांचा पेराही सरासरीपेक्षा अधिक झाला आहे.

खरीप हंगामात झालेला मुबलक पाऊस, धरणांमध्ये असलेल्या शिल्लक पाण्याचा मुबलक साठा, भूगर्भातील पाणीपातळी चांगली असल्याने विहिरी, बोअरवेलमधून शाश्वत पाण्याची हमी असल्यामुळे पेरणी क्षेत्रात भरीव वाढ झाल्याचे सांगण्यात आले. रब्बी हंगामातील प्रमुख पिकांमध्ये हरभरा पिकाने सर्वोच्च स्थान गाठले आहे.

## मालवाहतूक करणारा ट्रक उलटला

**लोणी काळभोर :** थेऊर फाटा केसनंद रस्त्यावर एक्साइड बॅटरीचे ॲसिड लिक्विड वाहतूक करणारा ट्रक उलटल्याची घटना घडली आहे. ही घटना थेऊर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील कांबळे वस्ती परिसरात मंगळवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, थेऊर फाटा येथून चिंचवड येथील एक्साइड बॅटरी कंपनीमध्ये हा टँकर चालला होता. तेव्हा टँकर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने, हा अपघात झाल्याची माहिती मिळाली आहे. यामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली असून, पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. खबरदारीचा उपाय म्हणून कोणालाही टँकरच्या आसपास जाण्यास पोलिसांनी मनाई केली होती.

# एमआयडीसीत कंपनी मालकावर गोळीबार

### दुचाकीवरून आलेल्या दोघांचा थरार, सीसीटीव्हीच्या दृष्यावरून आरोपींचा शोध सुरु

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चाकण एमआयडीसी परिसरात गोळीबाराची घटना घडली आहे. या घटनेत स्टील कंपनी मालकावर गोळीबार झाला आहे. यामध्ये कंपनी मालकाच्या पोटात आणि पाठीत २ गोळ्या लागल्या आहेत. या गोळीबारानंतर आरोपींनी पळ काढला. चाकण औद्योगिक वसाहतीत वराळे ( ता. खेड ) ही घटना सोमवारी (दि. २० ) सकाळी अकराच्या सुमारास घडली. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. महाळुंगे एमआयडीसी पोलिसांच्या हाती काही सीसीटीव्ही फुटेज लागले असून त्यावरून आरोपींचा शोध सुरु आहे.



पुणे वराळे : ( ता. खेड ) येथे कंपनीत मोटारीतून आलेले कंपनीचे मालक आणि दुचाकीस्वार हल्लेखोर.

चाकण औद्योगिक वसाहतीत कैलास स्टील कंपनीचे मालक अजय विक्रम सिंग (वय ४० वर्ष, रा. हिंजवडी, पुणे) असे गोळीबारात जखमी झालेल्या उद्योजकांचे नाव आहे. कंपनी मालक आपल्या मोटारीतून कंपनीत आल्यानंतर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांच्यावर गोळीबार केला. या गोळाबारात एक गोळी कंपनी मालकाच्या पोटात आणि दुसरी पाठीत लागली. त्यामुळे जखमी अवस्थेत कंपनी मालक जमीनीवर पडले. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी कंपनी मालकाला सुरुवातीला चाकण येथील रूग्णालयात दाखल केले. सध्या कंपनी मालकावर पुण्यात एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.


चाकण एमआयडीसी मध्ये वराळे परीसरात कैलास स्टील कंपनी आहे. कंपनीचे मालक सकाळी अकराच्या सुमरास आपल्या मोटारीतून कंपनीत आले. त्यांच्या पाठोपाठ दुचाकीवरून आलेल्या २ हल्लेखोरांनी कंपनीत शिरून मालकावर गोळीबार केला आहे. हल्लेखोर हेल्मेट घालून दुचाकीवरून आले होते. घटनास्थळी फायरिंग केल्यानंतर आरोपींनी वराळे ते भांबोली या दिशेने पलायन केले आहे. उद्योजकांवर झालेल्या गोळीबारानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सर्व हद्दीत नाकाबंदी लावण्याचे आदेश दिले आहेत. पोलीस नियंत्रण कक्षालाही याबाबत कळविण्यात आले आहे. पुणे शहर आणि पुणे ग्रामीण पोलिसांनाही या गोळीबाराबाबत कळविण्यात आले आहे. ठिकठिकाणी नाकाबंदी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गोळीबार भागीदारीच्या व्यावसायिक वादातून झाला की अन्य कारणावरून झाला याबाबतचे नेमके कारण आणि आरोपींची ओळख पटवण्यासाठी पोलीस तपास सुरू आहे. पोलिसांकडून आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली जात आहे.

जखमी उद्योजक सिंग यांच्याशी पोलिसांनी संवाद साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी आपले कुणाशीही कसलेही वैर नसल्याचे पोलिसांना सांगितले आहे. गोळीबारात जखमी सिंग यांच्यावर उपचार सुरु असल्याने त्यांच्याकडून अधिक माहिती घेण्यात पोलिसांवर मर्यादा आल्या आहेत. हल्लेखोर आरोपी वराळे- भांबोली बाजूकडून आले आणि पुन्हा त्याच दिशेने पळून गेल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. महाळुंगे एमआयडीसी पोलिसांकडून तपास सुरु आहे.

## कॉपीमुक्त अभियान अंतर्गत जनजागृती सप्ताहाचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** आगामी इयत्ता १० व १२ वीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर पुणे राज्यमंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी सर्व विभागीय मंडळांना प्रत्येक माध्यमिक विद्यालय आणि उच्च माध्यमिक विद्यालयांत २० जानेवारी ते २६ जानेवारी २०२५ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या कॉपीमुक्त अभियानअंतर्गत जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्याबाबत सूचना दिल्या आहेत, अशी माहिती पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ भाऊसाहेब कारेकर यांनी दिली आहे.



१० वी व १२ वी या दोन्ही परीक्षांना राज्यातून सुमारे ३१ लाख विद्यार्थी प्रविष्ट होणार आहेत. या परीक्षांत विविध मार्गांनी होणाऱ्या गैरप्रकारांचा मंडळाला सातत्याने सामना करावा लागतो. त्यादृष्टीने विभागीय मंडळे आपापल्या स्तरावर उपाययोजना व उपक्रम राबवीत असतात. त्या अनुषंगाने मुख्यमंत्र्याच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत आणि शिक्षणमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती सप्ताहाचे आयोजन केले असून याबाबत विभागीय मंडळे आणि त्यांच्याकडून सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना सूचना दिल्या आहेत.

याबाबत, पुणे राज्यमंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताहाचे नियोजन प्रसारित केले आहे. यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, शाळा विकास व व्यवस्थापन समिती सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक व माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक व प्राचार्य, शिक्षक यांना संयुक्त सभेमध्ये कॉपीमुक्त अभियानाची शाळा पातळीवर अंमलबजावणी करण्याबाबत प्राचार्य व मुख्याध्यापक यांनी माहिती द्यायची आहे.

मंगळवारी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये परिपाठाच्या वेळी कॉपीमुक्त अभियानाची शपथ घेण्यात आली. बुधवारी शाळा स्तरावर मंडळ शिक्षासूचीचे वाचन करणे, मंडळाच्या उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूस असलेल्या सूचना व प्रवेश पत्रावरील सूचनांचे वाचन करणे, गैरमार्ग केल्यास होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देणे, गुरुवारी परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी घ्यावयाचा आहार व आरोग्याची काळजी याबाबत तज्ज्ञांमार्फत पालक व विद्यार्थ्यांना उद्बोधन करणे. शुक्रवारी परीक्षेला सामोरे जाताना अभ्यासाची तयारी, परीक्षा तणावमुक्त वातावरणात कशी देता येईल, उत्तरपत्रिका कशा प्रकारे लिहाव्यात याबाबत तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन तसेच राज्य मंडळामार्फत तयार केलेली चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखविणे, शनिवारी कॉपीमुक्त अभियानाच्या जागृतीसाठी कॉपीमुक्ती घोषवाक्यासह शाळा परिसरात जनजागृती फेरी काढणे, रविवारी ग्रामसभेत मुख्याध्यापक, शिक्षकांनी कॉपीमुक्त अभियानासंदर्भात माहिती देणे, जनजागृती करून कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी ग्रामस्थांना आवाहन करणे, याप्रमाणे नियोजन करण्याच्या सूचना राज्यमंडळाकडून दिल्या आहेत, असे डॉ. कारेकर यांनी सांगितले.

## गोळीबाराच्या घटनेने शिरूर हादरले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिरूर :** पुणे जिल्ह्यातील शिरूरमध्ये एका व्यावसायिकावर गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण पुणे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चार वर्षांपूर्वी इन्कम टॅक्स विभागाकडे अर्ज केल्याचा गैरसमज झाल्याने हा गोळीबार झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणी महेंद्र मोतीलाल बोरा (वय ५३, धंदा-किराणा दुकान, रा. सरदार पेठ, शिरूर) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० जानेवारी रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास ही घटना घडली आहे. शिरूर शहरातील सरदार पेठ येथील स्वीटी प्रोव्हिजन स्टोअर्ससमोरील हलवाई चौक ते मारुती आळी रस्त्यावर फिर्यादी महेंद्र बोरा यांनी आरोपीविरुद्ध चार वर्षांपूर्वी इन्कम टॅक्सकडे अर्ज केल्याचा गैरसमज आरोपीला झाला होता. या गैरसमजातून, आरोपी कृष्णा वैभव जोशी (रा. सरदार पेठ, शिरूर, जि. पुणे) याने मद्यपान करून फिर्यादीच्या दुकानाजवळ येऊन त्यांना शिवीगाळ केली.

शिवीगाळ करत असताना आरोपीने स्वतःजवळ असलेले पिस्तूल बाहेर काढले आणि "मी तुला आज जिवंत सोडणार नाही" अशी धमकी देत पिस्तूलाचा खटका दाबला. फिर्यादीने प्रसंगावधान राखत आरोपीचा हात बाजूला सारून त्याच्या हातातील पिस्तूल हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. या झटापटीदरम्यान गोळी झाडली गेली. सुदैवाने यात कोणालाही इजा झालेली नाही.

गोळीबारानंतर आरोपीने फिर्यादीला पुन्हा जीवे मारण्याची धमकी दिली आणि घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी कृष्णा वैभव जोशी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे.

## वाहनाच्या धडकेत एक ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





अपघात

**शिक्रापूर :** कारेगाव (ता. शिरुर) येथील पुणे नगर महामार्गावर दुचाकीहून चाललेल्या दोघांना अज्ञात वाहनाने धडक देऊन झालेल्या अपघातात कैलास रामचंद्र जगताप ठार झाले, तर विकास अभिमन्यू गायकवाड हे जखमी झाल्याने रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे अज्ञात वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारेगाव येथील पुणे-नगर महामार्गावरून विकास गायकवाड व कैलास जगताप हे दुचाकीहून अहमदनगर बाजूने पुण्याच्या दिशेने चाललेले असताना, पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाची गायकवाड यांच्या दुचाकीला धडक बसून ते दोघे रस्त्यावर पडले. पाठीमागे बसलेल्या कैलास रामचंद्र जगताप (४४, रा. ढोकसांगवी ता. शिरुर) यांचा मृत्यू झाला, तर दुचाकीचालक विकास अभिमन्यू गायकवाड (२३, रा. जगताप वस्ती ढोकसांगवी ता. शिरुर) हे गंभीर जखमी झाले. दुचाकीला धडक देणारा अज्ञात वाहन चालक पळून गेला. याबाबत राहुल रंगनाथ जगताप (३४, रा. ढोकसांगवी ता. शिरुर) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

## क्षितिजाचे प्रतिबिंब

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




पुणे एक सुन्दर शितल सायंकाळी मावळतीच्या रंगछटेत भीमेच्या प्रवाहात उजनी परिसरात टिपलेले नितांत देखणे दृष्य. (छायाचित्र विजयकुमार हरिश्चंद्रे.)

## वेगावर नियंत्रण ठेवले तर अपघात टाळता येतात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** विद्यार्थ्यांनी वाहन चालवताना हेल्मेट व वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. १८ वर्षांच्या आतील मुला-मुलींनी वाहन परवाना नसताना वाहन चालू नये. वाहन चालवताना योग्य दक्षता व वेगावर नियंत्रण ठेवले तर अपघात टाळता येतील, असे आवाहन पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाच्या इन्स्पेक्टर कोमल गाडेकर यांनी केले.

प्रादेशिक परिवहन विभाग पिंपरी चिंचवड व अण्णासाहेब आवटे कॉलेज मंचर यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत व्याख्यान वेगावर नियंत्रण हेच कुटुंबाचे रक्षण या विषयावर विद्यार्थ्यांसाठी रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत व्याख्यान मंचर येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात आयोजित केले होते. यावेळी पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाच्या इन्स्पेक्टर कोमल गाडेकर व इन्स्पेक्टर किरण चौधरी उपस्थित होते. किरण चौधरी यांनी रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत सर्व विद्यार्थ्यांना शपथ दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी सर्व विद्यार्थ्यांना वाहन चालवताना घ्यावयाची काळजी व हेल्मेट चा वापर कसा किती फायद्याचा हे पटवून दिले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक ज्यूनिअर विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रकाश कणसे तर सूत्रसंचालन प्रा. कैलास एरंडे यांनी केले. तर प्रा. अविनाश झावरे यांनी आभार मानले.



### पिकांना होणार फायदा, खो-यातील धरणांत ७६.३५ टक्के पाणीसाठा

## नीरा डाव्या कालव्यातून रब्बीसाठी दुसरे आवर्तन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** बारामती, इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना वरदान ठरणा-या वीर धरणाच्या नीरा डाव्या कालव्यामधून रब्बी पिकांच्या सिंचनाकरिता १५ जानेवारीपासून दुसरे आवर्तन सोडण्यात आले असल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या सुत्रांनी दिली. दरम्यान, नीरा खोऱ्यातील चारही धरणांत ७६.३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून, उन्हाळी आवर्तन सोडल्यानंतरही धरणांत पाणीसाठा शिल्लक राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



यंदा नीरा खोऱ्यात समाधानकारक पाऊस झाल्यामुळे नीरा देवघर, भाटघर, वीर आणि गुंजवणी धरणांत मंगळवारी (दि. २१) सकाळी सहा वाजता ३६.९०१ टीएमसी म्हणजेच ७६.३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी यादिवशी चारही धरणांत ३०.४०६ टीएमसी पाणी साठा उपलब्ध होता. परिणामी नीरा खोऱ्यांतील धरणांत गतवर्षापेक्षा यंदा सुमारे साडेसहा टीएमसीने अधिक पाणीसाठा उपलब्ध आहे.

मंगळवारी (दि. २१) सकाळी सहा वाजता पुणे, सातारा, सोलापुर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या नीरा देवघर धरणांत ९.०५२ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा असून, ७७.१८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

**३६.९०१ टीएमसी पाणी**

- नीरा देवघर, भाटघर, वीर आणि गुंजवणी चारही धरणांमध्ये मंगळवारी ( दि.२१) सकाळी सहा वाजता ३६.९०१ टीएमसी एवढा उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. या चारही धरणां मध्ये गतवर्षी आजच्या दिवशी (दि.२१) ३०.४०६ टीएमसी म्हणजे ६२.९१ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. म्हणजेच गत वर्षापेक्षा यंदा साडेसहा टीएमसी म्हणजे १३.४४ टक्के पाणी साठा जादा आहे.

**आवर्तनामुळे रब्बी पिकांना फायदा**

- वीर धरणाच्या नीरा डाव्या कालव्यातून १५ जानेवारीपासून ८२७ क्युसेक्सने रब्बी हंगामातील सिंचनाकरिता दुसरे आवर्तन सोडण्यात आले. पुरंदर, बारामती, इंदापूर तालुक्यातील शेतक-यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. ऊस, गहू, हरभरा, मका या पिकांना या पाण्याचा फायदा होणार असल्याने उत्पादनात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. हे आवर्तन साधारण ४० दिवस सुरू असते. मात्र, शेतक-यांच्या मागणीनुसार व पाण्याच्या उपलब्धतेनुसार जलसंपदा विभाग आवर्तन कमी-अधिक दिवस सुरू ठेवत असते.

» Selected

## व्हॉईस ऑफ मिडिया, तालुकाध्यक्षपदी सुरज देवकाते



**बारामती :** पुणे येथे पार पडलेल्या पत्रकार संघटनेच्या बैठकीमध्ये सुरज बाळू देवकाते यांची "व्हॉईस ऑफ मिडिया" या पत्रकार संघटनेच्या (डिजिटल मीडिया विंग) बारामती तालुकाध्यक्ष पदी एकमताने निवड करण्यात आली. पत्रकारिता क्षेत्रांमध्ये मिळवलेली मास्टर्स ऑफ जर्नालिझम ची डिग्री तसेच पत्रकारिता क्षेत्रांमध्ये निर्भीडपणे केलेले काम व अनुभव पाहता त्यांची बारामती तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. व्हॉईस ऑफ मिडिया (डिजिटल मीडिया विंग) चे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या सूचनेनुसार, प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार, कार्याध्यक्ष अशोक घावटे, पुणे जिल्हाध्यक्ष अमीन गोरे, उपाध्यक्ष अश्विनी पुरी यांच्या हस्ते सदर निवडीचे पत्र देण्यात आले. पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी एकत्र येऊन लढा उभारणार असल्याचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष सुरज देवकाते यांनी सांगितले.

## जयंत ताकवणे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड



**पारगांव :** पारगांव (ता. दौंड) चे सुपुत्र जयंत मारुती ताकवणे यांची नुकतीच पोलीस उपनिरीक्षकपदी निवड करण्यात आली. जयंत ताकवणे हे सुपा पोलीस स्टेशन (ता. बारामती) सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक म्हणुन बऱ्याच वर्षांपासून महाराष्ट्र पोलीस सेवेमध्ये काम सांभाळीत असताना, कर्तव्यामध्ये कुठलीही कसर न ठेवता अतिशय प्रामाणिक कर्तव्यनिष्ठ जबाबदारी पार पाडत आहेत. खूप मेहनत, कर्तव्यदक्षतेच्या जोरावर आज ते या पदावर विराजमान झाले आहेत. त्यांच्या या कार्यामुळे ताकवणे परिवार, पारगांव, शिंदेवाडी मध्ये आनंदी वातावरण निर्माण झाले आहे. त्यांचे ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## निमोणे येथे आणखी एक बिबट्या जेरबंद

**शिरूर :** शिरूर तालुक्यातील निमोणे गावातील जाधव वस्तीत रविवारी रात्री वन विभागाने शेतात लावलेल्या पिंजऱ्यात नर बिबट्या अडकला. गावाजवळील दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या जाधव वस्तीत आणि आसपासच्या वाड्यांवर बिबट्याने काही पाळीव प्राण्यांवर हल्ले करत त्यांना ठार केले होते, ज्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. अखेर आता हा एक बिबट्या जेरबंद झाला आहे. मागील काही दिवसांपासून शिरूर तालुक्याच्या पूर्व भागात बिबट्यांच्या हालचालींमध्ये वाढ झाली होती. याच दरम्यान निमोणे गावात मागील १४ दिवसांपूर्वी एका मादी बिबट्याला पिंजऱ्यात पकडण्यात आले होते. मात्र, रविवारी रात्री नर बिबट्या पकडल्यानंतरही परिसरात भीतीचे वातावरण कायम आहे. बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती वनपाल भानुदास शिंदे यांना देण्यात आली. पकडलेला नर बिबट्या सुमारे दोन ते तीन वर्षांचा असून, त्याला माणिकडोह येथील पुनर्वसन केंद्रात हलवले जाणार आहे. सोमवारी पहाटे चारच्या सुमारास हा नर बिबट्या पिंजऱ्यात अडकला. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन बिबट्याला ताब्यात घेतले.

## ट्रॅक्टर अंगावर घालून खून करणाऱ्या आरोपीला जन्मठेप

**खेड :** चुलत भाऊ असताना दुसऱ्याच्या ट्रॅक्टरने नांगरणी केली म्हणुन अंगावर ट्रॅक्टर घालुन खून करणाऱ्या आरोपीला राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्त न्यायालयाचे न्यायाधीश एस पी पोळ यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. जयनाथ सोपान मनसुख (वय ३८, रा. एकनाथवाडी, सावरगाव, ता. जुन्नर) असे जन्मठेप सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. नोव्हेंबर २०२० मध्ये घडलेल्या या घटनेत प्रकाश नामदेव मनसुख (वय ६०) यांचा मृत्यू झाला होता. आरोपी आणि मयत भावकितले आहेत. आरोपी जयनाथ याच्याकडे ट्रॅक्टर होता. त्या ट्रॅक्टरने तो मयत यांच्या जमिनीची पण नांगरणी करीत होता. किरकोळ कारणातून त्यांच्यात वाद झाल्यावर मयत प्रकाश यांनी गावातील दुसऱ्या व्यक्तीच्या ट्रॅक्टरने नांगरणी करून घेतली. त्याचा राग अनावर होऊन आरोपीने मयत प्रकाश यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालुन गंभीर जखमी केले. प्रकाश यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले होते.मात्र त्याच रात्री त्यांचा मृत्यु झाला. राजगुरुनगर न्यायालयात खटला सुरू होता. मयताच्या बाजूने सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही एन देशपांडे यांनी युक्तिवाद केला. त्याचा निकाल सोमवारी (दि. २०) देण्यात आला. आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. पोलिस निरिक्षक युवराज मोहिते डी ए देवरे, वाय एम पाटील यांनी घटनेचा तपास केला. पोलिस महेश भालेराव यांनी न्यायालयीन कामकाजात सहभाग घेतला.

# भीमाशंकर कारखाना @ ३१०० रुपये

## २८०० रुपये आता तर उर्वरित गाळप हंगाम संपल्यावर जमा होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** दत्तात्रयनगर ,पारगाव (ता. आंबेगाव) येथिल भीमाशंकर सहकारी साखर कारखाना चालु हंगामात गाळप केलेल्या उसाला एफआरपीनुसार प्रतिटन ३१०० रुपये दर देणार आहे. त्यापैकी २८०० रुपये आता देणार असून, उर्वरित ३०० रुपये गाळप हंगाम संपल्यानंतर एक महिन्याच्या आता ऊस उत्पादकांच्या खात्यावर जमा करणार असल्याची माहिती भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी दिली.

पारगाव (ता. आंबेगाव) येथे भीमाशंकर साखर कारखाना येथे सोमवारी (दि. २०) सायंकाळी आयोजित पत्रकार परिषदेत अध्यक्ष बेंडे यांनी माहिती दिली. यावेळी उपाध्यक्ष ॲड प्रदीप वळसे पाटील, संचालक बाबासाहेब खालकर, रामचंद्र ढोबळे, मच्छिंद्र गावडे, शांताराम हिंगे, पोपटराव थिटे, प्रिया बाणखेले, कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे आदी उपस्थित होते.



आंबेगाव पारगाव येथे पत्रकार परिषदेत बोलताना भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे व मान्यवर.

### भीमाशंकर कारखान्याला बदनाम करू नये

● भीमाशंकर कारखान्याचा ऊस तोडण्याबाबत कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही कोणीही शेतकऱ्यांची दिशाभूल करू नये. आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली भीमाशंकर कारखाना देशात एक नंबरचा कारखाना सुरु -आहे. कोणीही स्वतःच्या प्रसिद्धीसाठी कारखान्याला बदनाम करू नये. कारखान्याची ऊस तोड नियमानुसार सुरु असून १० जूनपर्यंतच्या नोंदी असलेल्या २६५, तसेच ३० जूनपर्यंत नोंदी असलेल्या ८६०३२ या सर्व उसाची तोड २८ जानेवारीपर्यंत पूर्ण करणार असल्याची ग्वाही बेंडे यांनी दिली.

अध्यक्ष बाळासाहेब बेंडे पुढे म्हणाले, भीमाशंकर कारखान्याने गाळप केलेल्या उसाला पहिली उचल शासनधोरणानुसार प्रतिटन २६३० रुपये दिली आहे. परंतू संचालक मंडळ तसेच ऊस उत्पादकांचा आग्रह होता की, पहिली उचल इतर कारखान्याप्रमाणे वाढवून २८०० रुपये द्यावी. त्यानुसार सोमवारी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय हा घेण्यात आला की, चालु गाळप हंगामात गाळप केलेल्या उसाला प्रतिटन एफआरपी दर ३१०० रुपये देणार असून, त्यापैकी २८०० रुपये लगेच देणार असून, उर्वरित ३०० रुपये गाळप हंगाम संपल्यानंतर एक महिन्याच्या आत शेतकऱ्यांना देणार आहोत. शेतकऱ्यांना तातडीने २८०० रुपये देण्याकरिता कारखान्याकडे निधी उपलब्ध नाही. त्यामुळे पुणे जिल्हा सहकारी बँकेकडून अल्प मुदतीचे कर्ज उपलब्ध होण्यासाठी कारखान्याचे संस्थापक आमदार दिलीप वळसे पाटील हे लवकरच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेणार आहेत. यापूर्वी प्रतिटन २६३० रुपये अदा केलेल्या ऊस उत्पादकांना लवकरच उर्वरित १७० रुपये वर्ग करणार आहे."

## कृषी प्रदर्शनाला अलोट गर्दी


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामतीच्या ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्राने आयोजित केलेल्या कृषिक या दहाव्या कृषी प्रदर्शनाचा सोमवारी अलोट गर्दीत समारोप झाला. पाच दिवसीय प्रदर्शनाला महाराष्ट्राच्या विविध भागांसह देशातील अन्य राज्यांतील शेतकऱ्यांनी भेटी देत शेतीचे नवे तंत्रज्ञान जाणून घेतले.

ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार, हिंदुस्थान फीड्सचे व्यवस्थापक अजय पिसाळ, कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ डॉ. रतन जाधव, युवा उद्योजक महेश गुळवे यांच्या हस्ते श्वान, दुग्ध उत्पादन, देशी गोवंश स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम, प्रशस्तिपत्र व चषक देत गौरविण्यात आले. स्पर्धेची बक्षिसे बारामती ॲग्रोकडून देण्यात आली.

पाच दिवसांत लाखो शेतकऱ्यांनी बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्रावरील या प्रदर्शनाला भेट दिली. हे दहावे कृषिक गर्दीचे सर्व रेकॉर्ड मोडणारे ठरले. केंद्राचे शास्त्रज्ञ, विषय विशेषज्ञ तसेच अन्य अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या कामी मोठी मेहनत घेतल्याचे सीईओ प्रो. नीलेश नलवडे यांनी सांगितले.

# शिरदाळेची तहान भागवणारा तलाव होतो आहे रिकामा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील शेवटचे टोक असणारे डोंगरावर वसलेले शिरदाळे गाव. गावच्या उत्तरेला असलेले तळे म्हणजेच शिरदाळे गावची ओळख. याच तळ्याच्या आधारे शेकडो वर्षे गाव या डोंगरावर वास्तव्यास आहे. परंतु काळ बदलला तसे गावात राहणाऱ्या लोकांची संख्या देखील घटत गेली. परंतु बाहेर गेलेल्या प्रत्येकाची नाळ ही गावाशी आजही तशीच जोडलेली असल्याचे पाहायला मिळते. हाच तलाव आज झपाट्याने आटत असताना दिसून येतो.

शिरदाळे गावचे वैशिष्ट्य म्हणजे हे असणारे गावतळे एक दोन अपवाद सोडले तर आज पर्यंत कधीच पूर्णपणे आटलेले नाही. शिवाय उन्हाळ्यात देखील कायम पाणी असल्याने आजूबाजूच्या परिसरातील जनावरे, शेळ्या, मेंढ्या, धनगर समाजाच्या मेंढ्यांचे कळप हे कायम याठिकाणी पाणी पिण्यासाठी येत असतात. शिवाय तळ्यात मासे असल्याने शेजारील ठाकर समाजाचे अनेक लोक मासे पकडण्यासाठी येत असतात. ग्रामस्थ देखील वर्षभर याच पाण्याच्या वापर आपल्या दैनंदिन जीवनात करत असतात. यंदा मात्र पाऊस कमी पडल्यामुळे पावसाळ्यात तळ्यात कमी प्रमाणात पाणी आले. त्यात जानेवारी महिन्यातच तळ्यात पन्नास टक्के पेक्षा कमी साठा असल्याने आणि अजून उन्हाळा तोंडावर असल्याने त्यात बाष्पीभवनाचा देखील परिणाम मोठ्या प्रमाणावर होत असतो. त्यामुळे यंदा पाणी शेवटपर्यंत पुरेल की नाही याची शाश्वती नाही.

या तळ्यातील पाणी फक्त घरगुती आणि जनावरे यांना वापरण्यासाठी असते. शेतीसाठी पाण्याची सुविधा नसल्याने दोन पिकांची शेती झाल्यावर गावचा शेतकरी हा उन्हाळभर मात्र मोकळा असतो. ग्रामीण संस्कृती असल्याने शेजारील गावच्या यात्रा, बैलगाडा शर्यती इतर विरंगुळे यात मग्न असतात. तर महिला वर्ग मजुरीने बागायती परिसरात उन्हाळभर दुसऱ्याच्या बांधावर राबत असतात. ही सवयच जणू सर्वांना अंगवळणी पडली आहे. हे असेच चालू राहिले तर भविष्यात डौलदार असणारं शिरदाळे गाव फक्त नकाशावर राहिले, तर नवल वाटायला नको. हे तळं मात्र कायम येणाऱ्या प्रत्येकाची तहान भागवण्याचे काम करत राहणार आहे.

## बाल विकास मंदिर शाळेचे क्रीडा स्पर्धेत यश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** अहिल्यानगर येथे १७ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत संपन्न झालेल्या म. ए. सो. क्रीडा करंडक स्पर्धेत बाल विकास मंदिर शाळेने सर्वसाधारण व्दितीय क्रमांकाचे विजेतेपद पटकावले. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी दरवर्षी प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करत असते. या वर्षी ह्या स्पर्धा संस्थेच्या अहिल्यानगर येथील शाळेत आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत संस्थेच्या महाराष्ट्रातील १८ शाळांमधील १३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. हे क्रीडा स्पर्धेचे तेरावे वर्ष होते.

या स्पर्धेत लंगडी, गोल खो खो, डॉजबॉल, सांघिक सूर्यनमस्कार असे विविध क्रीडा प्रकारांचा समावेश होता. येथील बाल विकास मंदिर शाळेतील ७२ विद्यार्थ्यांनी या क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला. यात, सूर्यनमस्कार मुले - प्रथम क्रमांक, डॉजबॉल मुली - प्रथम क्रमांक, गोल खो खो मुले - व्दितीय क्रमांक, सूर्यनमस्कार मुली - व्दितीय क्रमांक, लंगडी मुले - व्दितीय क्रमांक, गोल खो खो मुली - तृतीय क्रमांक, लंगडी मुली - तृतीय क्रमांक, डॉजबॉल मुले - तृतीय क्रमांक मिळवून विजयी झाले. तसेच, इरा जगताप गोल खो खो अष्टपैलू खेळाडू, आर्या निकुडे लंगडी उत्कृष्ठ खेळाडू, स्वरांगी फडतरे डॉजबॉल उत्कृष्ठ आक्रमक, पवार लंगडी उत्कृष्ठ खेळाडू या विद्यार्थ्यांना वैयक्तिक बक्षीस देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे, माणिक शेंडकर, नरेंद्र महाजन, दिपक कांदळकर, नितीन ठोंबरे , मीना खोमणे, अश्विनी कदम, शीतल चौधरी, स्वाती बोरावके, राणी गिरमे, सुरेखा जगताप, माधुरी जगताप यांनी मार्गदर्शन केले.

## रायवळ आंब्याची झाडे मोहराने बहरली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** यंदा रायवळ आंब्याच्या झाडांना तुलनेने अधिक मोहर आला आहे. आंबेगाव तालुक्याच्यापूर्व भागात रायवळ आंब्यांची झाडे मोहराने बहरली आहेत.यंदा रायवळ आंब्याची चव चाखायला मिळणार आहे. आता ढगाळ हवामानाचे सावट देखील दूर झाल्याने आंब्यांना अनुकूल हवामान मिळू लागल्याने आंबा उत्पादकांची चिंता मिटली आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गावांमध्ये अनेक वर्षांपूर्वीची आंब्याची झाडे आहेत. खोबऱ्या, शेंदऱ्या, नारळ्या, केशऱ्या अशी विशिष्ट नावे या आंब्यांना असतात. यंदा या आंब्यांच्या झाडांना तुलनेने अधिक मोहर आल्याचे दिसत आहे. रायवळ आंब्याच्या झाडाच्या कैऱ्यांचा उपयोग घरगुती लोणचे तयार करण्यासाठी होतो. अनेक शेतकरी या कैऱ्यांची गावो गावच्या आठवडे बाजारात जाऊन विक्री करतात. त्यातून त्यांना चांगले अर्थार्जन होते. त्यानंतर आंबे पिकवून ते बाजारांमध्ये विक्रीसाठी पाठवले जातात.

आता ग्रामीण भागात देखिल कोकण, मुंबई, पुणे या बाजारपेठांमधून हापुस, पायरी, तोतापुरी, कलमी आंबे विक्रीसाठी दरवर्षी दाखल होतात. परंतु त्यांचे दर हे अधिक असतात. सर्वसामान्यांना ते परवडणारे नसतात. काही खवय्ये हे रायवळ आंब्यांनाच पसंती देतात. ते बाजारपेठांमध्ये रायवळ आंब्यांच्या प्रतिक्षेत असतात. यंदा मात्र रायवळ आंब्यांना मोहर अधिक आल्याने खवय्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसत आहे.

### मोहर...

छायाचित्र: रोहीत खुडे



रांजणी

थोरांदळे (ता. आंबेगाव) परिसरात अनेक रायवळ आंब्यांना मोहर अधिक आला आहे.

## विद्युत रोहीत्रांच्या तांब्याच्या पट्ट्यांची चोरी

**शिक्रापूर:** करंजावणे (ता. शिरुर) येथील तळ्याजवळील संदीप जगदाळे व सुभाष कोळपे यांच्या शेतातील दोन ठिकाणचा विद्युत प्रवाह खंडित झाल्याने माहिती विद्युत वितरणच्या कर्मचाऱ्यांनी तेथे जात पाहणी केली असता, तळ्याच्या कडेला असलेले दोन विद्युत रोहित्र चोरट्यांनी फोडून त्यातील तांब्याच्या पट्ट्या चोरून नेल्याचे समोर आले. याबाबत विद्युत वितरण विभागाचे कर्मचारी लकीचंद मोरसिंग राठोड (२४, रा. रांजणगाव गणपती ता. शिरुर) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे.

### अवसरी बुद्रूक येथील आदेश शाह यांनी जोपासला छंद!

# निसर्गाच्या भटकंतीतून साकारली अप्रतिम कलाकृती

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** माध्यम कोणतंही असो सृष्टी व द्रुष्टी एकत्र आल्या कि कलाकाराच्या कल्पक नजरेतून वेगळं काहीतरी घडतं. अवसरी बुद्रुक (ता. आंबेगाव ) येथील आदेश विनोदचंद्र शहा या तरुणाने साकारलेली निसर्गातील झाडे झुडपे यांच्या फांद्या, खोडे व मुळ्या यापासून विविध आकारातील नैसर्गिक काष्ठशिल्प पाहताना असाच अव्दितीय अनुभव येतो.

आदेश शहा यांचा किराणा दुकाण हा पिढीजात व्यवसाय सांभाळत मित्रांच्या बरोबर विविध किल्ल्यांना भेटी देणे. उंच गड, दुर्ग सर करणे डोंगर, दऱ्यात, जंगलात भटकंती करणे, हा त्यांनी छंद जोपासला आहे. यावेळी त्यांचा कल्पक नजरेतून झाडाच्या विशिष्ट आकारातील फांद्या, खोडे, मुळ्या दिसल्या कि त्या घरी आणून वाळवणे, त्याची साल काढणे त्यात आदेश शहा यांना निरनिराळ्या पशु पक्ष्यांचे आकार दिसू लागले व त्यातून त्यांनी कलाकृती निर्माण करायला सुरुवात केली. यासाठी फारशा अवजारांची आवश्यकता भासली नाही. कारण मूळ आकारातच त्यांना चित्र दिसत होते. थोडे फेरफार करून टीकवुड पॉलिशने पेंट केले. शहा यांच्या घरात त्यांनी तयार केलेल्या अनेक प्राणी, पक्ष्याच्या हुबेहूब लाकडी कलाकृती तिथे दिसत आहे.

सृष्टी आणि द्रुष्टी एकत्र आली तर अशी कलाकृती घडून येते असे आदेश शहा सांगत आहेत. गरूड, मुंगुस, घोडे यांच्या बरोबरच काही संकल्पना मांडणारी शिल्पेही होती. एका बाजुने गणपती तर दुसऱ्या बाजूने नटराज, हसत खेळत पावले टाकणारा मुलगा, चिंतन करणारा मुलगा, खेळणारा मुलगा, बाहुली, बगळा, ऋषीमुनी, साप ही सर्व शिल्पे अखंड लाकडाची होती. काही शिल्पे संदेश देणारीही होती. तसंच एका मोठ्या खोडावर दोन स्त्रियांची शिल्पे होती. त्यांची केशभूषा व वेशभूषा पारंपरिक दिसत होती. हे सर्व लाकडाचंच बरं का! हे सर्व बनविण्यासाठी साग, आंबा, फणस, खैर, चिंच, लिंब, शिसम, बाभुळ, करंज अशा झाडांची खोडे किंवा फांद्या वापरण्यात आल्या. एका झाडाला तर गाठ आली होती. त्यातून गरूड, कुत्रा साकारला. मुंग्यांनी पोखरलेलं झाड सुद्धा उपयोगात आणलेलं. आदेश शहा यांनी सुमारे २५ वर्षांपासून हा छंद जोपासला आहे. त्यांनी बनवलेल्या सुमारे २०० काष्ठशिल्पांचे संग्रालय म्हणजे वेगळी अनुभूती आहे.



लोणी-धामणी: अवसरी बुद्रुक (ता. आंबेगाव ) येथील आदेश विनोदचंद्र शहा या तरुणाने निसर्गातील झाडे झुडपे यांच्या फांद्या, खोडे व मुळ्या यापासून विविध आकारातील बनवलेली नैसर्गिक काष्ठशिल्पांचा खजिना.

#रा



# आस वळीवाची...

असे बरसते ऊन
तृणही न राहिले एक
भेगाळल्या या धरेचे
क्लांत नि:श्वास ऐक
रे घना आता
विलंब नको पळाचा
नभी दाटून कुंभ
वर्षाव हो वळीवाचा

## कॅलिडोस्कोप

# टेस्लाची कार बदलली बैलगाडीत!

एका व्यक्तीने चक्क ४० लाख रुपये किमतीची टेस्ला कंपनीची कार बैलगाडीमध्ये बदलली आहे. 'टेस्ला'ची कार जगभरामध्ये चर्चेत आहे. या कारला तिच्या फीचर्समुळे जगभर पसंती दिली जाते, तसेच या गाडीला खूप मागणी आहे; पण आता चीनमधील एक व्यक्ती याच टेस्ला कारवर इतकी नाराज झाली, की त्याने टेस्लाच्या कारचे बैलगाडीत रूपांतर केले.

चीनमधील एका व्यक्तीने सेकंड हँड टेस्ला मॉडेल ३ विकत घेतले. तिची किंमत १०१,००० युआन (११ लाख रुपये) आहे; परंतु ती खरेदी केल्यानंतर त्याला समजले की, ते चार्ज करणे शक्य नाही. त्याच्या या तक्रारीवर कोणताही तोडगा न निघाल्याने त्याने संतप्त होऊन बैलासह गाडी



ओढून निषेध केला. चीनमधील टेस्लाच्या अधिकृत वेबसाइटनुसार, चीनमध्ये या मॉडेलची सध्याची किंमत ३३५,९०० युआन (सुमारे ४० लाख रुपये) पासून सुरू होते. कार घेतल्यानंतर, जेव्हा ती व्यक्ती गाडी चालवत होती, तेव्हा त्याला समजले की, कारमध्ये काही समस्या आहे. त्यामुळे ती चार्ज होऊ शकली नाही. गुआजी नावाच्या कंपनीच्या मदतीने या व्यक्तीने कार खरेदी केली होती. गुआजीने २३ ऑक्टोबर रोजी एक अधिकृत निवेदन जारी केले की कार विकणारा एक कार डीलर होता आणि त्याने सुमारे ३० वेळा हीच कार विक्री आणि खरेदी केली होती.

# हनीट्रॅपच्या माध्यमातून एड्स्!

आजकाल हनी ट्रॅपच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. त्याच्या जाळ्यात अनेक तरुण-तरुणी अडकले. नुकतीच उत्तराखंडमधून एक धक्कादायक बातमी समोर आली. ड्रग्जच्या आहारी गेलेल्या प्रियकरासह एकूण २० जण एचआयव्ही पॉझिटिव्ह झाले. हा प्रकार उघड झाल्याने खळबळ उडाली आहे.



उत्तराखंडमधील नैनिताल जिल्ह्यातील रामनगर भागात ही घटना उघडकीस आली. अवघ्या पाच महिन्यांमध्ये १९ जणांना एचआयव्हीची लागण झाल्याचे आढळून आले. मिळालेल्या माहितीनुसार, गुलरघाटी परिसरातील १७ वर्षीय तरुणीला अंमली पदार्थांचे व्यसन होते. ती ड्रग्ससाठी हतबल व्हायची तेव्हा ती मुलांना बोलावायची. तिच्या संपर्कामुळे अनेक मुलांना एचआयव्हीची लागण झाली. यामध्ये १५ महिलांचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे.

नैनिताल जिल्ह्यामध्ये एचआयव्ही पॉझिटिव्ह प्रकरणे वाढत आहेत आणि रामनगर सर्वात वाईट आहे. रामनगरमध्ये १७ महिन्यांत ४५ लोक एचआयव्ही पॉझिटिव्ह आढळले. एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत १९ जणांना एचआयव्हीची लागण झाली आहे. यामध्ये ३० पुरुष आणि १५ महिलांचा समावेश आहे. ३० पुरुषांपैकी २० तरुणांना सिडिक पदार्थ सेवन केलेल्या आईच्या संपर्कात आल्याने संसर्ग झाला होता. मिळालेल्या माहितीनुसार, रामनगर येथे राहणारी अल्पवयीन मुलगी सिड्युक्त पदार्थ प्राशन करून शहरातील कोणत्याही गल्लीबोळात बिनधास्तपणे फिरताना दिसत आहे. ड्रग्जसाठी पैसे गोळा करण्यासाठी तिने लोकांना आमिष दाखवून शरीरसंबंध करायला लावले.

# डेटवर जाणे पडले महागात!

गाझियाबादमधील एक तरुण डेटवर गेल्यावर फसवणुकीचा बळी ठरला आहे. एका व्यक्तीने सांगितले, की तो डेटला जाणार होता. मेसेजमध्ये त्याला कौशांबी या मेट्रो स्टेशनवर भेटायला बोलावले. मात्र तिथे त्याच्यासोबत असे काही घडले, ज्यामुळे त्याचा जीव धोक्यात आला. स्टेशनवरून त्या व्यक्तीला कौशांबी हॉटेलच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या टायगर कॅफेमध्ये नेण्यात आले. कॅफेमध्ये पोहोचल्यावर, त्या



कनेक्टिव्हिटी होती ना कोणताही साइनबोर्ड. परिस्थिती गडबड असल्याचे लक्षात येताच त्याने ताबडतोब त्याचे लाईव्ह लोकेशन आपल्या मित्रासोबत शेअर केले आणि मेसेजद्वारे संपूर्ण परिस्थिती सांगितली. नंतर कॅफेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्यासमोर १६,४०० रुपयांचे बिल ठेवले. जे मुलीने ऑर्डर केलेल्या कोल्ड्रिंकचे बिल होते. त्यासाठी त्याने नकार दिल्याने कर्मचाऱ्यांनी त्याला बाहेर जाण्यापासून रोखले आणि जबरदस्तीने ५० हजार रुपयांची मागणी केली. चांगली गोष्ट म्हणजे त्याने सर्व परिस्थिती आपल्या मित्राला सांगितली होती. त्यामुळे त्याच्या मित्राने पोलिसांशी संपर्क साधला आणि लगेच कारवाई करण्यात आली. या कारवाईत डेटिंग घोटाळ्यात सहभागी असलेल्या एका गटाचा पर्दाफाश करण्यात आला. त्यांनी वेगवेगळ्या डेटिंग अ‍ॅप्सवर प्रोफाइल तयार केले होते. ती अज्ञात पुरुषांना टायगर कॅफेमध्ये घेऊन जायची, जिथे त्यांच्याकडून खाण्यापिण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसे आकारले जात होते. यानंतर संपूर्ण रक्कम भरेपर्यंत लोकांना ओलीस ठेवण्यात येत होते.

# इथे आहेत मृतदेह आणि ममी

एखाद्या संग्रहालयात गेल्यावर ममी आणि मृतदेहांचं प्रदर्शन बघायला मिळालं तर? इटलीतल्या सिलसिली या बेटावरच्या पालेर्मो कॅपुचिन संग्रहालयात ममी आणि मृतदेहांचा संग्रह करण्यात आला आहे. त्यामुळे या संग्रहालयात जरा जपूनच पाऊल ठेवायला हवं. इथे आठ हजार मृतदेह आणि १२५२ ममी आहेत. सोळाव्या शतकात



ख्रिस्ती भिक्षूकांनी या परिसरात मृतदेह पुरण्याचं तसंच ममी तयार करण्याचं काम सुरू केलं होतं. आज जिथे संग्रहालय आहे. त्याचं रूपांतर संग्रहालयात करण्यात आलं. या मृतदेहांना ममीच्या माध्यमातून सुरक्षित ठेवण्यात आलं. १९२० पासून या भागात मृतदेह पुरण्याचं काम बंद करण्यात आलं आणि संग्रहालयाच्या निर्मितीला वेग आला. या विचित्र संग्रहालयाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी ख्रिस्ती भिक्षुकांकडेच आहे. यातल्या काही ममी पूर्ण अवस्थेत आहेत तर काहींची अवस्था बिकट झाली आहे. इजिप्तमधल्या ममी खूप प्रसिद्ध आहेत. मात्र ममी हा शब्द अरबी भाषेतल्या मुमियापासून तयार झाला आहे. मुमिया म्हणजे मेणाच्या लेपात सुरक्षित ठेवण्यात आलेल्या चीजवस्तू. ममी तयार करण्यासाठी ७० दिवसांचा कालावधी लागतो. अशा या वस्तूसंग्रहालयात पर्यटकांना थरारक अनुभव घेता येईल हे नक्की.



# पेट्रोल टँकरचा गाईंच्या तस्करीसाठी वापर

गाय तस्करांनी गाईंची तस्करी करण्यासाठी पेट्रोल टँकरचा वापर केला आणि त्यात गायी नेण्यास सुरुवात केली. ही माहिती मिळताच बुलडोझरने कंटेनर फोडला असता लोकांना धक्का बसला. पेट्रोलच्या टँकरमधून गायींची वाहतूक केली जात होती. या ट्रकच्या मागील बाजूस एक पेट्रोल कंटेनर जोडला आहे. तो पाहिल्यानंतर कोणालाही वाटेल, की या ट्रकमधून पेट्रोल किंवा डिझेलचा पुरवठा होत आहे; पण याठिकाणी गाय तस्करांनी गाईंची बेकायदेशीर वाहतूक करण्यासाठी पेट्रोल कंटेनरमध्ये त्यांना भरले. बुलडोझरच्या सहाय्याने कंटेनर फोडण्यात आले. आतील गायी पाहून लोक हैराण झाले. बुलडोझरच्या सहाय्याने कंटेनर तोडून गायींची सुटका करण्यात आली. बुलडोझरने कंटेनर फोडताच त्यामध्ये गायींचा कळप होता. त्यांना जबरदस्तीने बांधून घेऊन जात होते. डब्यात ज्या पद्धतीने गायी लपवून ठेवण्यात आल्या आहेत, त्यानुसार हे गोवंश तस्करीचे प्रकरण असून त्याबद्दल लोकांमध्ये तीव्र नाराजी आहे. पोलिसांनी आरोपींची नावे उघड करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# बिनची कमाल

चीनमधला एक धावपटू बेई बिन याने अनोखा विक्रम केला. त्याने उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंतचं २४,११० किलोमीटरचं अंतर धावून पूर्ण केलं. म्हणजे तो अंटार्टिका खंडातून आर्टिक खंडात पोहोचला. हे अंतर त्याने ४३३ दिवसांमध्ये पूर्ण केलं. बेई प्रत्येक दिवशी सरासरी ५६ किलोमीटर अंतर धावला. २४,११० किलोमीटर अंतर म्हणजे ४२ किलोमीटरच्या ५७४ मॅरेथॉन स्पर्धांमध्ये धावणं! या काळात बेई बिन १३ देशांमधल्या ६५ शहरांमधून धावला. यात अमेरिका, कॅनडा, चिली, मेक्सिको, ग्वाटेमाला, कोस्टरिका, अर्जेंटिना, पेरूसारख्या देशांचा समावेश आहे. या धावपटूने मार्च २०१८ मध्ये या प्रवासाला सुरूवात केली. या दरम्यान त्याला निसर्गाच्या आव्हानाला सामोरं जावं लागलं. काही ठिकाणी तापमान उणे दहा अंशांपर्यंत तर काही ठिकाणी ४० ते ४५ अंश सेल्सियस होतं. मात्र प्रतिकूल परिस्थितीतही त्याने हार मानली नाही. एवढा लांबचा पल्ला गाठण्याची तयारी त्याने तीन वर्षांपूर्वीपासूनच सुरू केली. २०११ मध्ये त्याने दहा हजार किलोमीटरचं अंतर पार केलं होतं. त्यामुळे दोन ध्रुवांमधलं अंतरही यशस्वीपणे पार करण्याचा विश्वास त्याला होता. या धावेच्या तयारीसाठी बिनने दररोज ६० ते ७० किलोमीटर धावायचं ठरवलं. दोन ध्रुवांमधलं हे अंतर पार करण्यासाठी बिन पहाटे पाच वाजता धावायला सुरूवात करायचा. थोडी फार विश्रांती घेत तो रात्री ९ वाजेपर्यंत धावायचा. बिनने याआधीही धावण्याचा विक्रम केला आहे. २०११ मध्ये त्याने १५० दिवसांमध्ये दहा हजार किलोमीटरचं अंतर पार केलं होतं. अशा या विक्रमवीर बिनचं कौतुक करावं तेवढं कमी आहे.



# चुकीची पोस्ट केली तर...

सोशल मीडियावर बरीच आक्षेपार्ह विधानं केली जातात. समाजात फूट पाडणाऱ्या पोस्ट्स केल्या जातात. त्यावर अंकुश लावण्यासाठी बरेच प्रयत्न होतात. मात्र ऑस्ट्रिया सरकारने या प्रकरणी दोषी आढळणाऱ्यांना वेगळीच शिक्षा देण्याचं ठरवलं आहे. दोषी लोकांना न्यू आर्ट या एनजीओतर्फे सुरु करण्यात आलेला सहा महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे. २०१८ मध्ये ७३ लोकांनी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. 'डायलॉग इन्स्टेड ऑफ हेट' या नावाचा हा अभ्यासक्रम आहे. पुढच्या दोन महिन्यांमध्ये हा अभ्यासक्रम संपूर्ण देशभरात सक्तीचा करण्यात येणार आहे. चुकीच्या पोस्ट्स प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांविरोधात कोर्टात खटले चालवण्याऐवजी हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा मार्ग अवलंबण्यात आला आहे. ऑस्ट्रियातल्या राजकीय पक्षाच्या एका नेत्यालाही या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा लागला. या नेत्याने देशातल्या शरणार्थींविरोधात चुकीचं विधान केलं होतं. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर लोकांचे विचार बदलतील आणि ते विवेकी मार्गाने वाटचाल करतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# सबकुछ महिला!

महिलांनी सर्वच क्षेत्रात बाजी मारली असली तरी ठराविक कामांमध्ये पुरुषांची मक्तेदारी पहायला मिळते. बांधकाम व्यवसायात आजही महिलांचं प्रमाण खूप कमी आहे. त्यातही महिला रंगकाम, सुतारकाम, गवंडीकाम करत नाहीत. मात्र केरळमधल्या महिलांनी या क्षेत्रातही मुसंडी मारली आहे. काही महिलांनी एकत्र येऊन ऑल वूमन कंस्ट्रक्शन कंपनी स्थापन केली असून या कंपनीतली प्रत्येक जबाबदारी महिलांच्या खांद्यांवर आहे. ३० महिलांनी एकत्र येऊन पिंक लॅडर नावाची कंपनी सुरू केली. पिंक लॅडरला काँट्रॅक्ट दिलं की सर्व महिला कामाला लागतात. बांधकामाच्या साईटवर सर्व महिला काम करताना दिसतात. १ नोव्हेंबर २०१८ या



दिवशी पिंक लॅडरची सुरूवात झाली. आत्तापर्यंत त्यांनी दोन घरांचं बांधकाम केलं आहे. इतर तीन घरांचं कामही पिंक लॅडरला मिळालं असून त्यांचं काम सुरु आहे. पिंक लॅडर ही कंपनी सरकारी योजनेतून सुरु झाली आहे. महिलांना मिळणाऱ्या मानधनाबाबत बराच भेदभाव केला जातो. कामाच्या ठिकाणी महिलांबाबत होणार भेदभाव बघून या महिलांनी कंबर कसली आणि ही बांधकामक्षेत्रातली कंपनी सुरु केली. १०० टक्के साक्षरता असणाऱ्या केरळमधल्या एका मॉलमध्येही सर्व महिला कर्मचारी आहेत. या मॉलमध्ये १०० दुकानं आहेत. या सर्व दुकानांची मालकी महिलांकडे आहे. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने केरळने टाकलेलं हे एक पाऊलच म्हणावं लागेल.



# हे आहेत नवे विद्यार्थी

महाराष्ट्रात मराठी शाळा बंद पडत आहेत. प्रादेशिक भाषेतल्या शाळांचीही हीच अवस्था आहे. शाळा वाचवण्यासाठी, विद्यार्थीसंख्या वाढवण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. फ्रान्समध्येही एक शाळा वाचवण्यासाठी भन्नाट उपाय करण्यात आला. या देशातल्या क्रेत्स ऑन बेलडॉन नावाच्या शहरातली ही एक प्राथमिक शाळा आहे. शाळेत फक्त २६१ विद्यार्थी शिक्षण घेत असून इथले काही कक्ष बंद होण्याच्या मार्गावर आहेत. काही पालकांनी शाळेतल्या मुलांच्या घटत्या संख्येबद्दल तक्रारही केली होती. त्यानंतर विद्यार्थीभरतीची मोहीम हाती घेण्यात आली. आता हे नवे विद्यार्थी कोण आहेत, हे जाणून घेतल्यावर तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसेल. या शाळेत मेंढ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. १५ मेंढ्या या शाळेतल्या वर्गांमध्ये बसणार आहेत. या शहराची लोकसंख्या फक्त चार हजार असल्यामुळे शाळेतल्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. शाळेतल्या प्रवेशासाठी स्थानिक मेंढपाळाने मेंढ्या पुरवल्या आहेत. या मेंढ्यांचा जन्मदाखलाही शाळेत सादर करण्यात आला. या मेंढ्यांच्या शाळेतल्या प्रवेशासाठी एक पालक गेल लावेल यांनी पुढाकार घेतला होता. या शाळेत ११ इयत्ता आहेत. इयत्तांची संख्या १० करण्याला त्यांचा विरोध होता. यामुळे प्रत्येक वर्गात २४ ते २६ मुलं बसतील. मुलांची संख्या वाढली की त्यांच्याकडे लक्ष देता येणार नाही, असा आक्षेप गेल यांनी घेतला होता.

## इंद्रायणी महाविद्यालयाची विद्यार्थिनी विश्वविजेत्या खो-खो टीमची कर्णधार प्रियंका इंगळेचे सर्वत्र कौतुक

## प्रियंका इंगळेच्या नेतृत्वात भारताने जिंकला खो खो विश्वचषक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे, :** इंद्रायणी विद्यामंदिर संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. संस्थेची माजी विद्यार्थिनी व भारतीय खो - खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळे हिच्या नेतृत्वात भारतीय खो खो संघाने विश्वचषकावर आपले नाव कोरले. या सामन्यात प्रियंकाच्या नेतृत्वात भारतीय महिला खो-खो संघाने नेपाळ संघाचा 38 गुणांच्या फरकाने पराभव केला. तिच्या नेतृत्वातील भारतीय खो खो संघाच्या यशाबद्दल इंद्रायणी विद्यामंदिर संस्थेचे आधारस्तंभ मावळभूषण माजी आमदार कृष्णराव भेगडे, इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेचे अध्यक्ष रामदास आप्पा काकडे, कार्यवाह चंद्रकांत शेटे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. संभाजी मलघे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक यांनी कर्णधार प्रियंका इंगळे, तसेच महिला खो-खो टीमचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.



प्रियंकाच्या या कामगिरीच्या माध्यमातून इंद्रायणी महाविद्यालयाची पर्यायाने मावळ तालुक्याची मान उंचावली आहे. इंद्रायणी महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी क्रीडा प्रकारात नेहमीच पोषक वातावरण निर्माण करीत आले आहे.
- रामदास काकडे

# खो-खो च्या प्रचार -प्रसारासाठी आर्थिक सहकार्य करावे लागले तरी आम्ही मागे हटणार नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे:** खो-खो खेळच मुळात वेगवान आहे. त्यामुळे त्याचा प्रचार आणि प्रसार वेगवान करण्याचा माझा मानस आहे. विश्वचषकानंतर तो राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक तालुक्यात आणि प्रत्येक गावात खेळला जावा, यासाठी मी राज्य खो-खो संघटनेच्या साथीने पुढाकार घेईन. जे आजवर घडलं नव्हतं, ते भविष्यात खो-खोसाठी केलं जावं म्हणून प्रयत्न करीन. आम्ही जे काही आहोत. ते फक्त आणि फक्त खो-खोमुळेच आहोत. खो- खोच्या जगज्जेतेपदामुळे आमच्यावर पुरस्कारांचा वर्षाव होईल. त्यामुळे आम्हीही खो- खोला काही देणं लागतो. त्यामुळे आम्हाला खेळाच्या प्रचार-प्रसारासाठी आर्थिक सहकार्य करावे लागले तरी आम्ही मागे हटणार नसल्याची भावना भारतीय खो खो टीम चा कप्तान पुण्याचा प्रतीक वाईकर यांने बोलताना व्यक्त केली.

आपला महाराष्ट्राचा खो-खो देशाच्या कानाकोपऱ्यात खेळला जावा, जगभरात खो-खोची चपळता पोहोचावी यासाठी आजवर अनेक खो-खो संघटकांनी, खो खोपटूंनी आपल्या जिवाचे रान केलेय, अथक परिश्रम केलेत. त्यांनी घेतलेल्या मेहनतीचेच आज चीज झालेय. आम्ही जे पहिलेवहिले जगज्जेतेपद जिंकून खो-खोवर हिंदुस्थानचीच सत्ता असल्याचे दाखवून दिलेय, ते त्यांच्याच परिश्रमाचे फळ आहे. त्यांनी पाहिलेले स्वप्न आमच्याकरवी साकार झालंय. त्यामुळे खो-खोचे हे जगज्जेतेपद खो-खोच्या त्याच दिग्गजांना अर्पण, अशी कृतज्ञता व्यक्त केलीय भारतीय खो-खो संघाचा कर्णधार प्रतीक वाईकरने.

गेल्या पाच-सहा वर्षांत खो-खो संघटकांनी खेळाला आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून देण्यासाठी घेतलेली मेहनत सर्वांनी विश्वचषकात पाहिलीय. विश्वचषक कसा होईल? संघ कसे खेळतील? याबाबत सर्वांच्याच मनात कुतुहल होते, पण नवख्या संघांनीही आपल्याला खो-खो खेळता येत असल्याचे दाखवल्यामुळे आता खो-खो थांबणार नाही. भले इथपर्यंतच्या प्रवासासाठी आम्हाला खूप काळ लागला, पण पुढचा प्रवास सुपरफास्ट असेल. आता खो- खोसाठी राष्ट्रकुल आणि ऑलिम्पिक दूर नाही. अवघं जग महाटमोळ्या खो- खोच्या प्रेमात पडणार, असे भाकित प्रतीक वाईकर याने आत्मविश्वासाने वर्तवले.

तो म्हणाला, खो-खोत भारत संघ बलवान आहे. हे कुणापासूनही लपलेले नव्हते. पहिल्या जगज्जेतेपदाची हिंदुस्थानलाच सर्वाधिक संधी होती आणि आम्ही त्या संधीचं सोनं केले, पण नेपाळ, बांगलादेश या आशियाई संघांसह दक्षिण आफ्रिकेने केलेला खेळ कौतुकास्पद आहे. खो- खो चपळ आणि बुद्धीचा खेळ असूनही आमच्या खेळाला योग्य मार्ग सापडत नव्हता. खरं सांगायचं तर आमच्या खेळाला सारेच मागासवर्गीय मानत होते. आमच्या खेळाला आणि खेळाडूंना क्रीडा जगतात अपेक्षित मान नव्हता. देश पातळीवर असो किंवा स्थानिक पातळीवर, कुणी फारशा स्पर्धाही घेत नव्हता. मात्र खो-खो विश्वचषकाच्या आयोजनानंतर खो-खोचे जग बदललेय. कारण आता खो-खो ने जग जिंकेल आहे.

## पीवायसी हिंदू जिमखाना, पूना क्लब, कॅडन्स संघांचा विजय



**पुणे :** पाथ-वे फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित व एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या पाचव्या दोशी इंजिनिअर्स करंडक आंतरक्लब वरिष्ठ निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत गट साखळी फेरीत पीवायसी हिंदू जिमखाना, पूना क्लब, कॅडन्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. वीरांगणा येथील क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत ब गटातील लढतीत अथर्व धर्माधिकारी(176धावा)याने केलेल्या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर कॅडन्स संघाने डेक्कन जिमखाना संघावर 213 धावांनी दणदणीत विजय मिळवला.

## हिंदू गर्जना चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा लोगोचे पुनीत बालन यांच्या हस्ते अनावरण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** हिंदू गर्जना प्रतिष्ठान युथ असोसिएशन व पुनीत बालन ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'हिंदू गर्जना चषक महिला व पुरुष राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा २०२५ चा आखाडा येत्या दि. ७ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत रंगणार आहे या कुस्ती स्पर्धेच्या लोगोचे अनावरण युवा उद्योजक पुनीत बालन यांच्या हस्ते करण्यात आले.

शिक्षण प्रसारक मंडळीच्या सहकार्याने आणि पुणे जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेच्या लोगोच्या अनावर प्रसंगी बोलताना पुनीत बालन म्हणाले की, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी नेहमीच पुनीत बालन ग्रुप पुढाकार घेतो. हिंदू गर्जना चषक या निमित्ताने मातीतल्या खेळाशी कुस्तीची अधिक जवळून जोडले जाता येईल याचा आनंद आहे. तसेच या स्पर्धेत आम्ही एकूण 42 लाखांची भरघोस बक्षीसे देणार असून प्रथम क्रमांकास थार भेट देण्यात येणार आहे.

भाजपचे शहराध्यक्ष व हिंदू गर्जना प्रतिष्ठानचे अध्यक्ष धीरज रामचंद्र घाटे म्हणाले, महाराष्ट्र केसरीच्या तोडीस तोड ही स्पर्धा आयोजित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या स्पर्धेसाठी खेळाडू, कलावंत, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ही स्पर्धा दि. ७, ८ व ९ फेब्रुवारी २०२५ रोजी एसपी कॉलेज महाविद्यालय टिळक रोड पुणे येथे भरवण्यात येणार आहे.



## सेंट व्हिन्सेंट्सच्या विजयात क्लाईड अँड्र्यू चमकला

### सेंट व्हिन्सेंट्स ज्युनियर हॉकी लीग; लोयोलासाठी स्कायलर मॅचविनर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सेंट व्हिन्सेंट्स ज्युनियर लीग 2024-25 हॉकी स्पर्धेच्या दुसऱ्या आठवड्यात सेंट व्हिन्सेंट्सच्या विजयात क्लाईड अँड्र्यू चमकला. स्कायलर सुसाईनाथन हा लोयोला एचएस 'ब' टीम साठी मॅचविनर ठरला.

सेंट व्हिन्सेंट्सच्या मैदानावर, शनिवारी क्लाइडने दोन सामन्यांत आठ गोल करताना स्पर्धेतील पहिली हॅट्ट्रिक नोंदवली. दरम्यान, स्कायलरने दोन सामन्यांत 11 गोल करत छाप पाडली. यजमान सेंट व्हिन्सेंट्स एचएस 'अ' (2 विजय) आणि 'ब' (1 विजय), लोयोला एचएस 'अ' (1 विजय) आणि 'ब' (2 विजय) आणि सेंट पॅट्रिक्स एचएस 'अ' ( 2 विजय) दिवस गाजवला.

कार्यवाहीवर वर्चस्व. सेंट पॅट्रिक्स 'ए' वगळता सर्व तिन्ही संघांनी दिवसातील सर्व सामन्यात विजय मिळवला. त्यांनी लोयोला 'अ' संघाचा 3-0 असा पराभव केला.

आठ सामन्यांमध्ये 48 गोलची नोंद झालेल्या दिवसाची सुरुवात सेंट व्हिन्सेंट्स 'अ' ने ऑर्नेलास एचएसचा 3-0 असा पराभव करून केली. त्यात क्लाईड अँड्र्यूने (2 गोल) मोलाचा वाटा उचलला. ॲरेन सिल्वाने एक गोल करत त्याला चांगली साथ दिली. त्यानंतर सेंट व्हिन्सेंट्स 'अ' संघाने प्रथमच खेळणाऱ्या दस्तूर को- एडचा11-0 असा धुव्वा उडविला. ज्यामध्ये क्लाईड अँड्र्यूने केलेल्या सहा गोलांचा समावेश आहे. शार्दुल कांबळेने 3, जोहन शेख आणि सार्थ सेठिया यांनी प्रत्येकी एक गोल करताना विजयाला हातभार लावला.

लोयोला 'ब'ने स्कायलर सुसाईनाथनच्या (6 गोल) सर्वोत्तम कामगिरीच्या जोरावर दस्तूर को- एडवर 11-0 अशा फरकाने मात केली. साईराज शिंदे आणि मार्क दासने प्रत्येकी 2 आणि राजवीर शिंदेने एक गोल करत त्याला चांगली साथ दिली.

लोयोला 'अ' ने स्कायलर सुसाईनाथन (५), राजवीर शिंदे (१) आणि साईराज शिंदेच्या (१) गोलमुळे ऑर्नेलास एचएसला ७-० असे हरवले.

अन्य लढतींमध्ये, आहिल पठाण (4), शौर्य मोझे आणि अमेय गरोडच्या ( प्रत्येकी १) गोलच्या जोरावर लोयोला 'अ' ने सेंट पॅट्रिक्स 'ब' वर 6-1 असा विजय मिळवला. सेंट पॅट्रिक्सकरून जोएल पाटेकरने गोल केला.

सेंट पॅट्रिक्स 'अ'ने सेंट व्हिन्सेंट्स 'ब'चा 4-1 असा पराभव केला. सेंट पॅट्रिक्सकडून शौर्य मेंगे (३) आणि ऑस्टिन फ्रान्सिसने (१ गोल) गोल केले. पराभूत संघाकडून अथर्व बोराटेने गोल केला.

सेंट व्हिन्सेंट्स 'ब' संघाने सेंट पॅट्रिक्स एचएसला 1-0 असे पराभूत केले. त्यात राजवीर सिंगचा गोल निर्णायक ठरला.

शौर्य मेंगे, अर्नान मलकापुलकर, प्रणव अहिर यांच्या प्रत्येकी एक गोलमुळे सेंट पॅट्रिक्स 'अ' संघाने लोयोला 'अ' संघाला ३-० असे हरवले.

या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून दलित पँथर ऑफ इंडियाचे संस्थापक, अध्यक्ष आणि युनायटेड नेशन्स फॉर फ्री तिबेटचे राजदूत बापू साहेब भोसले यांची उपस्थिती लाभली.

## द पूना क्लब गोल्फ लीग - २०२५ स्पर्धेत

# हिलयॉस ईगल्स तिसऱ्या दिवस अखेर अव्वल स्थानावर


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे:** बहुप्रतीक्षित अशा अत्यंत प्रतिष्ठेच्या द पूना क्लब गोल्फ लीग-२०२५ स्पर्धेत गतविजेत्या हिलयॉस ईगल्स संघाने गेल्या दोन दिवसातील उत्कृष्ट कामगिरी कायम राखताना 37.5गुणांची नोंद करुन ब गटासह आजच्या तिसऱ्या दिवसातील सर्वोत्तम कामगिरी नोंदवून आपले अव्वल स्थान कायम राखले.

येरवडा येथील पुना क्लबच्या गोल्फ कोर्सवर सुरू असलेल्या या स्पर्धेत हिलयॉस ईगल्स संघाने ब गटात सर्वोत्तम कामगिरी केली असून त्या खालोखाल शुबान सनरायजर्स संघाने 25 गुणांसह दुसरे स्थान कायम राखले. शिर्के बर्डीज बँडिट्स संघाने 13.5 गुणांसह ब गटात तिसरे , तर इव्हेन्ट डायनमिक्स पार-टी टायगर्स संघाने 13 गुणांसह चौथे स्थान मिळवले. सेहगल ॲक्रोपॉलिज स्टार्स संघाने 10 गुणांसह ब गटातील पाचवे स्थान कायम राखले.

केके रॉयल्स संघाने 35 गुणांसह अ गटात सर्वोत्तम कामगिरी केली. आजच्या दिवसात ही स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाची कामगिरी ठरली. तर, ऑटोमेक बेकर्स संघाने 28 गुणांसह अ गटात दुसरा क्रमांक राखला. जिंजर्स संघाने 18.5गुणांसह तिसरे, गेरा आऊटडोअर्स संघाने 17गुणांसह चौथे आणि एबी, जीजी अँड मनप्रीत जॅग्वार्स संघाने 15.5गुणांसह पाचवे स्थान पटकावले.



क गटात व्हॅस्कॉन द होली वन्स संघाने 29.5गुणांसह अव्वल स्थान व आजच्या दिवसातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वोत्तम कामगिरी केली. तर, मानव पारी पिन सीकर्स संघाने 25.5गुणांसह क गटात दुसरा क्रमांक पटकावला. गेरा आऊटडोअर्स संघाकडून खेळणारी अन्निका कानिटकर ही या स्पर्धेतील सर्वात लहान वयाची खेळाडू ठरला आहे.

## राष्ट्रीय सब ज्युनिअर ज्यूदो स्पर्धेत महाराष्ट्राची तीन कांस्यपदकांची कमाई !!

**पुणे :** पुनीत बालन गृप आणि इंस्पायर इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स यांचा सहकार्याने शिव छत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी पुणे येथे आयोजित राष्ट्रीय सब ज्युनिअर ज्यूदो स्पर्धेमध्ये आजच्या पहिल्या दिवशी महाराष्ट्राला तीन कांस्यपदकांची कमाई झाली आणि वैशिष्ट्य म्हणजे ही तिनही कांस्यपदके यवतमाळ जिल्ह्याच्या खेळाडूंनी पटकावली. राष्ट्रीय ज्यूदो स्पर्धा बाल क्रीडापटूनच्या नैपुण्याने गाजला. 30 किलो गटातील वेदांत पारधी 28 किलोमधील पौर्णिमा सातपुते आणि 36 किलो खालील गटात राजवी तळोकार या तीन खेळाडूंनी महाराष्ट्राचे नाव पदक तालिकेत कोरले.





30 किलोच्या गटातील वेदांतने एकूण पाच सामने खेळले परंतु हरियाणाच्या खेळाडू बरोबर ताकदीच्या अभावामुळे त्याला हार पत्करावी लागली रिप-चार्ज राऊंडमध्ये मणिपूरच्या कसलेल्या खेळाडूला पराजित करून कांस्यपदकावर वेदांतने आपला अधिकार कायम केला. 28 किलो खालील गटात खेळणाऱ्या पौर्णिमाने प. बंगालच्या खेळाडूला आक्रमकतेने डाव मारण्याचा प्रयत्न केला पण गणित चुकल्याने ती नेवाजा या प्रकारात अडकली आणि तिला हार पत्करावी लागली परंतु नंतर तिने उसळी मारून यूपीच्या खेळाडूला पराजित करून कांस्यपदक मिळवले.

वेदांत आणि पौर्णिमा हे यवतमाळला रवी भूषण कदम यांच्याकडे सराव करतात तर 36 किलो खालील गटात खेळणारी राजवी हिला जय खोडके यांचे मार्गदर्शन लाभले आहे. राजवीने मिझोराम, दिल्ली आणि हिमाचल प्रदेश या राज्यातील खेळाडूंना हरवत सुवर्णाकडे मार्गक्रमण करत असतानाच हरियाणा बरोबर तिचा अश्वमेध थांबला गेला आणि त्यामुळे तिला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

उद्या सायंकाळी या स्पर्धांचा समारोप आणि बक्षीस वितरण समारंभ आयोजित होईल. दरम्यान स्पर्धेतील विजेता, उपविजेता संघ यासह या सर्वोत्तम महिला खेळाडूसाठी "स्वर्गीय आमदार सौ मुक्ता टिळक स्मृतीप्रित्यर्थ" ठेवण्यात आलेले विशेष चषके प्रदान करण्यात येतील.

## संतोष दळवी, शांडिल्य बॅनर्जी, दिपक पाटील, केतन जठार यांची मानांकित खेळाडूंवर मात !!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** सोलारीस क्लब , ग्लोबल वरिष्ठ टेनिस संघटना (जीएसटीए) आणि रविंद्र पांड्ये टेनिस ॲकॅडमी (आरपीटीए) यांच्या संयुक्त विद्यमाने तर्फे आयोजित अकराव्या 'सोलारीस करंडक' वरिष्ठ पुरूष राष्ट्रीय टेनिस २०२५ स्पर्धेत पुण्याच्या संतोष दळवी, शांडिल्य बॅनर्जी, दिपक पाटील, केतन जठार या खेळाडूंनी मानांकित खेळाडूंचा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदविला.

मयुर कॉलनी येथील सोलारीस लब आणि डेक्कन जिमखाना क्लब येथे सुरू असलेल्या स्पर्धेत ३५ वर्षावरील गटामध्ये आठव्या मानांकित संतोष दळवी याने पाचव्या मानांकित चैतन्य सरळकर याचा ६-१, ६-१ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. बिगर मानांकित शांडिल्य बॅनर्जी याने रविंद्र पांड्ये याचा ६-३, ३-० असा पराभव केला. दुसरा सेट सुरू असताना रविंद्र याच्या पाठ आणि मान दुखू लागल्याने त्याने सामना सोडून देण्याचा निर्णय घेतला. या गटातील अग्रमानांकित संदीप पवार याने अतुल कलामपुरकर याचा ६-२, ६-२ असा सहज पराभव केला.



## ऑलिम्पिक वीर खाशाबा जाधव यांचे भव्य स्मारक शिवछत्रपती क्रीडा नगरी येथे उभारण्याची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र स्पोर्टस फॅार ऑलिम्पिकच्या वतीने ऑलिम्पिक वीर खाशाबा जाधव यांना वंदन करुन महाराष्ट्र क्रीडा दिन साजरा करण्यात आला. ऑलिम्पिक वीर खाशाबा जाधव यांचे भव्य स्मारक मरिन ड्राईव्ह मुंबई तसेच शिवछत्रपती क्रीडा नगरी येथे उभारावे अशी मागणी महाराष्ट्र स्पोर्टस फॅार ऑलिम्पिकचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड यांनी महाराष्ट्र शासनाला केली.

यावेळी संस्थेचे सचिव राजेंद्र घुले, खजिनदार शिवाजी साळुंखे, शिवाजी गोरे, प्रवीण बोरसे, क्रीडा मार्गदर्शक महाराष्ट्र शासन, योगेश दांगट, कैलास भोसले, जितेंद्र साळुंखे, प्रकाश साळुंखे, प्रविण गोगावले, कैलास तुकाराम भिसे, परमेश्वर गोसावी तसेच विविध क्रीडा संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अमित गायकवाड म्हणाले, १९५२ हेलसिंकी ऑलिम्पिक मध्ये महाराष्ट्राचे सुपुत्र ऑलिम्पिक वीर कुस्तीपटू खाशाबा जाधव यांनी स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक जिंकून इतिहास रचला होता आणि महाराष्ट्रासह आपल्या भारत देशाच्या क्रीडा विश्वाला एक ऐतिहासिक क्षण दिला होता. ऑलिम्पिक वीर खाशाबा जाधवांचा जन्मदिवस १५ जानेवारी हा महाराष्ट्र क्रीडा दिन म्हणून जाहिर करावा ही आमची मागणी २०२३ साली महाराष्ट्र शासनाने मान्य करुन २०२४ व २०२५ सलग २ वर्षे महाराष्ट्र क्रीडा दिन म्हणून महाराष्ट्र भर साजरा करण्यास सुरुवात केली.

## अकराव्या पीवायसी- पुसाळकर प्रीमियर लीग क्रिकेट 2025 स्पर्धेत

# गरगंटू डिस्ट्रॉयर्स, ए अँड ए शार्क्स संघाचा उपांत्य फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या वतीने अकराव्या पीवायसी- पुसाळकर प्रीमियर लीग क्रिकेट 2025 स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत गरगंटू डिस्ट्रॉयर्स, ए अँड ए शार्क्सया संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

पीवायसी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत रौनक ढोले पाटील याने केलेल्या 73 धावांच्या जोरावर गरगंटू डिस्ट्रॉयर्स संघाने सेनुमेरो हिबुटी चिताज संघाचा 39 धावांनी पराभव करून उपांत्य फेरी गाठली. अनुज मेहता नाबाद 49, अंकुश जाधव नाबाद 30यांनी केलेल्या



अफलातून फलंदाजीच्या जोरावर ए अँड ए शार्क्स संघाने पंडित जावडेकर डॉल्फिन्स संघाचा 8 गडी राखून पराभव करत उपांत्य फेरीत धडक मारली. काल रात्री उशिरा झालेल्या लढतीत नचिकेत जोशी(50धावा) याने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर लाइफसायकल स्नो लेपर्ड्स संघाने ओव्हन फ्रेश टस्कर्स संघाचा 5 गडी राखून पराभव केला. किड्स गटात साखळी फेरीत निरन भुरट याने केलेल्या नाबाद 52 धावांच्या जोरावर सेंटोर्स संघाने ड्रॅगन्स संघाचा 29धावांनी पराभव केला. दुसऱ्या लढतीत क्रिशांग गंद्रे 1-7 व नाबाद 22) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर सेंटोर्स संघाने फिनिक्स संघाचा 8 गडी राखून पराभव करत दुसरा विजय मिळवला.